सोलापूर तरुण भारत

Solapur Tarun Bharat

न मे कर्मफले स्पृहा

छत्रपती संभाजीनगर, अहिल्यानगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड येथून वितरित

छत्रपती संभाजीनगर | शुक्रवार, दि. १९ डिसेंबर २०२५ | वर्ष - ३ रे | अंक २५२ | पाने : ८ | किंमत रु. ६/- | inbharat.com, epaper.dainiktarunbharat.com


## थोडक्यात...

### मुंडेंना मंत्रिमंडळात घेणार नाहीत : राऊत

**मुंबई :** मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस धनंजय मुंडेंना मंत्रिमंडळात घेणार नाहीत असा दावा संजय राऊतांनी केलाय. अजूनही वाल्मिक कराड जेलमध्ये आहे. त्यामुळे धनंजय मुंडेंना मंत्रिमंडळात प्रवेश मिळेल असं वाटत नाही असं राऊत म्हणालेत. धनंजय मुंडेंनी काल दिल्लीत अमित शाहांची भेट घेतली होती. त्यावर अमित शाह पक्ष फोडण्यात पटाईत असल्याचा टोला राऊतांनी मारलाय.

### प्रज्ञा सातव यांचा भाजपमध्ये प्रवेश

**हिंगोली :** मराठवाड्यात भाजपनं काँग्रेसला मोठा धक्का दिलाय. काँग्रेसच्या आमदार प्रज्ञा सातव यांनी भाजपमध्ये प्रवेश केलाय. आज सकाळी प्रज्ञा सातव यांनी विधिमंडळ सचिवांकडे आपल्या आमदारकीचा राजीनामा सुपूर्द करत रितसर भाजपमध्ये प्रवेश केला. या पक्षप्रवेश सोहळ्याला भाजप प्रदेशाध्यक्ष रवींद्र चव्हाण आणि चंद्रशेखर बावनकुळे उपस्थित होते. राजीव सातव यांचं हिंगोलीच्या विकासाचं स्वप्न पूर्ण करण्यासाठी आणि देवेंद्र फडणवीस यांच्या नेतृत्त्वाखाली महाराष्ट्राच्या चौफेर विकासाला हातभार लावण्यासाठी भाजपमध्ये प्रवेश करत असल्याचं प्रज्ञा सातव यांनी सांगितलंय. जिल्हा परिषद निवडणुकांच्या तोंडावर हा प्रवेश काँग्रेससाठी मोठा धक्का मानला जात आहे.

### मुंबईतून ९५० इच्छुक उमेदवारांचे अर्ज

**मुंबई :** आगामी महानगरपालिका निवडणुकांसाठी मुंबई काँग्रेसमध्ये इच्छुकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद पहायला मिळतोय. मुंबईभरातून एकूण ९५० जणांनी पक्षाकडे आपले अर्ज सादर केले असून या इच्छुकांच्या मुलाखतींना आजपासून सुरुवात होणार आहे. 'येत्या दोन दिवसांत सर्व इच्छुकांच्या मुलाखती पूर्ण करण्याचा पक्षाचा मानस असून त्यानंतर या संदर्भातील एक सविस्तर अहवाल दिल्लीतील पक्षश्रेष्ठींकडे सादर केला जाणार आहे. त्यानंतरच अंतिम उमेदवारयादी निश्चित केली जाईल.

### बालभारतीची डुप्लिकेट पुस्तकं छापण्याचा प्रकार

**नागपूर :** नागपुरात बालभारतीची डुप्लिकेट पुस्तक छापल्याचा धक्कादायक प्रकार समोर आलाय. बालभारतीचे अधिकारी आणि पोलिसांनी बालभारतीची डुप्लिकेट पुस्तकं छापणाऱ्या कारखान्यावर छापेमारी केली. हिंगणा चखऊतील प्रतिभा प्रिंटर्समधील ही छपाई सुरु होती. या छापेमारीत गणित तसंच इतर विषयांची पुस्तकांची छपाई सुरू असल्याचं समोर आलंय.

### मुंडेंच्या कमबॅकला सुळेंचा विरोध

**पुणे :** धनंजय मुंडेंच्या मंत्रिमंडळात कमबॅकला खासदार सुप्रिया सुळेंनी विरोध केलाय. धनंजय मुंडे यांना जर पुन्हा मंत्रिमंडळात घेतलं तर बीडमध्ये जाऊन देशमुख कुटुंबियांसोबत उपोषणाला बसणार असल्याचा इशारा सुप्रिया सुळेंनी राज्य सरकारला दिलाय. माणिकराव कोकाटेंकडून मंत्रिपदं काढून घेतल्यानंतर धनंजय मुंडेंनी दिल्लीत जाऊन अमित शाहांची भेट घेतली होती. त्यामुळे धनंजय मुंडे पुन्हा मंत्रिमंडळात येणार असल्याची चर्चा सुरु झाली होती. मात्र त्याला सुप्रिया सुळेंनी विरोध केलाय.

### कल्याण-डोंबिवलीत मनसेला मोठा धक्का

**मुंबई :** कल्याण-डोंबिवलीत मनसेला एकाच दिवशी दोन मोठे राजकीय धक्के बसले आहेत. कल्याण महिला शहर अध्यक्षा कस्तुरी देसाई यांनी आपल्या पदासह पक्षाच्या सदस्यत्वाचा राजीनामा दिला. तर त्यांचे पती मनसे नेते कौस्तुभ देसाई यांनीही मनसेला सोडचिठ्ठी दिली. यानंतर डोंबिवलीतील माजी महिला शहर अध्यक्षा मंदा पाटील यांनीही पदाचा राजीनामा दिलाय. पक्षातील नव्या नियुक्त्यांबाबत नाराजी व्यक्त करत मंदा पाटील यांनी मनसेला 'जय महाराष्ट्र' केला आहे. माजी आमदार राजू पाटील यांच्याकडून प्रतिसाद न मिळाल्याने तसेच वरिष्ठ नेत्यांच्या कार्यपद्धतीवर त्यांनी नाराजी व्यक्त केलीये.

### मुंबईकरांचा दैनंदिन प्रवास सुखकर होणार

**मुंबई :** मुंबईकरांचा दैनंदिन प्रवास आणखी सोपा होणारेय. प्रवाशांच्या सुरक्षिततेला प्राधान्य देत स्वयंचलित दरवाजे बंद करणारी प्रणाली असलेल्या नवीन गाड्या खरेदी केल्या जातायेत. तसंच मेल एक्स्प्रेस गाड्यांची क्षमता वाढवली जाणारेय. प्रवाशांची गर्दी टाळण्यासाठी अनेक स्थानकांवर अतिरिक्त प्लॅटफॉर्म उभारण्यात येणार असून काही प्लॅटफॉर्मचा विस्तार करण्यात येणार आहे. मुंबईतील रेल्वे सेवांची क्षमता वाढवण्यासाठी अनेक प्रकल्प सुरू करण्यात आल्याची माहिती वैष्णव यांनी दिलीये.

### प्रियंका गांधींनी गडकरींची घेतली भेट

**नवी दिल्ली :** प्रियंका गांधींनी नितीन गडकरींची घेतली. वायनाड मतदारसंघातील विकासकामांबाबत चर्चा केली. प्रियांका गांधी वाड्रा, वायनाडच्या काँग्रेस खासदार, यांनी केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांची भेट घेतली. या भेटीत वायनाड लोकसभा मतदारसंघातील रस्ते, पायाभूत सुविधा आणि संबंधित विकासकामांबाबत सविस्तर चर्चा झाल्याची माहिती आहे.

# माणिकराव कोकाटेंनी दिला राजीनामा

## उपमुख्यमंत्री पवार यांनी कोकाटेंचा राजीनामा स्वीकारला

**मुंबई :** मुख्यमंत्री कोट्यातील सदनिका गैरव्यवहार प्रकरणात मंत्री माणिकराव कोकाटे अडचणीत आल्यानंतर आधी त्यांच्याकडून खाती काढून घेतली. राज्य सरकार कोणत्याही प्रकारे सहकार्य करणार नसल्याचे संकेत मिळताच माणिकराव कोकाटे यांनी आपल्या मंत्रिपदाचा राजीनामा दिला आहे. राष्ट्रवादीचे अध्यक्ष अजित पवार यांनी कोकाटे यांचा राजीनामा स्वीकारल्याचे सांगितले. माणिकराव कोकाटे यांचा राजीनामा मुख्यमंत्री फडणवीस यांच्याकडे पाठवल्याचेही अजित पवार यांनी सांगितले.

माणिकराव कोकाटे यांच्या अटकेत आता कोणताही कायदेशीर अडथळा नसल्याचे कळते. अटकेसाठी विधिमंडळाच्या कुठल्याही परवानगीची गरज नाही, अशी माहिती खात्रीलायक सूत्रांनी दिली. तसेच कोकाटे यांच्या अटकेची माहिती पोलीस विधिमंडळाला अवगत करतील, असे सांगण्यात येते. कोकाटे रुग्णालयात दाखल असल्याने पोलिसांसमोर वैद्यकीय अडचण मात्र कायम आहे.

माननीय न्यायालयाच्या निकालानंतर महाराष्ट्राच्या मंत्रिमंडळातील सदस्य व पक्षातील आमचे सहकारी माणिकराव कोकाटे यांनी आपला राजीनामा माझ्याकडे सुपूर्द केला आहे.

कायदे-नियम हे सर्वोच्च स्थानी असून ते कोणत्याही व्यक्तीपेक्षा सर्वोतोपरी आहेत, या आमच्या पक्षाच्या दीर्घकालीन भूमिकेनुसार हा राजीनामा तत्त्वतः स्वीकारण्यात आला आहे. संवैधानिक प्रक्रियेनुसार पुढील कार्यवाहीसाठी माणिकराव कोकाटे यांचा राजीनामा मुख्यमंत्री महोदयांकडे पाठवण्यात आला आहे. सार्वजनिक जीवन हे नेहमीच संविधानिक नैतिकता, संस्थात्मक प्रामाणिकता आणि न्यायपालिकेच्या सन्मानावर आधारित असावं, या मूल्यांवर आमच्या पक्षाची निरंतर वाटचाल राहिली आहे. कायदेशीर प्रक्रियेवर आमचा ठाम विश्वास आहे. राज्यात कायदा-व्यवस्थेचं काटेकोरपणे पालन होईल, याकरिता आम्ही कटिबद्ध आहोत. लोकशाही मूल्ये जपली जातील व जनतेच्या विश्वासाला तडा



जाणार नाही, त्या दृष्टीकोनातून आम्ही सदैव कार्यतत्पर राहू, असे अजित पवार म्हणाले.

# विद्यार्थ्यांना घेऊन जाणारा टेम्पो पलटी; चार गंभीर



**धाराशिव :** धाराशिव जिल्ह्यातील धुळे - सोलापूर राष्ट्रीय महामार्गवर भीषण अपघातझाल्याची घटना घडली आहे. टॅम्पोच्या पुढे आलेल्या कारला वाचवताना ३५ मूकबधिर विद्यार्थ्यांना घेऊन जाणारा टेम्पो पलटी झाला आहे. या अपघातात तीन मूकबधिर मुले गंभीर तर एक कर्मचारी गंभीर जखमी झाला आहे. जखमींवर शासकीय रुग्णालयात अतिदक्षता विभागात उपचार सुरु आहेत. दरम्यान, या अपघातचे दृश्य सीसीटीव्ही कॅमेरामध्ये कैद झाले आहे.

धुळे - सोलापूर राष्ट्रीय महामार्गवर टॅम्पोचा भीषण अपघात झाला आहे. या अपघातात ३ मूकबधिर मुले गंभीर तर एक कर्मचारी गंभीर जखमी झाला असून त्यांच्यावर शासकीय रुग्णालयात अतिदक्षता विभागात उपचार सुरु आहेत. बाकी ३१ विद्यार्थ्यावरही शासकीय रुग्णालयातच उपचार सुरु आहेत.

**धाराशिव जिल्ह्यातील धुळे - सोलापूर राष्ट्रीय महामार्गावरील भीषण घटना**

उमरगा येथील मूकबधिर निवासी शाळेतील मुलं धाराशिवकडे जात असताना हा अपघात झाला आहे. हॉटेल भाग्यश्री समोरच हा अपघात झाला आहे. अपघाताचे दृश्य सीसीटीव्ही कॅमेरात कैद झाले आहे. अपघात झाल्यानंतर कारचालक घटनास्थळावरून फरार झाला आहे.

# अल्पवीयन मुलीवर अमानूष अत्याचार

## सांगली जिल्ह्यातील ईश्वरपूरमधील घटना; दोन गुन्हेगारांचं सैतानी कृत्य

**सांगली :** महाराष्ट्राला हादरवून टाकणारी एक धक्कादायक घटना सांगली जिल्ह्यात घडली आहे. इथं एका अल्पवयीन मुलीवर दोन जणांनी सामूहिक अत्याचार केला आहे. दोन्ही आरोपी हे पोलीस रेकॉर्डवरील सराईत गुन्हेगार आहेत. आरोपींनी पीडित मुलीचं अपहरण करून तिला गावाजवळील एका शेतात घेऊन जात तिच्यावर लैंगिक अत्याचार केला आहे. आरोपी एवढ्यावरच थांबले नाहीत, तर त्यांनी पीडितेचे कपडे घेऊन पळ काढला. यामुळे मुलीला विवस्त्र अवस्थेत शहरापर्यंत पायपीट करावी लागली आहे.

ही घटना सांगलीच्या ईश्वरपूर पोलीस ठाण्याच्या हद्दीत घडली आहे. अमानुष अत्याचाराची ही घटना उघडकीस येताच पोलिसांनी तातडीने तपासाची चक्र फिरवत दोन्ही आरोपींना बेड्या ठोकल्या आहेत. ऋतिक दिनकर महापुरे आणि आशिष जयवंत खांबे (दोघे रा. खांबे मळा, कामेरी रस्ता, ईश्वरपूर) असं अटक केलेल्या आरोपींची नावं आहेत. या दोघांविरुद्ध अपहरण, बलात्कार आणि बाललैंगिक अत्याचार प्रतिबंधक कायद्याच्या विविध कलमांनुसार गुन्हा नोंद केला आहे. मंगळवारी रात्री ९ च्या सुमारास ही घटना घडली. ज्यावेळी हा सगळा प्रकार घडला, त्यावेळी पीडितेच्या आई ड्युटीवर होती. कामावरून घरी परतल्यानंतर त्यांना आपली मुलगी कुठेच दिसली नाही. सगळीकडे शोधाशोध केल्यानंतर त्यांनी तातडीने ईश्वरनगर पोलीस स्टेशन गाठलं. मुलगी बेपत्ता झाल्याची माहिती त्यांनी पोलिसांना दिली. काही वेळात पोलीस पीडित मुलीस घेऊन आले. आईने मुलीकडे विचारपूस केल्यावर या अमानुष घटनेचा उलगडा झाला. दोन्ही आरोपींनी पीडित मुलीवर गावाजवळील एका शेतात नेत आळीपाळीने लैंगिक अत्याचार केला होता. अत्याचारानंतर आरोपी पीडितेचे कपडे घेऊन पळून गेले. यामुळे पीडित मुलगी ही जवळपास १ किलोमीटर अंतर रात्रीच्या अंधारात विवस्त्र अवस्थेत चालत आली होती.

शहरालगत असलेल्या एका चौकात आल्यावर काही नागरिकांनी तिला पाहिलं. तिच्यासोबत काहीतरी चुकीचं घडल्याचं समजल्यानंतर नागरिकांनी तातडीने तिला कपडे दिले. तसेच घटनेची माहिती पोलिसांना दिली.

# तरुणीला जबरदस्तीने विष पाजण्याचा प्रयत्न

**जालना :** जालना जिल्ह्याच्या अंबड तालुक्यात एक अमानुष घटना उघडकीस आली. इथं चार जणांनी मिळून एका महिलेला विष पाजण्याचा प्रयत्न केला आहे. आरोपींनी रस्त्यात गाडी थांबवून महिलेला एका शेतात ओढत नेलं होतं. याठिकाणी चौघांनी तिला खाली पाडून विष पाजण्याचा प्रयत्न केला. पण महिलेनं प्रसंगावधान दाखवत मदतीसाठी आरडाओरडा केला. महिलेचा आवाज ऐकून काही नागरिक मदतीसाठी धावून आले. यामुळे मोठा अनर्थ टळला आहे.

या प्रकरणी अंबड पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल केला आहे. अल्ताफ अयुब शेख, अयुब रशीद शेख, शाहरुख यासेर कुरेशी आणि एक अज्ञात महिला अशी गुन्हा दाखल झालेल्या आरोपींची नावं आहेत. हे सर्वजण पीडित महिलेच्या सासरची मंडळी आहेत. मूलबाळ होत नसल्याच्या कारणातून त्यांनी विवाहितेला मारहाण करत तिच्या तोंडात विष टाकून जीवे मारण्याचा प्रयत्न केला आहे. ही घटना अंबड तालुक्यातील जामखेडा फाटा परिसरात घडली. विवाहितेने दिलेल्या फिर्यादीवरुन पती, सासरा, नंदई, सासू या चार जणांविरुध्द अंबड पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. या घटनेमुळे एकच खळबळ उडाली आहे.

# भाजपा उमेदवाराच्या पाठीमागे आपण राहावे : मुख्यमंत्री

**तभा वृत्तसेवा**

**मुखेड, दि. १८ डिसेंबर :** निवडणुकीच्या प्रचाराच्या दृष्टीने मला अतिशय आनंद होतोय बाराशे वर्षांचा इतिहास आणि दशरथ ईश्वराचा आशीर्वाद या मुखेड नगरीच्या पाठीशी आहे. आणि सगळ्यात महत्वाचं म्हणजे अतिशय कार्यक्षम अशा प्रकारचे आमदार आपल्या मुखेडला लाभलेले आहेत. त्यांच्या माध्यमातून या नगरीमध्ये मोठ्या प्रमाणात विकास करताना शिक्षित अशा प्रकारची उमेदवार नगर परिषदेच्या निवडणुक निमित्ताने त्यांनी दिलेले आहेत. मुखेड नगर परिषद निवडणुकीत भाजपा उमेदवाराच्या पाठीमागे आपण राहावे, आ. डॉ. तुषार राठोड व विजयाताई पत्तेवार यांच्या पाठीमागे महाराष्ट्र सरकार राहील असे प्रतिपादन महाराष्ट्र राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडवणीस यांनी केले.

मुखेड नगरपरिषद सार्वत्रिक निवडणूक प्रचार सभा प्रसंगी व्यासपीठावर माजी मुख्यमंत्री तथा खासदार अशोकराव चव्हाण, संजय कौडगे,आ. जितेश अंतापुरकर, अमरनाथ राजूरकर, किशोर देशमुख, संतुकराव हांबर्डे, माजी नगराध्यक्ष गंगाधर राठोड, सौ.पूनमताई पवार, देविदास राठोड, सौ.अनिताताई चोंडीकर (गोपछडे), सौ. चित्ररेखा गोरे, नगराध्यक्ष पदाच्या उमेदवार सौ. विजया राम पत्तेवार सर्व निवडणूक रिंगणातील भाजपाचे उमेदवार यांची प्रमुख उपस्थिती होती.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस पुढे म्हणाले की, ६३ कोटीची पाणीपुरवठा योजना मंजूर झाली पुढच्या तीन महिन्यांमध्ये या योजनेचे काम पूर्ण होईल. भूमिगत गटार योजनेचा १०८ कोटीचा प्रस्ताव आमच्याकडे प्रलंबित आहे हे आपल्याला आश्वासन देतो निवडणूक संपल्यानंतर पंधरा दिवसाच्या आत या प्रस्तावाला मान्यता दिली जाईल. मुखेडच्या आसपास खूप वस्ती झाली आहे वस्ती वाढीस मी लवकरात लवकर मान्यता देईन. या ठिकाणी एमआयडीसी असली पाहिजे अशा प्रकारची मागणी ही तुषार भाऊंनी केली आहे, निश्चितपणे आपल्याला एमआयडीसी या ठिकाणी मंजूर करेन आणि त्यात उद्यो-




गही आले पाहिजे याकरता मोठ्या प्रमाणात आपल्याला मदत करू. रेल्वे लाईनसाठी केंद्र सरकार ५० टक्के पैसे देईल आणि पन्नास टक्के पैसे राज्य सरकारच्या माध्यमातून या ठिकाणी उपलब्ध करून दिले जातील. कृषी उत्पन्न बाजार समितीला आता जागा कमी पडते आहे निश्चितपणे कृषी उत्पन्न बाजार समितीला ही वाढीवची जागा द्यायची आहे ती सांगा आपण जे मागणी केलेली जागा आहे ती तात्काळ उपलब्ध करून देण्याचं काम हे महाराष्ट्र सरकारच्या वतीने आपण त्या ठिकाणी करू. आपल्याला लेंडी सारखा प्रकल्प अनेक वर्ष थकला होता. तुषार राठोड यांच्या पाठपुराव्यामुळे त्याचं मोठ्या प्रमाणात काम झालं. मुख्यमंत्र्याच्या लाडक्या बहिणींना त्यांनी मुखेड तालुक्यातील लखपती दीदी जास्तीत जास्त प्रमाणात कशा होतील याचाही विचार करू असे त्यांनी सांगितले.

यावेळी खासदार अशोकराव चव्हाण यांनी मनोगत व्यक्त केले. प्रास्ताविकात आ. डॉक्टर तुषार राठोड म्हणाले की, मागील निवडणुकीमध्ये भारतीय जनता पार्टीच्या नगरसेवकांचे बहुमत आलं परंतु अल्पमताने नगराध्यक्ष पदाच्या उमेदवाराचा पराभव झाला आणि यामुळे सभागृहांमध्ये केवळ राजकारण झालं परंतु या शहराचा विकास होऊ शकला नाही. पाच वर्ष विकासाच्या बाबतीमध्ये हे शहर पाठीमागे गेलं तेव्हा राज्यामध्ये सत्तांतर झालं आणि नगरपालिकेचा कालावधी संपला आणि सरकार माझ्या नगरपालिकेवर प्रशासक आले त्यानंतर त्या शहरातले रस्त्यांची काम असतील नाल्यांची काम असतील शहरांमध्ये बांधलेले विजेचे खांब असतील, साठकोटी रुपयांचा निधी २०२२ नंतर माझ्या माध्यमातून मी मंजूर केला. वाढीव वस्तीमध्ये नागरिकांना पाणी मिळालं पाहिजे यासाठी महाराष्ट्र सरकारच्या वतीने ६३ कोटी रुपयांची वेगळी योजना या गावासाठी आपण मंजूर केली या योजनेचे काम आम्ही सुरू केल्याचे आ. डॉ. तुषार राठोड यांनी सांगीतले.

# मराठवाड्यासाठी रेल्वेचा मास्टर प्लॅन, ३ नवे मार्ग होणार

**छत्रपती संभाजीनगर :** मराठवाड्यातील रेल्वे कनेक्टिव्हिटीला चालना देणाऱ्या तीन महत्त्वाच्या रेल्वेमार्गांचे सर्वेक्षण सध्या सुरू आहे. यामध्ये छत्रपती संभाजीनगर-अहिल्यानगर-पुणे हा महत्त्वाचा मार्ग होणार आहे. यासोबतच छत्रपती संभाजीनगर-बिडकीन-पैठण-गेवराई-बीड-सोलापूर आणि छत्रपती संभाजीनगर-वेरूळ-कन्नड-चाळीसगाव या मार्गांचा यात समावेश आहे. हे सर्व प्रकल्प लवकरात लवकर मार्गी लावावेत, अशी मागणी खासदार डॉ. भागवत कराड यांनी केंद्र सरकारकडे केली आहे.

बुधवारी नवी दिल्लीत केंद्रीय रेल्वेमंत्री अश्विनी वैष्णव यांची भेट घेऊन डॉ. कराड यांनी विविध रेल्वे विषयक मागण्यांचे सविस्तर निवेदन दिले. यावेळी रेल्वेमंत्र्यांनी संबंधित मार्गांचे सर्वेक्षण सुरू असल्याची माहिती दिली. मराठवाड्याच्या विकासासाठी हे मार्ग अत्यंत महत्त्वाचे असून त्यांना गती देण्याची गरज असल्याचे डॉ. कराड यांनी अधोरेखित केले.

### संभाजीनगर-अहिल्यानगर रेल्वे थेट पुण्याला जाणार

नवी वंदे भारत सुरू करण्याची मागणी

छत्रपती संभाजीनगर-मुंबई वंदे भारत एक्स्प्रेस सुरू करावी, अशी मागणीही त्यांनी केली. तसेच छत्रपती संभाजीनगरला स्वतंत्र रेल्वे विभागाचा दर्जा देऊन तो मध्य रेल्वेअंतर्गत समाविष्ट करावा, अशी भूमिका मांडण्यात आली. यावर केंद्रीय रेल्वेमंत्र्यांनी



स्वतंत्र रेल्वे विभागाच्या शक्यतेचा अभ्यास करण्यात येईल, असे आश्वासन दिल्याचे डॉ. कराड यांनी सांगितले.

दरम्यान, छत्रपती संभाजीनगर-अहिल्यानगर या सुमारे ८५ किलोमीटर लांबीच्या रेल्वेमार्गाचा सविस्तर प्रकल्प अहवाल (डीपीआर) सहा महिन्यांपूर्वीच केंद्र सरकारकडे सादर करण्यात आला आहे. हा मार्ग पुढे पुण्यापर्यंत वाढवण्याचा प्रस्ताव असल्याची माहितीही डॉ. कराड यांनी दिली. या सर्व प्रकल्पांमुळे मराठवाडा आणि पश्चिम महाराष्ट्रातील दळणवळण सुलभ होऊन औद्योगिक व आर्थिक विकासाला मोठी चालना मिळेल, असा विश्वास व्यक्त करण्यात आला.

धाराशिव
# जिल्हा

सोलापूर तरुण भारत, सोलापूर, (महाराष्ट्र) येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, धाराशिव, लातूर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड (महाराष्ट्र), तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.



## दुचाकी घसरून अपघात; उपचारादरम्यान तरुणाचा मृत्यु

**तभा वृत्तसेवा**
**धाराशिव, दि.१६ डिसेंबर -**

धाराशिव शहर पोलीस ठाणे :

धाराशिव बायपास रोडवर दुचाकी घसरून झालेल्या अपघातात तरुणाचा उपचारादरम्यान मृत्यू झाल्याची घटना समोर आली असून, या प्रकरणी धाराशिव शहर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

मयताचे नाव पंकज विद्यानंद देशमुख (वय २५), रा. देवळाली, ता. जि. धाराशिव असे आहे. याबाबत मयताचा भाऊ महेश अशोक देशमुख (वय ४०), रा. देवळाली यांनी फिर्याद दिली आहे.

दि. १५ जुलै २०२५ रोजी दुपारी सुमारे ३.३० वाजण्याच्या सुमारास पंकज देशमुख हे दुचाकी (क्रमांक एमएच २५ ए.ए. ०१४६) वरून जात असताना, गणेश मंगल कार्यालयाजवळील धाराशिव बायपास रोडवरील सांजा दिशेकडे जाणाऱ्या लेनवर त्यांनी दुचाकी हायगयी व निष्काळजीपणे चालवली. यावेळी दुचाकी घसरून ते रस्त्यावर पडले व गंभीर जखमी झाले. त्यांच्यावर उपचार सुरू असताना त्यांचा मृत्यू झाला. याप्रकरणी धाराशिव शहर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल केला आहे.

# रेड्यांच्या टकरीचे आयोजन; १४ जणांविरुद्ध गुन्हा दाखल

### आगावू नोटीस असूनही नियमांचे उल्लंघन

**तभा वृत्तसेवा**
**धाराशिव, दि.१६ डिसेंबर -**

भुम तालुक्यातील आरसोली शेतशिवारात रेड्यांच्या टकरी (झुंजी) आयोजित केल्याप्रकरणी भुम पोलीस ठाण्यात १४ जणांविरुद्ध गुन्हा नोंदवण्यात आला आहे.

याबाबत पोलीसांकडून मिळलेली माहिती अशी की, आरोपी विजयसिंह थोरात, यशवंत धनाजी थोरात (रा. भुम), बालाजी लाला काळे (रा. हिवरा), निलेश गुळमे (रा. भुम), रावजी उर्फ पल्या काळे (रा. कल्याणनगर, भुम), शंकर राजू काळे (रा. ढोकी), विलास भारती (रा. भुम), विलास लोढे (रा. भुम), ओंकार होळकर (रा. भुम), गुड्डू गाडे (रा. भुम), सुनील माळी, जावेद शेख, स्वप्निल उर्फ पिट्या हावळे (सर्व रा. भुम, ता. भुम, जि. धाराशिव).

दि.१४ डिसेंबर २०२५ रोजी दुपारी २ ते ४ वाजेदरम्यान आरसोली शेतशिवारातील कुरणात, खडी क्रेशर मशीनजवळील मोकळ्या मैदानात, रेड्यांच्या टकरीचे आयोजन करण्यात आले.



यापूर्वी भा.न्या. सं. कलम १६८ अन्वये रेड्यांच्या टकरी न घेण्याबाबत आगावू सूचना देण्यात आल्या होत्या.

मात्र, संबंधित आरोपींनी नोटीस स्वीकारण्यास नकार देत पैजेसाठी व मनोरंजनाच्या उद्देशाने दोन पाळीव रेड्यांमध्ये टकरी घडवून आणली.

या टकरी व झुंजीदरम्यान रेडे एकमेकांशी झुंजताना जखमी झाले.

तसेच झुंजीत उधळलेले रेडे पळून गेल्याने तेथील उपस्थित लोकांच्या जिवितास धोका निर्माण झाला, असे पोलिसांनी नमूद केले आहे. याप्रकरणी अधिक तपास पोलीस करीत आहेत.

## विद्युत तारा तोडताना करंट लागून तरुणाचा मृत्यु

### निष्काळजीपणामुळे जीवितहानी; दोघांविरुद्ध गुन्हा दाखल

**तभा वृत्तसेवा**
**धाराशिव, दि.१६ डिसेंबर -**

विद्युत प्रवाह सुरू असलेल्या तारा तोडण्यास सांगितल्याने करंट लागून तरुणाचा मृत्यू झाल्याची गंभीर घटना तुळजापूर तालुक्यातील देवसिंगा तुळ शिवारात घडली आहे. या प्रकरणी तुळजापूर पोलीस ठाण्यात दोघांविरुद्ध गुन्हा नोंदवण्यात आला आहे.

याबाबत पोलीसांकडून मिळालेली माहिती अशी की, मयताचे नाव दत्ता हब्बास वाघमारे (वय २५), रा. देवसिंगा तुळ, ता. तुळजापूर, जि. धाराशिव असे आहे. याबाबत निकिता अक्षय मस्के (वय २५), रा. भिमनगर, देवसिंगा तुळ, ता. तुळजापूर यांनी फिर्याद दिली आहे.

फिर्यादीतील माहितीनुसार, दि. १४ डिसेंबर २०२५ रोजी सायं. ६.१५ वाजण्याच्या सुमारास, आरोपी विद्याधर तानाजी जाधव व जितेंद्र गुलाब मस्के (दोघे रा. देवसिंगा तुळ) यांनी देवसिंगा तुळ शिवारातील विद्याधर जाधव यांच्या शेतात असलेल्या रिन्यु कंपनीच्या विद्युत तारा तोडण्याचे काम मयत दत्ता वाघमारे यांना ५०० रुपये मजुरी देऊन करण्यास सांगितले.

विद्युत तारांमध्ये प्रवाह सुरू असल्याची माहिती असतानाही, मयतास पोलवर चढून तारा तोडण्यास सांगितले. दरम्यान, पोलवर चढून तारा तोडत असताना दत्ता वाघमारे यांना जोराचा विद्युत शॉक लागला. त्यामुळे ते पोलवरून खाली पडून गंभीर जखमी झाले. त्यांना उपचारासाठी दाखल करण्यात आले; मात्र उपचारादरम्यान त्यांचा मृत्यू झाला.

या घटनेप्रकरणी फिर्यादीने दि. १५ डिसेंबर २०२५ रोजी दिलेल्या प्रथम खबरेवरून तुळजापूर पोलीस ठाण्यात भारतीय न्याय संहिता कलम १०५ व ३(५) अन्वये गुन्हा नोंदवण्यात आला असून, पुढील तपास पोलीस करीत आहेत.

## ग्रामपंचायत कार्यालयात आग; सरकारी दस्ताऐवज जळून नष्ट

**तभा वृत्तसेवा**
**धाराशिव, दि.१६ डिसेंबर -**

कळंब तालुक्यातील हासेगाव शि. ग्रामपंचायत कार्यालयात अज्ञात व्यक्तीने आग लावून सरकारी दस्ताऐवज जाळल्याची घटना समोर आली आहे. या प्रकरणी शिराढोण पोलीस ठाण्यात गुन्हा नोंदवण्यात आला आहे.

याबाबत माहिती अशी की, फिर्यादी राजेंद्र धोडींराम राठोड (वय ३६), व्यवसाय नोकरी, ग्रामपंचायत अधिकारी, रा. नांदुर्गा, ता. औसा, जि. लातुर यांनी दिलेल्या फिर्यादीवरून ही कारवाई करण्यात आली आहे.

दि.१३ डिसेंबर २०२५ रोजी सकाळी १०.३० ते दि. १५ डिसेंबर २०२५ रोजी सकाळी १०.०० या कालावधीत, हासेगाव ग्रामपंचायत कार्यालयाच्या पाठीमागील खिडकीसमोरील उघड्या कपाटातील शासकीय दस्ताऐवजावर लाकडी काठीला कपडा गुंडाळून आग लावली गेली. यामुळे दस्ताऐवज जळून नष्ट झाले.



या घटनेप्रकरणी भारतीय दंड संहिता कलम ३२४(३) आणि कलम ३, ४ सार्वजनिक संपत्ती नुकसान प्रतिबंधक अधिनियम अन्वये गुन्हा नोंदवण्यात आला असून, पुढील तपास शिराढोण पोलीस करीत आहेत.

## खुदावाडी येथे चार एकर ऊस जळून खाक; शेतकऱ्याचे सहा लाखाचे नुकसान

**तभा वृत्तसेवा**
**अणदूर, दि.१६ डिसेंबर -**

तुळजापूर तालुक्यातील खुदावाडी येथील शेतकरी सुबोध अहंकारी यांच्या शेतातील ऊसाच्या फडाला अचानक आग लागल्याने चार एकर ऊस जळून खाक झाला असुन शेतकऱ्याचे सहा लाखाचे नुकसान झाले आहे.

१५ डिसेंबर रोजी दुपारी शेतकरी सुबोध अहंकारी हे आपल्या शेतात पाणी देत असताना ऊसाच्या वरच्या बाजूने विजेची तार गेली आहे. अचानकच या तारचे स्पार्कींग झाल्याने ठिणग्या उसाच्या मध्यभागी पडल्याने उसाने पेट घेतला. उसाच्या मध्यभागी लागलेल्या आगीला विझवण्यासाठी शेतकऱ्यांनी प्रयत्न केला असता ते यशस्वी होऊ शकले नाहीत, त्यामुळे चार एकर ऊस जळून खाक झाला आहे.

दोनशे टन होणारा ऊस सोलापूर येथील सिद्धेश्वर सहकारी साखर कारखाना चार आठ दिवसांत ऊस घेऊन जाणार होता. शेतकऱ्याच्या तोंडाला आलेला घास नियतीने पळवून नेला आहे. संकटामध्ये असणाऱ्या शेतकऱ्यांने याच उसावर अनेक स्वप्ने रंगवली होती ती स्वप्ने भंग पावली आहेत.



अशातच जळालेला ऊस कोणताही कारखाना ताबडतोब घेऊन जात नाही त्या मुळे आणखीन नुकसान होणार आहे. अशा हलाकीच्या स्थितीत हा शेतकरी अडकला असून, वर्षभर कष्ट करून, रात्र रात्र जागरण करून उसाला पाणी देऊन ऊस वाढवला या आगीमुळे होत्याचे नव्हते झाले.

तेंव्हा महावितरण विभाग व महसुल विभागानी शेतकऱ्याचे झालेल्या नुकसानीच्या जागेचा पंचनामा करून शेतकऱ्याला शासकीय मदत मिळवून द्यावी अशी मागणी शेतकऱ्यासह ग्रामस्थांनी केली आहे.

## एनव्हीपी शुगरच्या वतीने ऊसाचे बिल शेतकऱ्याच्या बँक खात्यात जमा



**तभा वृत्तसेवा**
**धाराशिव, दि.१६ डिसेंबर -**

तालुक्यातील जागजी येथील एनव्हीपी शुगर प्रा. लि.च्या वतीने सन २०२५-२०२६ च्या द्वितीय गळीत हंगामात दि. १ डिसेंबर ते १५ डिसेंबर या कालावधीत गाळपासाठी आलेल्या ऊसाचे बिल दि. १६ रोजी संबंधित शेतकऱ्यांच्या बँक खात्यात जमा करण्यात आले आहे, अशी माहिती कारखान्याचे चेअरमन नानासाहेब उर्फ बालाजी पाटील यांनी दिली.



एनव्हीपी शुगर कारखान्याच्या हिताचा विचार करून प्रत्येक पंधरवाडा पूर्ण होताच शेतकऱ्यांच्या खात्यात ऊसबिल जमा करण्याची परंपरा यंदाच्या गळीत हंगामातही कायम ठेवण्यात आली आहे. विशेष म्हणजे, तिसऱ्या पंधरवाड्यात म्हणजे नोव्हेंबर महिन्यात कारखान्यात उत्पादित झालेल्या एक लाख जागरी पावडर पोत्यांचे पूजन कारखान्याच्या वर्धापन दिनानिमित्त करण्यात आले होते.

**चेअरमन नानासाहेब पाटील यांनी ऊसबिल देण्याचा शब्द पाळला**

यंदाच्या हंगामात ऑक्टोबर महिन्यात गळीत हंगाम सुरू झाल्यापासून चाचणी गळीत हंगामाप्रमाणेच नियमित गळीत हंगामातही पंधरा दिवसांत ऊसबिल अदा करण्याची परंपरा सातत्याने जोपासली जात आहे. त्यामुळे ऊस उत्पादक शेतकऱ्यांमध्ये समाधान व्यक्त होत आहे.

ज्या शेतकऱ्यांनी उस्मानाबाद जनता सहकारी बँकेचे खाते दिले आहे, त्यांनी संबंधित बँकेत जाऊन आपले ऊसबिल घ्यावे. तसेच ज्या शेतकऱ्यांनी अद्याप बँक खाते दिलेले नाही, त्यांनी पवनराजे लोकसमृद्धी मल्टीस्टेट को-ऑपरेटिव्ह सोसायटी लि., धाराशिव येथे ऊसबिल स्वीकारावे, असे आवाहन चेअरमन नानासाहेब पाटील यांनी केले आहे.

## नव्या दिवाणी न्यायालयासाठी बसथांबा व विशेष बस सेवेची मागणी

### माजी परिवहनमंत्री मधुकरराव चव्हाण यांचे पालकमंत्र्यांना निवेदन

**तभा वृत्तसेवा**
**तुळजापूर, दि.१६ डिसेंबर -**

तुळजापूर येथे नळदुर्ग रोडवर नव्याने सुरू होणाऱ्या वरिष्ठ स्तर दिवाणी न्यायालयासाठी सर्व बसेसना न्यायालयाजवळ थांबा देण्यात यावा, तसेच न्यायालयीन वेळेनुसार विशेष बस सेवा सुरू करावी, अशी मागणी माजी परिवहनमंत्री मधुकरराव चव्हाण यांनी केली आहे.

यासंदर्भात चव्हाण यांनी धाराशिवचे पालकमंत्री प्रताप सरनाईक यांना निवेदन सादर केले आहे. नळदुर्ग रोडवर शहरापासून सुमारे तीन किलोमीटर अंतरावर नवीन दिवाणी न्यायालयाची इमारत उभारण्यात आली असून, तुळजापूर शहरातून तेथे जाण्यासाठी रिक्षाद्वारे १०० ते १५० रुपये भाडे आकारले जात असल्याचे निवेदनात नमूद करण्यात आले आहे. हे भाडे न्यायालयीन कामासाठी येणाऱ्या पक्षकारांना परवडणारे नसल्याचेही त्यांनी स्पष्ट केले आहे.



तुळजापूरहून नळदुर्गकडे जाणाऱ्या सर्व एसटी बसेसना न्यायालयाच्या इमारतीजवळ थांबा देण्याबाबत संबंधित यंत्रणांना सूचना द्याव्यात, अशी मागणी करण्यात आली आहे. याशिवाय, सकाळी १०.३० वाजता आणि सायंकाळी ५.३० वाजता न्यायालयापर्यंत विशेष बस सेवा सुरू करण्याचीही विनंती करण्यात आली आहे.

या मागणीची अंमलबजावणी झाल्यास न्यायालयीन कामासाठी येणारे पक्षकार, वकील व न्यायालयीन कर्मचारी यांना मोठा दिलासा मिळेल, अशी अपेक्षा व्यक्त करण्यात येत आहे.

## तुळजापुरात दोन गटात तुडूंब हाणामारी; कोयत्याने केले वार : एक जण गंभीर जखमी



शहरात तणावाचे वातावरण... भाजप कार्यकर्त्याकडून गोळीबार झाल्याची चर्चा

**तभा वृत्तसेवा**
**तुळजापूर, दि.१६ डिसेंबर -**

शहरातील जनता बँकेसमोर रस्त्याच्या कामावरून दोन गटांमध्ये झालेल्या वादातून तुळजापूर शहरात गंभीर तणाव निर्माण झाला. मंगळवारी सायंकाळी सुमारे पाच वाजण्याच्या दरम्यान हा प्रकार घडला.

प्रत्यक्षदर्शींनी दिलेल्या माहितीनुसार, भाजपचे नगराध्यक्ष पदाचे उमेदवार विनोद पिटू गंगणे आणि महाविकास आघाडी / काँग्रेसचे उमेदवार अमर मगर यांचे बंधू ऋषी मगर यांच्यात वाद सुरू झाला, जो हळूहळू दोन्ही गटांमध्ये तुडुंब हाणामारीत रूपांतरित झाला. रस्त्यावर मोठी गर्दी जमा झाली, परिणामी वाहतूक कोंडी निर्माण झाली.

थोड्यावेळाने हॉस्पिटल समोर कुलदीप मगर यांच्यावर कोयत्यांनी तीन वार केले गेले, ज्यामुळे हा वाद पुन्हा पेटला. कुलदीप मगर यांना तातडीने उपजिल्हा रुग्णालयात उपचारासाठी दाखल करण्यात आले. त्यांच्या प्रकृती गंभीर असल्याने त्यांना पुढील उपचारासाठी सोलापूरमध्ये रॅफर केले गेले.

घटनेनंतर नागरिकांनी उपजिल्हा रुग्णालयासमोर घेराव घालून आरोपींना ताब्यात घेण्याची मागणी केली.

रस्त्यावर झालेल्या गर्दीमुळे वाहतूक ठप्प झाली, तर शहरातील व्यापाऱ्यांनी नळदुर्ग रोड, डॉ. बाबासाहेब आंबेडकर चौक, बस स्टँड परिसर, विश्वनाथ कॉर्नर लातूर रोड इत्यादी ठिकाणी दुकाने बंद ठेवली.

पोलीस प्रशासनाने चौक चौकात तगडा बंदोबस्त लावला. रात्री उशिरापर्यंत पोलीस ठाण्यात गुन्हा नोंदणी व तपासाचे काम सुरू होते.

## महाराष्ट्र शक्तीपीठ एक्स्प्रेस-वे प्रकल्पाची पर्यावरणीय सार्वजनिक सुनावणी २३ डिसेंबरला

**तभा वृत्तसेवा**
**धाराशिव, दि.१६ डिसेंबर -**

एमएसआरडीसी (एमएसआरडीसी) मार्फत राबविण्यात येत असलेल्या महाराष्ट्र शक्तीपीठ महामार्ग (पॅकेज-II) या महत्त्वाकांक्षी प्रकल्पाबाबत पर्यावरणीय सार्वजनिक सुनावणी आयोजित करण्यात आली आहे. ही सुनावणी दि. २३ डिसेंबर २०२५ रोजी सकाळी ११.३० वाजता जिल्हाधिकारी कार्यालय, धाराशिव येथे होणार आहे.

या प्रकल्पाबाबत महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ (एमपीसीबी) कडून मिळालेला पर्यावरणीय परिणाम मूल्यांकन (ईआय) अहवाल तसेच Executive Summary संबंधित गावांमध्ये ग्राम महसूल अधिकारी यांच्याकडे उपलब्ध करून देण्यात आला आहे. त्यामुळे नागरिकांना प्रकल्पामुळे होणारे पर्यावरणीय, सामाजिक आणि आर्थिक परिणाम समजून घेणे सुलभ झाले आहे.

प्रकल्पग्रस्त गावांची यादीमध्ये नितळी, घुगी, लासोना, सांगवी, कामेगाव, चिखली, महालिंगी, बरमगाव बु., मेडसिंगा, धाराशिव ग्रामीण, देवळाली, शेकापूर, गावसुद, वरवंटी, पोहनेर, बेगडा आणि सुर्डी. या गावांतील प्रकल्पग्रस्त नागरिकांनी लेखी सूचना, मतं व आक्षेप महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाच्या उपप्रादेशिक कार्यालय, लातूर तसेच संबंधित ग्राम महसूल अधिकारी यांच्याकडे तात्काळ सादर करावेत, असे आवाहन करण्यात आले आहे.

सुनावणी दरम्यान नागरिकांना आपल्या समस्या, सूचना व भूमिका मांडण्याची संधी मिळणार असून, त्या नोंदी अंतिम निर्णय प्रक्रियेसाठी विचारात घेतल्या जातील.

त्यामुळे प्रकल्पाशी संबंधित सर्व गावांतील नागरिकांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहून लोकशाही प्रक्रियेत सहभाग नोंदवावा, असे चझझउ उप प्रादेशिक कार्यालय, लातूरचे सब रिजनल ऑफिसर यांनी आवाहन केले आहे.

## भुममध्ये जुगार विरोधी कारवाई

**धाराशिव, दि.१६ डिसेंबर -**

जुगार विरोधी कारवाई दरम्यान भुम पोलीस पथकाने दि.१५ डिसेंबर रोजी भुम पो ठाणे हद्दीत दोन ठिकाणी छापे टाकले.

यावेळी आरोपी दशरथ दत्ता पवार (वय २२, रा. कल्याणनगर, भुम) यांच्याकडून सुरट जुगाराचे साहित्य व ८१० रूपये रक्कम पोलीस पथकास हस्तगत झाली. त्याचप्रमाणे आरोपी तानाजी उर्फ पप्पु राजेंद्र काळे (वय ३६, रा. कल्याणनगर, भुम) यांच्याकडून सुरट जुगाराचे साहित्य व ८५० रूपये रक्कम जप्त केली आहे.

## जवाहर महाविद्यालयाला विद्यापीठ अंकेक्षणात 'ए' ग्रेड

**तभा वृत्तसेवा**
**अणदूर, दि.१६ डिसेंबर -**

येथील जवाहर कला, विज्ञान व वाणिज्य महाविद्यालयाने डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठांतर्गत झालेल्या शैक्षणिक व प्रशासकीय अंकेक्षणात 'ए' ग्रेड प्राप्त करून घवघवीत यश संपादन केले आहे. सदर अंकेक्षणात महाविद्यालयाला एकूण ४५० गुणांपैकी उल्लेखनीय गुण प्राप्त झाले.




या यशाबद्दल महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. उमाकांत चनशेट्टी, अंतर्गत गुणवत्ता हमी कक्षाचे प्रमुख प्रा. डॉ. विश्वास माने, अंकेक्षण प्रमुख प्रा. डॉ. सहदेव बिराजदार तसेच विद्यापीठ व्यवस्थापन परिषद सदस्य प्रा. डॉ. अंकुश कदम यांच्यासह सर्व शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांचे संस्थेचे अध्यक्ष भारत कस्तुरे, सचिव रामचंद्र आलुरे, महाविद्यालय विकास समितीचे सदस्य प्रा. भालचंद्र बिराजदार आणि ज्येष्ठ विधिज्ञ लक्ष्मीकांत पाटील यांनी अभिनंदन केले.

यावेळी बोलताना प्राचार्य डॉ. उमाकांत चनशेट्टी म्हणाले की, शिक्षणमहर्षी सि. ना. आलुरे गुरुजी यांनी ग्रामीण भागातील वंचित घटकांना आणि मुलींना गुणवत्तापूर्ण शिक्षण मिळावे यासाठी आपले संपूर्ण आयुष्य समर्पित केले. त्यांच्या विचारांचेच आम्ही पाईक आहोत.

संस्थेने उपलब्ध करून दिलेल्या उत्तम पायाभूत सुविधा, उच्च दर्जाची शैक्षणिक गुणवत्ता तसेच प्राध्यापकांनी विद्यार्थ्यांसाठी राबविलेल्या विविध नवोपक्रमांमुळे विद्यार्थी-केंद्रित शिक्षण देण्याचा सातत्यपूर्ण प्रयत्न महाविद्यालयात होत असल्याचे गौरवोद्गार सचिव रामचंद्र आलुरे यांनी काढले. त्यांनी सर्वांना पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या.

## लोहाऱ्यात अवैध मद्य जप्त; पोलीस कारवाई

**तभा वृत्तसेवा**
**धाराशिव, दि.१६ डिसेंबर -**

हॉटेल वैभवी च्या पाठीमागील मोकळ्या जागेत पोलीस पथकाने अंदाजे १,८०० रूपये किंमतीच्या देशी-विदेशी मद्याच्या १८ सिलबंद बाटल्या अवैध विक्रीच्या उद्देशाने जवळ बाळगल्याचे उघड केले.



यावरुन पोलीसांनी अवैध मद्य जप्त केले आणि संबंधित व्यक्तीविरुद्ध महाराष्ट्र मद्य मनाई कायदा कलम-६५(ई) अंतर्गत गुन्हा नोंदविला आहे.

## थोडक्यात...

### जपानी निमेशन चित्रपट 'ड्रॅगन हार्ट' २५ डिसेंबरपासून हिंदीत



**छत्रपती संभाजीनगर :** जपानमध्ये आंतरराष्ट्रीय स्तरावर गाजलेला आणि १६ आंतरराष्ट्रीय चित्रपट महोत्सवांत पुरस्कारप्राप्त 'ड्रॅगन हार्ट - डव्हेंचर्स बियॉन्ड धिस वर्ल्ड' या जपानी निमेशन चित्रपटाचा हिंदी डबिंग अवतार येत्या २५ डिसेंबरपासून भारतीय टेलिव्हिजनवर प्रदर्शित होत आहे. या चित्रपटाला ९८ व्या अकादमी पुरस्कारांच्या फीचर निमेशन विभागात पात्रता मिळाली आहे. हिंदी डबिंगमध्ये ज्येष्ठ गायक व डबिंग कलाकार सुदेश भोसले यांनी सहभाग घेतला आहे. पत्रकार परिषदेत कोटा नोगुची (दक्षिण आशिया हॅपी सायन्सचे प्रादेशिक संचालक) व सुहास कालवे (हॅपी सायन्सचे अधिकारी) उपस्थित होते. चित्रपटाचे दिग्दर्शन इसामू इमाकाके, तर कथा व निर्मिती र्युहो ओकावा यांची आहे. धर्म, कर्म, आध्यात्मिक मूल्ये व जीवनाचा उद्देश उलगडणारा हा चित्रपट स्थानिक केबल वाहिनीवर प्रसारित होणार आहे.

### ॲक्शन शैलीसाठी सोनाक्षी बत्राने श्रेय दिले प्रियांका चोप्राला!

**छत्रपती संभाजीनगर :** झी टीव्हीवरील 'जगद्धात्री' ही मालिका आपल्या उत्कंठावर्धक कथानक, जबरदस्त ड्रामा आणि दमदार क्शन दृश्यांमुळे प्रेक्षकांची मने जिंकत आहे. गुन्हेगारांशी लढते आणि आपल्या आईच्या मृत्यूमागील सत्य शोधते. या मालिकेत फर्मान हैदर, सयंतानी घोष, गीता त्यागी आणि इतर कलाकार आहेत. सोनाक्षीबत्रा या मालिकेत मुख्य भूमिका साकारत असून तिने यात काही जबरदस्त क्शन सीनहीकेले आहेत. हल्लीच याबद्दल संवादसाधताना या अभिनेत्रीने 'जगद्धात्री'ची क्शन दृश्ये साकारण्यामागे जागतिक आयकॉन प्रियांका चोप्रा तिचीप्रेरणा असल्याचे सांगितले.

### 'लक्ष्मी निवास' साठी सोनू निगमने गायले हृदयस्पर्शी शीर्षक गीत

**छत्रपती संभाजीनगर :** 'लक्ष्मी निवास' ही आपली नवीन मालिका घेऊन येत आहे. ही मालिका मध्यम वर्गीय भारताच्याभाव विश्र्वाला स्पर्श करणारी आहे- मालिकेत लक्ष्मी (मानसी जोशी रॉय) आणिश्रीनिवास (राजेंद्र चावला) या दांपत्याची कहाणी आहे, ज्यांनी ३५ वर्षे भाड्याच्या घरात घालवली आणि स्वतःचे घर बांधण्याचे स्वप्न जपले. सुप्रसिद्ध गायक सोनू निगमने 'लक्ष्मी निवास' मालिकेसाठी आपला खास आवाज दिला, ज्यामुळेमालिकेला एक वेगळा संगीतात्मक स्पर्श मिळाला. भावपूर्ण गायकीसाठी ओळखले जाणारेसोनू निगम प्रत्येक गाण्याला एक नवा आयाम देतात. त्यांच्या आवाजामुळे यामालिकेच्या भावनिकतेला अविस्मरणीय आकर्षण मिळाले असूनहे शीर्षक गीत मालिकेच्यामुख्य भावनांचे हृदयस्पर्शी प्रतिबिंब ठरते.

भगवान शंकराच्या भूमिकेत दिसणार अविनेश रेखी

सोनी सबवरील 'गाथा शिव परिवार की - गणेश कार्तिकेय' ही पौराणिक मालिका भगवान शिवाच्या दिव्य परिवाराचे हृदयस्पर्शी चित्रण करून प्रेक्षकांचे मन जिंकत आहे. ही मालिका श्रद्धा आणि मूल्ये यांच्या कालातीत कथा सादर करते आणि ब्रह्मांडातील पहिल्या कुटुंबाच्या कहाण्या अशा दृष्टिकोनातून सादर करते, की त्या प्रेक्षकांना आपल्याशा वाटतात. या लोकप्रिय मालिकेला नवीन परिमाण देण्यासाठी सुपरिचित अभिनेता अविनेश रेखी आता शंकराच्या भूमिकेत दाखल होत आहे. या भव्य-दिव्य व्यक्तिरेखेतील बारकावे साकार करण्याचा त्याचा प्रयत्न असेल. जबरदस्त स्क्रीन प्रेझेन्स आणि भावनिक गहिरेपण याबद्दल ओळखला जाणारा अविनेश शंकराच्या भूमिकेत शक्ती आणि अथांग शांतता यांचा समतोल घेऊन येत आहे. आपल्या अनोख्या शैलीने तो मालिकेचे कथानक नक्कीच अधिक समृद्ध करेल.

जीएमसी जळगाव येथे ४४ वी सीएमई-पॅन : 'एव्हिडन्स-बेस्ड न्यूट्रिशन'वर भर

जळगाव : फिजिशियन्स असोसिएशन फॉर न्यूट्रिशन आणि गव्हर्नमेंट मेडिकल कॉलेज , जळगाव यांच्या संयुक्त विद्यमाने क्लिनिकल प्रॅक्टिसमध्ये एव्हिडन्स-बेस्ड न्यूट्रिशन इंटरव्हेन्शन या विषयावर अर्धदिवसीय सतत वैद्यकीय शिक्षण कार्यक्रम यशस्वीरित्या पार पडला. सकाळी ११ ते दुपारी १ या वेळेत झालेल्या या ४४ व्या सीएमई मध्ये प्राध्यापक, एमडी व एमबीबीएस विद्यार्थी मिळून एकूण २१५ सहभागी उपस्थित होते. दीर्घकालीन आजार तसेच ऑटोइम्यून विकारांच्या व्यवस्थापनात वैज्ञानिक आधार असलेल्या पोषण हस्तक्षेपांची भूमिका अधोरेखित करणे हा या सीएमई चा प्रमुख उद्देश होता. नॉन-कम्युनिकेबल डिसीजेस , ऑटोइम्युनिटी तसेच मल्टीडिसिप्लिनरी सहकार्याद्वारे रुग्णकेंद्री उपचार पद्धती बळकट करण्यावर सविस्तर चर्चा झाली.

स्विच ऑफ२०२५ मोहीम कुटुंबांना आनंदी क्षणांकडे परत जाण्यास प्रेरित करते

नवी दिल्ली, : आयुष्याच्या प्रत्येक क्षणात स्मार्टफोन असल्याने, कुटुंबांना जोडणारी जागा हळूहळू शांत होत चालली आहे. एकेकाळी एकत्र बोलणारे आवाज, कथा आणि उबदार हास्य यांनी भरलेले रात्रीचे जेवण आता बहुतेकदा स्क्रीनच्या प्रकाशात हरवले आहे.

# हर मास-एक उपवास'चा शंखनाद; तप, त्याग व उपवासाच्या गौरवगाथेचे गुणगान









**तभा वृत्तसेवा**

**छत्रपती संभाजीनगर, दि. १८ डिसेंबर :** दिल्लीतील भारत मंडपम येथे आयोजित दोन दिवसीय आंतरराष्ट्रीय जनमंगल परिषदेत 'हर मास-एक उपवास' (दर महिन्याला एक उपवास) या अभियानाचा अधिकृत शंखनाद करण्यात आला. जैन जगताचे तेजस्वी तपस्वी संत अंतर्मना आचार्य प्रसन्न सागरजी महाराज यांच्या प्रमुख उपस्थितीत हा कार्यक्रम संपन्न झाला. यावेळी जगभरातून हजारो गुरुभक्तांनी हजेरी लावली.

परिषदेला योगगुरु बाबा रामदेवजी, लोकसभा अध्यक्ष ओम बिरलाजी, केंद्रीय पर्यावरण मंत्री भूपेंद्र यादवजी, आचार्य बालकृष्णजी, बाबा बालकनाथ योगीजी, जैन संत लोकेश मुनिजी, इंडिया टीव्हीचे चेअरमन रजत शर्मा, डॉ. एस. के. सरीन, डॉ. अनुराग वारने, भारतीय शिक्षण बोर्डाचे चेअरमन एन. पी. सिंह यांच्यासह अनेक संत, विद्वान व लोकप्रतिनिधी उपस्थित होते.

आचार्य प्रसन्न सागरजी महाराज यांनी उपवासाचे महत्त्व विशद करताना उपवास हा केवळ शरीरापुरता मर्यादित नसून मन व आत्म्याच्या शुद्धीचा मार्ग असल्याचे सांगितले.

देशातील १४० कोटी जनतेने एक दिवस उपवास केल्यास लाखो टन अन्नाची बचत होऊ शकते, असे त्यांनी नमूद केले.

योगगुरु बाबा रामदेवजी यांनी जैन परंपरेतील तप, त्याग व अनुशासन भारताला आत्मबल देणारे असल्याचे सांगितले. लोकसभा अध्यक्ष ओम बिरलाजी यांनीही 'हर मास-एक उपवास'चा संकल्प करत अभियानास पाठिंबा दिला. यावेळी आचार्य श्रींच्या 'अष्टापद यात्रा' या पुस्तकाचे प्रकाशन करण्यात आले, अशी माहिती नरेंद्र अजमेरा, अभिजीत हिरप व पियुष कासलीवाल यांनी दिली.



## नर्मदा परिक्रमा अध्यात्मिक शुद्धी, आत्मज्ञान देणारी यात्रा

**तभा वृत्तसेवा**

**पारध : दि १८ डिसेंबर :** भोकरदन तालुक्यातील पारध

**- ह.भ.प. शिवा महाराज बावस्कर यांचे प्रतिपादन**

परिसरातील पिंपळगाव (रेणुकाई) येथे नर्मदा परिक्रमा पूर्णत्वानिमित्त एकदिवसीय कीर्तन, विविध पूजन विधी व भव्य महाप्रसादाचे आयोजन करण्यात आले होते.

दि. २ ऑक्टोबर रोजी श्री-क्षेत्र ओंकारेश्वर येथून ह.भ.प. विष्णू महाराज सास्ते, ऋषिकेश महाराज देशमुख, ऋषिकेश महाराज शेलुदकर, रोहित महाराज शेलुदकर व दीपक महाराज बावस्कर यांनी नर्मदा मैयाची पायी परिक्रमा सुरू केली होती. तब्बल तीन महिन्यांहून अधिक काळात ही परिक्रमा पूर्ण करून १२ डिसेंबर रोजी ओंकारेश्वर येथे परतल्यानंतर पिंपळगाव रेणुकाई येथे या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. यावेळी ह.भ.प. शिवा महाराज बावस्कर यांनी हरिकीर्तनातून नर्मदा परिक्रमा ही केवळ पायी यात्रा नसून आत्मिक शुद्धी, संयम व आत्मज्ञान देणारी अध्यात्मिक साधना असल्याचे सांगितले. नर्मदा परिक्रमा सुमारे ३,५०० किलोमीटरची असून निसर्गाच्या सान्निध्यात नियमपालन करत केली जाणारी ही यात्रा शारीरिक व मानसिक शक्ती देणारी आहे, असे त्यांनी नमूद केले.

कार्यक्रमास केंद्रीय मंत्री रावसाहेब दानवे पाटील यांच्या पत्नी निर्मलाताई दानवे यांच्यासह अनेक संत, महंत, वारकरी व मान्यवर उपस्थित होते. यावेळी परिक्रमावासी ह.भ.प. विष्णू महाराज सास्ते यांच्या कार्याचे उपस्थितांनी मनोगतातून कौतुक केले. कार्यक्रमानंतर सर्व भाविकांसाठी महाप्रसादाचे वाटप करण्यात आले.

## महिला उमेदवाराच्या घरासमोर 'करणी'

**तभा वृत्तसेवा**

**पैठण, दि १८ डिसेंबर :** पैठण नगर परिषद निवडणूकिसाठी २० डिसेंबर रोजी मतदान असलेल्या प्रभाग ३ अ मधील अनुसूचित जाती प्रवर्गातील महिला उमेदवाराच्या घरासमोर बुधवारी रात्रीच्या वेळी अज्ञात व्यक्तीने करणी, भुताटकी सारखा प्रकार केला असून या गोष्टीची चर्चा संपूर्ण पैठण भरात होत आहे.

नगरसेवक काळात रोडच्या कडेला बांधलेला बंगला तसेच आपत्य आक्षेप कारणाने उशीर झालेल्या प्रभाग क्रमांक ३ अ अनुसूचित जाती महिला प्रवर्गासाठी आरक्षित असलेल्या जागेवर शनिवार दिनांक २० डिसेंबर रोजी मतदान होत असून याठिकाणी भाजपा, शिव-सेना, उद्धव बाळासाहेब ठाकरे शिवसेना तसेच शरद पवार राष्ट्रवादी काँग्रेस पक्षात समोरासमोर लढत आहे.

निवडणुकीला दोन दिवस शिल्लक असतांना येणारी अमावस्या ग्रहित धरून अंधश्रद्धा मानणाऱ्या लोकांनी मंगल कल्याण मगरे उमेदवाराच्या घरासमोर रात्रीच्या अंधारात दृडी त्यात काळ्या भावल्या त्या भावल्यांना हळद, कुंकू लावून उमेदवार आणि त्यांच्या पतीचा फोटो,टाचणी टोचलेले लिंब,दोरा बांधलेला नारळ,काळा, हिरवा लाल कपडा,कवड्या, बिबे, पीठ, अगरबत्या, दिवा असा करणी, भुताटकीचा प्रकार केला. ही बाब समाजात याठिकाणी ते पाहण्यासाठी मोठी गर्दी झाली. नंतर वरील साहित्य जाळण्यात आले. संयुक्त पुरोगामी महाराष्ट्रात आज ही अंधश्रद्धा बाळ-



गली जात असून असे प्रकार थांबवण्यासाठी सरकारने उपाय योजना करणे गरजेचे झाले आहे. प्रशासनाकडून वरील भागात तपासणी करून दोषी विरुद्ध कारवाई करावी अशी मागणी होत आहे.

## एमजीएममध्ये स्टार्टअप लीग पिचिंग स्पर्धा संपन्न

**छत्रपती संभाजीनगर, दि.१८ :** महात्मा गांधी मिशनच्या ४३ व्या वर्धापन दिनानिमित्त एमजीएम विद्यापीठाच्या स्कूल ऑफ इंजिनिअरिंग अँड टेक्नॉलॉजी तर्फे स्टार्टअप लीग पिचिंग स्पर्धेचे यशस्वीपणे आयोजन करण्यात आले होते. या स्पर्धेत विविध शाळांमधील विद्यार्थ्यांनी आपला उत्स्फूर्त सहभाग नोंदविला. विजयी स्पर्धकांना मान्यवरांच्या हस्ते पारितोषिक देऊन सन्मानित करण्यात आले.

पारितोषिक वितरण समारंभास एमजीएमचे उपाध्यक्ष डॉ.पी.एम. जाधव, सचिव अंकुशराव कदम, एमजीएम विद्यापीठाचे कुलगुरू प्रा.डॉ.विलास सपकाळ, एमजीएम स्कूलच्या संचालिका डॉ.अपर्णा



कक्कड, स्कूल ऑफ इंजिनिअरिंग अँड टेक्नॉलॉजीच्या संचालिका डॉ. परमिंदर कौर व सर्व संबंधित मान्यवर उपस्थित होते.

स्पर्धेदरम्यान कृत्रिम बुद्धिमत्ता, रोबोटिक्स, सायबर सुरक्षा आणि स्मार्ट शिक्षण या क्षेत्रांतील विविध नाविन्यपूर्ण संकल्पना सादर करण्यात आल्या. या स्पर्धेचे परीक्षण सीए मिनल नाईक, नारायण इन्फ्रा-व्हेंचर्सचे संचालक ऋषिकेश गवळी, रुद्र टेक सर्व्हिसेसचे संस्थापक विक्रम वर्मा यांनी केले.

इंटरफिक्स या भारतातील पहिल्या एआय-आधारित प्रगत वेब सुरक्षा प्लॅटफॉर्मला प्रथम पारितोषिक, रोबो स्कॉड या नाविन्यपूर्ण रोबोटिक्स-आधारित उपाययोजनेला द्वितीय पारितोषिक, तर स्मार्ट वॉचच्या माध्यमातून आधुनिक व स्मार्ट शिक्षण संकल्पना मांडणाऱ्या द स्कूलबो या प्रकल्पाला तृतीय पारितोषिक प्रदान करण्यात आले. या कार्यक्रमाचे यशस्वी आयोजनामध्ये सिमरन सरहादी, समीर शेख, सुजित वैजवाडे, मोनाली मैद आणि वैदेही मंत्री यांनी महत्वाची भूमिका पार पाडली.

## जैनगिरी जटवाडा येथे लघु पंचकल्याणक उत्साहात

**तभा वृत्तसेवा**

**छत्रपती संभाजीनगर, दि १५ डिसेंबर :** श्री.१००८ संकटहर पार्श्वनाथ दिगबर जैन अतिशय क्षेत्र जैनगिरी जटवाडा येथे त्रिदिवसीय लघु पंचकल्याणक प्रतिष्ठा महोत्सव उत्साहात प्रारंभ झाला असुन सकाळी ध्वजारोहन होउैन अनिता दिलीप छाबडा परिवारा तर्फे करण्यात आले. तर मंडप उदघाटन जगदीश केशरसा साहुजी परिवार तर्फे करण्यात आले.

यावेळी प.पु.उपाध्याय विरंजन सागरजी महाराज, मुनिश्री विसौम्यश्रीसागरजी महाराज ससंघाची उपस्थिती होती. यावेळी सुत्रसंचालन अध्यक्ष विनीत लोहाडे यांनी केले



तर प्रास्ताविक महामंत्री प्रमोद पांडे यांनी केले.

यावेळी पंचकल्याणक अध्यक्ष मुकेश साहुजी, कार्याध्यक्ष विजयकुमार पहाडे, सचिव अशोक गंगवाल, विव्रैम साहुजी, प्रकाश कासलीवाल, दिलीप सेठी, जयचंद ठोले, अशोक गंगवाल, वैभव साहुजी यांच्यासह समाज बांधवांची उपस्थिती होती. यावेळी उपाध्याय विरंजनसागरजी महाराज यांनी उदबोधन करतांना सांगीतले की, पैशापेक्षा माणसाला तप, आराधना, साधना यांनी शाश्वत सुख समाधान प्राप्त होते. यावेळी पुष्पादेवी गंगवाल, जितेद्र पाटणी, ललीतकुमार लोहाडे, अल्कादेवी गंगवाल, आनंद सेठी, संजय टोंग्या परिवार यांच्यासह समाज बांधवांची मोठया संख्येने उपस्थिती होती.

## आयडीएफसी फर्स्ट ग्लोबल सेव्हिंग्ज सादर

**मुंबई :** आयडीएफसी फर्स्ट बँकेने गुजरातमधील गिफ्ट सिटीद्वारे अनिवासी भारतीयांसाठी (एनआरआय) विशेषतः डिझाइन केलेले 'आयडीएफसी फर्स्ट ग्लोबल सेव्हिंग्ज अकाउंट इन यूएसडी आणि युरो' सादर केले आहे. ही ऑफर देशांतर्गत किंवा एनआरआय बचत खात्यापेक्षा वेगळी आणि विशेषतः अशा ग्राहकांसाठी डिझाइन केलेली आहे जे परकीय चलनात बचत खाते चालवू आणि राखू इच्छितात आयडीएफसी फर्स्ट बँकेचे प्रमुख रिटेल लायबिलिटीज आशिष सिंग म्हणाले, फर्स्ट ग्लोबल सेव्हिंग्ज अकाउंट हे अनिवासी भारतीयांना भारतासोबत बँकिंग कसे करावे हे पुन्हा परिभाषित करण्यासाठी सज्ज आहे. या प्रस्तावद्वारे, आम्ही अनिवासी भारतीयांना त्यांचे बचत खाते यूएसडी किंवा युरोमध्ये ठेवण्याची, उच्च व्याजदर मिळविण्याची, शून्य शुल्क रेमिटन्स मिळविण्याची आणि विश्र्वास आणि उच्च सुरक्षिततेसह आयडीएफसी फर्स्ट उच्च दर्जाचा डिजिटल अनुभव घेण्याची सुविधा देतो.

## फारोळा घरपट्टी-पाणीपट्टीवर ५०% सवलतमध्ये नागरिकांचा प्रतिसाद

**तभा वृत्तसेवा**

**बिडकीन दि १७ डिसेंबर :** निवासी मालमत्ता कर घरपट्टी, पाणीपट्टी आणि दिवाबत्ती कर या सर्वावर एकरकमी भरपाई केल्यास थकीत रकमेवर थकीत रकमेवर तब्बल ५० टक्के सवलत देण्याची घोषणा करण्यात आली आहे. ही योजना ३१ डिसेंबर २०२५ पर्यंतच लागू राहणार आहे या आदेशाची अंमलबजावणी दि १३ नोव्हेंबर रोजी करण्यात आली आहे.

यावरून पैठण तालुक्यातील फारोळा ग्रामपंचायत सरपंच सलीम महमंद पठाण यांच्या अध्यक्षतेखाली ग्रामविकास अधिकारी आशा तुपे यांनी



ग्रामसभा घेऊन यांनी कर वसुलीवर ५०% सवलत देण्याची घोषणा केली आहे. यामुळे पाणीपुरवठा, रस्ते, वीजबिल, कर्मचारी पगार, गावामध्ये सुविधा देण्यासाठी , यांसारख्या नियमित कामांमध्ये अडचणी निर्माण होत आहेत मुख्यमंत्री समृद्ध पंचायत राज अभियान अंतर्गत गांवाचा आर्थिक पाया मजबूत करण्यासाठी ही सवलत देण्यात आली आहे. तरी नागरिकांनी या योजनेचा लाभ घेऊन आपली थकीत असलेली बाकी ५० % रक्कम दि ३१ डिसेंबरपर्यंत जमा करण्यात यावी असे ग्रामपंचायत सरपंच सलीम महमंद पठाण ग्रामविकास अधिकारी आशा तुपे यांनी नागरिकांना आवाहन केले होते.

फारोळा ग्रामपंचायत अंतर्गत नागरिकांनी कर थकबाकी भरत असल्याने नागरिकांचा प्रतिसाद मिळत आहे.

### कॅप्चर सीएक्स सातत्यपूर्ण नफ्याची नोंद

**मुंबई :** पूर्ण स्टॅक, एआय-आधारित एंटरप्राइज कस्टमर एक्सपीरियन्स प्लॅटफॉर्म असलेल्या कॅप्चर सीएक्स ने आज सातत्यपूर्ण नफ्याची नोंद तसेच वर्षागणिक ८० टक्के मजबूत वाढ जाहीर केली.

**श्रीमती नाथीबाई दामोदर ठाकरसी महिला विद्यापीठ**
१, नाथीबाई ठाकरसी मार्ग, मुंबई-४०० ०२०
दूरध्वनी क्र.०२२-२२०९१५७७.

**जाहिर प्रकटन**

मैत्री शिक्षण प्रसारक मंडळ, जि. छत्रपती संभाजीनगर मंडळाचे सावित्रीबाई फुले महिला महाविद्यालय, भावसिंगपुरा पडेगाव रोड, ता व जि. छत्रपती संभाजीनगर महाविद्यालयाच्या व्यवस्थापनाचे हस्तांतरण करणेबाबतचा प्रस्ताव विद्यापीठात प्राप्त झाला असून, याबाबत हरकती किंवा सुचना असल्यास दिनांक ३०/१२/२०२५ संध्याकाळी ५.०० वाजेपर्यंत संलग्नता विभाग एस. एन. डी.टी. मुंबई यांच्याकडे सादर कराव्यात.

कुलसचिव

**जाहीर प्रगटन**

सर्व जनतेस सूचित करण्यात येते येते की माझे,पक्षकार श्री सांडू करीम देशमुख रा.सोयगाव यांनी मयत सईदाबी रा.बहुलखेडा तालुका सोयगाव यांनी रामपुरा येथील जमीन गट न.९६/३ क्षेत्र १ हे २१ आर रा.बहुलखेडा ता.सोयगाव येथील जमीन विकत घेण्याचा सौदा केलेला आहे. त्यांनी व त्यांच्या वारसांनी माझे पक्षकाराच्या हक्कात नोदणीकृत सौदा पावती करून दिलेली आहे. मात्र मयत सईदाबी यांच्या निधनानंतर त्याच्या वारसांनी उपरोक्त जमीन परस्पर विक्री करण्याचा प्रयत्न सुरु केला आहे.त्यामुळे माझ्या पक्षकाराने मा.दिवाणी न्यायालय सोयगाव येथे त्यांच्या विरुद्ध दिवाणी दावा क्र.१०५/२५ दाखल केलेला आहे व तो प्रलंबित आहे.

तरी सर्व जनतेस कळविण्यात येते की जमीन गट न. ९६/३ मौजे रामपुरा बाबत कोणीही खरेदी विक्रीचा व्यवहार करू नये अन्यथा त्यांच्या विरुद्ध योग्य ती कायदेशीर कारवाही करण्यात येईल यांची नोंद असू द्यावी.करिता जाहीर प्रगटन दिले असे.

दिनाक- १७/१२/२०२५

ॲड.राजेश अ.गिरी
रा.आमखेडा ता.सोयगाव
जिल्हा - छत्रपती संभाजीनगर
मो.न.८४५९९५३८४०.
करीम देशमुख

**जाहीर प्रगटन**

**मा. दिवाणी न्यायाधीश (क. स्तर) सोयगांव यांचे न्यायालयात, जि. औरंगाबाद**

दिवाणी किरकोळ अर्ज क्रं. ३२२/२०२५

१. रविंद्र एकनाथ जोहरे, वय २३ वर्षे, धंदा शेती, रा. सोयगांव, ता. सोयगांव, जि. छत्रपती संभाजीनगर, २. किरण एकनाथ जोहरे, वय २० वर्षे, धंदा शेती, रा. वरीलप्रमाणे. ३. रुख्मन एकनाथ जोहरे, वय ४० वर्षे, धंदा शेती, रा. वरीलप्रमाणे, ४. सोनाबाई दादुबा जोहरे, वय ६० वर्षे, धंदा शेती, रा. वरीलप्रमाणे.

विरुद्ध

निल

प्रकरण :- वारसाहक्क (सक्सेशन) प्रमाणपत्र मिळणे बाबत

सर्व संबंधितास जाहिर प्रकटनाद्वारे कळविण्यात येते की, उपरोक्त अर्जदाराने वारसाहक्क प्रमाणपत्र मिळणेसाठी ड. स्वप्निल र. सुरळकर, सोयगांव, ता. सोयगांव, जि. छत्रपती संभाजीनगर यांच्या मार्फत या न्यायालयात अर्ज दाखल केलेला आहे. मयत एकनाथ दादुबा जोहरे यांचा दिनांक ३०/०९/२०२४ रोजी गव्हर्नमेंट मेडीकल कॉलेज औरंगाबाद येथे मृत्यु झालेला असुन त्यांच्या पश्यात वरील अर्जदार क्रं. १ ते ४ हे त्यांना वारस आहे, असा अर्ज मा. न्यायालयात दाखल केलेला आहे. अर्जदार क्रं. १ ते ४ हे मयत एकनाथ दादुबा जोहरे यांचे वारस असुन त्यांना शासकिय/निमशासकिय कामासाठी वारसप्रमाणपत्रासाठी आवश्यकता आहे. तरी ज्या कोणाला अर्जदाराच्या वारस प्रमाणपत्र देण्याकरीता उजर अगर आक्षेप यांनी हे जाहीर प्रकटनाद्वारे प्रसिद्ध केल्यापासन ३० दिवसांच्या आत या न्यायालयात योग्य त्या कागदपत्रासह आपला आक्षेप नोंदवावा अन्यथा अर्जदार यांना कायदेशीररित्या योग्य ते प्रमाणपत्र देण्यात येईल. आज रोजी दिनांक १८/१२/२०२५ रोजी सही व न्यायालयाच्या शिक्क्यासह दिले असे.

पु.ता. २१ /०१/२०२६

विभीगीय लिपीक
आदेशावरुन,
सहाय्यक अधीक्षक
(दिवाणी व फौजदारी न्यायालय सोयगवि.)

प्रतिलीपी :-
१. नोटीसबोर्ड, दिवाणी व फौजदारी न्यायालय सोयगांव,
२. नगरपंचायत सोयगांव, सोयगांव जि. औरंगाबाद.

**जाहीर प्रगटन**

**मा.आर.एस.तापडीया दिवाणी न्यायाधीश साहेब, क स्तर, कन्नड, यांचे न्यायालयात.**

दि.कि अजनं. ५३६/२०२५
पुढील तारीख १९/१२/२०२५

अर्जदार

१-रविंद पिता मन्सुब जाधव ३४ वर्षे धंदा शोती. रा. मु.पो.बहिरगाव, ता. कन्नड औरंगाबाद, २- आशाबाई मन्सुब जाधव ६५ वर्षे धदा घरकाम, रा. मु.पो. बहिरगांव, ता कन्नड, जि. औरंगाबाद,

विरुद्ध

गैर अर्जदारः निरंक

अर्जः अजदार क्र. १ व २ हे मयत नाम मन्सुब महादू जाधव कायदेशीर वारसाप्रमाणपत्र मिळणे बाबत, ज्यालार्थी अर्जदारांनो त्यांचे विधिज्ञ ॲड व्ही. बी. काळे यांच्या मार्फत मा. न्यायालयात अर्ज सादर केला आहे की. अनंदार क्र. १व २ हे वरील प्रमाणे कायमचे रहिवासी आहे. मयत ना मन्सुब महादु जाधव यांचे अर्जदार क्र. १ मुलगा असून अर्जदार क्र. २ पत्नी आहे. मयत नागे मन्सूय महादू जाधव यांना अर्जदार क्र.१ व २ व्यतिरीक्त कोणीही बारस नाहीत मयत मन्सुब महादू जाधव अर्जदार क्र. १ चे वडील तसेच अर्जदार क. २ चे पती हे दि. ०१/११/२०२१ रोजी मयत झालेले आहे. तसेच त्यांधा हा बहोरगाव, ता. कन्नड येथे करण्यात आलेला आहे. मयत मन्सुब महादू जाधव यांना अर्जदाराशिवाय कोणतेही कायदेशीर वारस नाहीत. मयत यांना मिळणारा शासकीय निमशासकीय योजनेचा लाभ घेण्यासाठी अर्जदार यांना वारस प्रमाणपत्राची आवश्यकता आहे. तसेच संबंधित तलाठी बानो मयत्ताच्या नार्थ असलेल्या स्थापर तसेच जंगम मिळकतीमध्ये वारसाची नोंद घेण्यासाठी मा. न्यायालयातुन वारस प्रमाणपत्र आणायचे सांगितले त्यामुळे सदर अर्ज दाखल करण्यास कारण घडले. अर्जदार यांनी सदर अनांव्यतिरीक्त इतर कोणत्याही मा. न्यायालयात बारस प्रमाणपत्र मिळण्यासाठी अर्ज दाखल केलेला नाही. त्याला सदर जाहीर प्रगटन व्दारे सर्व जनतेस कळविण्यात येते की, अर्जदार यांनी अर्ज केल्या नुसार वारसा प्रमाणपत्रासाठी परवानगी देण्या वाचत ज्या कुणास कुवत्याही स्वरुपाचा उजर आक्षेप वगैर असल्यास त्यांनी हे जाहीर प्रगटन प्रसिध्द झाल्यापासून तीस (३०) दिवसांच्या आत आपला उजर, आक्षेप मा. न्यायालयात नौदयावा मुदतीत उजर आक्षेप न आल्यास अर्जदाराच्या नाचे वारसा प्रमाणपत्र देण्यात येईल. त्यानंतर आलेला उत्तर आक्षेप ग्रह धरला जाणार नाही, याची नोंद घ्यावी.

दि. १६/१२/२०२५

कनिष्ट लिपीक
आदेशावरून
सहायक अधिक्षक, दिवाणी न्यायाधिश क. स्तर, कन्नड

## अग्रलेख...

# एकेक 'रोशन' शोधून काढा...

चंद्रपूर जिल्ह्यातील नागभीड तालुक्यातल्या मथुर गावातल्या रोशन कुळे या शेतकऱ्याला सावकारी कर्जापायी आपली किडनी विकावी लागली...! खरंच माणुसकी जिवंत आहे का, असा भयावह प्रश्न उपस्थित करणारी ही दुर्दैवी घटना. व्यवस्थेच्या निष्ठुर झालेल्या काळजाचे हे वास्तव. आपल्या लेकरावर ही वेळ आल्याचे पाहून 'काळ्या आई'चा आत्मा किती दुखावला असेल!... सावकारांनी रोशन यांच्याभोवती कर्जाचा सापळा रचला, तब्बल २० टक्के व्याज आणि प्रतिदिन ५ हजार रुपये भुर्दंड बसवून एका लाखाचे ७४ लाख केले. कळस म्हणजे हे कर्ज फेडण्यासाठी याच सावकारांनी रोशनला त्याची दुचाकी, शेतीची अवजारे, ट्रॅक्टर विकून झाल्यावर, किडनी विकण्याचा अमानुष सल्ला दिला आणि रोशनचा नाईलाज त्याच्या अवयवाहून मोठा झाला. कोणत्याही सहृदय माणसाचे मन हेलावून जाईल, अशी ही घटना.

मथुर नावाचे छोटेसे गाव. तिथे राहणारा रोशन कुळे नावाचा तरुण शेतकरी आई-वडील, भाऊ, पत्नी आणि २ चिमुकल्यांसह आनंदातच जगत होता. चार एकरावर तो शेती करायचा. हात-पाय चालत होते, डोळ्यात स्वप्नं होती आणि काळजात 'काळ्या आई'विषयी अपार आस्था होती. पण व्यवस्थेने त्याला अशा वळणावर आणून सोडले की आपल्या घरच्या माणसांना सन्मानाने जगवण्यासाठी, सावकाराचे कर्ज फेडण्यासाठी त्याला स्वतःच्या शरीराचा लचका तोडून विकावा लागला. सावकारी कर्जाचा डोंगर उपसण्यासाठी या अन्नदात्याने चक्क स्वतःची किडनी विकली, हे पाहून, ऐकूनही ज्याच्या डोळ्यात अश्रू येत नसतील तर आपल्याला माणुसकीचे काहीही सोयरसुतक उरलेले नाही, हे समजून जा. ही केवळ एका रोशनची शोकांतिका नाही, तर हा संपूर्ण महाराष्ट्रातील शेतकऱ्यांच्या गळ्याला पडलेला फास आहे. दशके उलटली, सरकारे आली आणि गेली. दरवर्षी विधिमंडळ सभागृहाच्या पायऱ्यांवरून शेतकरी कल्याणाच्या गप्पा मारल्या जातात. आम्ही कर्जमाफी दिली, सन्मान निधी दिला, पीक विमा दिला, अशा घोषणांचा पाऊस पडतो. कोट्यवधी रुपयांचे पॅकेजेस जाहीर होतात. तरीही प्रश्न उरतो की, या योजना खरोखरच गरजूंपर्यंत पोहोचत असतील तर मग 'रोशन'ला किडनी का विकावी लागली? सारेच राजकीय नेते आपण शेतकऱ्यांची लेकरे आहोत, असे उच्चरवाने सांगतात. सारेच राजकीय पक्ष आपल्या जाहीरनाम्यात शेतकऱ्यांना 'राजा' म्हणतात. पण हा राजा किती कंगाल झालाय, याचा कुणालाही अंदाज नाही. सरकारी कागदांवर शेतकरी श्रीमंत दिसत असेलही; पण मातीत राबणारा बळीराजा बव्हंशाने आजही दारिद्र्याच्या दलदलीत रुतलेला आहे.

महाराष्ट्रातील शेतकऱ्यांची आर्थिक स्थिती म्हणजे उघडी भळभळणारी जखमच आहे. आकडेवारी काय सांगते? नॅशनल क्राईम रेकॉर्ड ब्युरोच्या अहवालानुसार, भारतात सर्वाधिक शेतकऱ्यांच्या आत्महत्या महाराष्ट्रात होतात. १ जानेवारी ते ३१ डिसेंबर २०२४ या काळात या प्रगतिशील राज्यात एकूण २७०६ शेतकऱ्यांनी जीवनयात्रा संपवली. त्यातही सर्वाधिक १०६९ आत्महत्या एकट्या अमरावती विभागात झाल्या. अगदी ताज्या अहवालानुसार, २०२५ च्या सुरुवातीच्या ९ महिन्यांत अर्थात सप्टेंबरपर्यंत मराठवाड्यात ७८१ शेतकऱ्यांनी मृत्यूला कवटाळले. अवघ्या महाराष्ट्राचा विचार केला तर ही संख्या फार मोठी होईल. शेतकऱ्यांच्या मृत्यूंचे हे आकडे भयावह आहेतच. शिवाय, जिवंतपणी मरण यातना भोगणाऱ्या शेतकरी कुटुंबांची संख्याही लाखोंच्या घरात आहे. रोशन हा अशा दुर्भाग्याचे लेणे कपाळी आलेल्यांपैकी एक. महाराष्ट्रात सुमारे ८२ टक्के शेतकरी अत्यल्प भूधारक आहेत. लहरी वातावरण, महाग बियाणे, रासायनिक खत आणि पुरेशा साधनसामुग्रीच्या अभावाने उत्पन्नाचा आणि खर्चाचा ताळमेळ बसत नसल्याने प्रति कुटुंब सरासरी १ ते १.५०० लाखांहून अधिक कर्ज शेतकऱ्यांच्या डोक्यावर आहे. शासनाच्याच आकडेवारीनुसार, कर्जमाफीनंतरही ७० टक्के शेतकरी कर्जाच्या जाळ्यातून मुक्त झालेले नाहीत. एकीकडे निसर्ग झोडपत असतो, सरकारच्या लहरींचा कहर असतो आणि गावागावांत सावकारांचा ससेमिरा असतो. महाराष्ट्रात 'सावकारी प्रतिबंधक अधिनियम २०१४' हा कडक कायदा अस्तित्वात आहे. विनापरवाना सावकारी करणे हा अजामीनपात्र गुन्हा आहे. तरीही गावोगावी सावकारांची समांतर सत्ता चालते. वीस-वीस टक्के किंवा त्याहून अधिक मासिक व्याजाने ते शेतकऱ्याला कर्ज देतात. लहानसा कर्जाचा आकडाही काही वर्षांत लाखांच्या घरात जातो. सावकार केवळ शेतकऱ्यांना लुबाडत नसतात. ते साऱ्या व्यवस्थेची लक्तरे फाडत असतात. शेतकऱ्यांना पायाशी लोळण घ्यायला लावतात आणि प्रसंगी मरण पत्करायला भाग पाडतात. कागदपत्रांवर स्वाक्षऱ्या घेणे, कोरे धनादेश घेणे किंवा अवघी जमीनच आपल्या नावावर करून घेण्याचे प्रकार आजही महाराष्ट्रात राजरोस सुरू आहेत. प्रशासन आणि पोलिस यंत्रणा यावर आळा घालण्यात अपयशी ठरली आहे. अनेकदा या सावकारांना स्थानिक राजकारण्यांचे अभय असते. रोशन कुळे या शेतकऱ्याने किडनी विकली. कारण सावकारांचा तगादा त्याच्या आत्मसन्मानाला पटत नव्हता. कर्जाचे व्याज घ्यायला आलेला सावकार बायको-मुलांसमोरच त्याची इज्जत काढायचा. एकदाचे हे संपवू आणि पुन्हा आपल्या कुटुंबासह आनंदाने जगू, असा विचार करून, अगदी मनावर दगड ठेवूनच रोशनने आपली किडनी विकली असणार. जगण्यासाठी आवश्यक असलेला अवयव विकताना त्याच्या काळजाला असंख्य छिद्रे पडली असतील. पण कुठे फिटले त्याचे कर्ज? कंबोडियाला जाऊन किडनी विकल्यानंतरही केवळ आठ लाख रुपये आले. कर्ज तर व्याजावर व्याज चढून ७४ लाखांचे झाले होते. त्याने हे पूर्ण कर्ज फेडले पाहिजे, असे ही व्यवस्था आणि आपला समाज म्हणत असेल तर त्याला उरलेले अवयव एका झटक्यात विकावे लागतील. अन्यथा ७४ लाखांचे दीड कोटी काही महिन्यांत होतील!

रोशनसारख्या अनेक शेतकऱ्यांचे असेच हाल आहेत. रोशनवर किडनी विकण्याचा प्रसंग आला. इतरांनाही काही ना काही विकावेच लागते. शेतकरी कर्जासाठी बँकांकडे का जात नाहीत, हाही एक महत्त्वाचा प्रश्न आहे. बँकांचे नियम, 'सिबिल स्कोअर'ची अट आणि कागदपत्रांचा ढीग सामान्य शेतकऱ्यांना समजण्यापलीकडचा आहे. बँकेत गेल्यावर व्यवस्थापकांकडून मिळणारी अपमानास्पद वागणूक आणि कर्जासाठी लागणारे हेलपाटे यापेक्षा शेतकऱ्याला सावकाराचा उंबरठा जवळचा वाटतो. सावकार कागद विचारत नाही. फक्त कुठल्या तरी कागदावर सही घेतो आणि चटकन पैसे देतो. सावकार त्याच क्षणी शेतकऱ्याच्या आयुष्याची दोरी आपल्या हाती घेतो. बँकिंग व्यवस्था शेतकऱ्यांना दिलासा देऊ शकत नाही तेव्हाच अवैध सावकारांचे फावते. एखाद्याला अडकित्त्यात धरावे तसे सावकार बळीराजाला अडवून ठेवतो. रोशन कुळे यांची व्यथा समोर आली म्हणून आज आपण हळहळतो आहोत. पण विदर्भ, मराठवाडा आणि खान्देशाच्या कोनाकोपऱ्यात असे कितीतरी 'रोशन' असतील, ज्यांनी कदाचित आपल्या घरातील दागिने, बैलजोडी आणि स्वतःचे अवयवही गहाण ठेवले असतील. विकलेही असतील. आता असा एकेक 'रोशन' शोधण्याची आणि त्याच्या पाठीशी उभे राहण्याची वेळ आली आहे. रोशन कुळे यांच्या प्रकरणाची तर शासनाने, प्रशासनाने सखोल चौकशी करावी आणि सावकारांना दंडित करावेच. शिवाय, शेतकऱ्यांवर कुठे-कुठे अन्याय होत आहे, हेही पटवारी, कोतवाल, ग्रामसेवकांना कामाला लावून तातडीने शोधले पाहिजे. अवैध सावकारी आणि त्यातून घडलेली ही शोकांतिका ही माणुसकीला लागलेली कीड आहे. सरकारसाठी हा आत्मचिंतनाचा विषय आहे. पाठ थोपटून घेणे फार झाले. घोषणाबाजी पुरे झाली. विरोधी पक्षांचे 'नॉन इश्यूज'वर ढोल बडविणेही आता थांबले पाहिजे. शेवटच्या शेतकऱ्यापर्यंत कर्ज पोहोचतेय का, याची शहानिशा करताना त्यासाठीची व्यवस्था तत्काळ दुरुस्त केली पाहिजे. सत्ताधारी आणि विरोधक या दोघांनीही त्यासाठी झटले पाहिजे. अन्यथा, ज्या हातांनी आपल्याला अन्न मिळते, तेच हात उद्या रिकामे आणि छिन्नविछिन्न अवस्थेत दिसतील आणि इतिहासाच्या पानावर हे कायमचे कोरले जाईल की, एका प्रगत राज्यात शेतकऱ्याला सावकाराचे कर्ज फेडण्यासाठी आपली किडनी विकावी लागली!


## तंत्रवेध

**डॉ. दीपक शिकारपूर**

# वेब ४.० तंत्रज्ञान

एकविसाव्या शतकाची सुरुवात होऊन आता २५ वर्षे झाली आहेत. तरीही, गेल्या पंधरा-वीस वर्षांमध्ये तंत्रज्ञानात, समाजजीवनात ज्या प्रकारे बदल झाले, तितके त्याआधीच्या ५० वर्षांमध्येही झाले नव्हते असे म्हणता येईल. कॉम्प्युटर, इंटरनेट, त्यानंतर आलेला स्मार्टफोन या त्रिकुटामुळे महानगरांपासून खेड्यांपर्यंत सर्वांच्याच जीवनात फरक पडला. आपल्या आसपासच्या डिजिटल विश्वाची सतत उत्क्रांती होत राहणार आहे. आजचे इंटरनेट मुख्यतः माहिती शोधणे, संवाद साधणे आणि व्यवहार करण्यापुरते मर्यादित आहे; परंतु उद्याचे इंटरनेट अधिक वेगवान, बुद्धिमान, सुरक्षित आणि मनुष्यकेंद्रित असेल. विशेषतः कृत्रिम बुद्धिमत्ता, मिश्र-वास्तव, ६ जी नेटवर्क आणि ब्लॉकचेन यामुळे इंटरनेटचा अनुभव संपूर्णपणे बदलणार आहे. उद्याचे इंटरनेट सर्वप्रथम त्याच्या वेग आणि क्षमतेमुळे ओळखले जाईल. ६ जी नेटवर्क भरपूर वेग प्रदान करेल आणि विलंब वेळ जवळपास शून्य असेल. यामुळे स्वयंचलित वाहने, रोबोटिक सर्जरी आणि मोठ्या प्रमाणात उपकरणांचे संचालन सहजशक्य होईल. 'इंटरनेट ऑफ थिंग्ज'चा विस्तार इतका वाढेल की घरातील प्रत्येक उपकरण, शहरे, उद्योग आणि वाहतूक व्यवस्था इंटरनेटला जोडलेली असेल. या परिवर्तनाचा पुढील टप्पा म्हणजे एआय चालित इंटरनेट. भविष्यातील इंटरनेट फक्त निर्देश दिल्यावर काम करणार नाही, तर वापरकर्त्याच्या गरजा आधी ओळखून सेवा देईल. वैयक्तिक सवयी, आवाज, भाव-भावना, आणि वर्तन यांचे विश्लेषण करून इंटरनेट प्रत्येक वापरकर्त्याला स्वतंत्र अनुभव देईल. शिक्षण, आरोग्य, बँकिंग, शॉपिंग आणि शासन या सर्व ठिकाणी एआय एजंट्स वापरकर्त्यांच्या वतीने निर्णय घेतील, कामे करतील आणि समस्यांचे निराकरण करतील. इंटरनेट अधिक संवेदनशील आणि परिस्थितीपरत्वे बदलणारे होईल, ज्याला 'प्रिडिक्टिव्ह इंटरनेट' म्हणता येईल.

अशा या सर्व बदलांच्या पृष्ठभूमीवर वेब ४ हे पुढील पिढीचे इंटरनेट म्हणून उदयास येत आहे. वेब १.० वाचण्यासाठी (ब्राऊजर) होते, वेब २.० वाचण्यासाठी आणि लिहिण्यासाठी तसेच सोशल मीडिया, इंटरॲक्टिव्हिटी साधणारे होते. वेब ३.० सिमेंटिक वेब असल्याने मशीन डेटाचा अर्थ समजून घेते. या पृष्ठभूमीवर वेब ४.० ची प्रमुख वैशिष्ट्ये लक्षात घेण्याजोगी आहेत. कृत्रिम बुद्धिमत्ता आणि मशीन लर्निंग वेब ४.० च्या केंद्रस्थानी एआय असेल. हे




वापरकर्त्याची गरज ओळखून विशिष्ट आणि वैयक्तिकृत सेवा देण्यासाठी डेटाचे विश्लेषण करेल. मानव-मशीन सहकार्य यात पाहायला मिळेल. डिजिटल उपकरण मानवी भावना आणि हेतू अधिक चांगल्या प्रकारे समजून घेतील आणि वापरकर्त्यासोबत भागीदाराप्रमाणे काम करतील. अखंड आणि सर्वव्यापी कनेक्टिव्हिटी हे याचे ठळक वैशिष्ट्य असेल. इंटरनेट ऑफ थिंग्जच्या माध्यमातून कार, स्मार्ट उपकरणे, घरे इत्यादी रोजच्या वापरातल्या वस्तू वेबशी जोडल्या जातील आणि संवाद साधतील. संवर्धित वास्तविकता आणि आभासी वास्तविकता हे या तंत्राचे वैशिष्ट्य भन्नाट असेल. वापरकर्ते केवळ मॉनिटरवर माहिती पाहण्याऐवजी आभासी जगात वावरतील. विकेंद्रीकरण आणि ब्लॉकचेनच्या अनुषंगानेही याचे महत्त्व मोठे असेल. डेटा आणि व्यवहारांची सुरक्षा, पारदर्शकता आणि मालकी वापरकर्त्याकडे राहील. या तंत्राद्वारे व्यवहार करताना डिजिटल सहायक लगेच निर्णय घेईल आणि व्यवहार पूर्ण करेल. इंटरनेटचा अनुभव फक्त डिजिटल न राहता मानवी स्वरूपाचा होईल.

वेब ४.० हे इंटरनेटला 'मानवी भाव' देणारे युग असेल. वेब ४.० ला सिम्बायोटिक वेब किंवा इंटेलिजेंट वेब असेही म्हणतात. ही वर्ल्ड वाईड वेबची पुढील पिढी आहे, जी मानव आणि डिजिटल उपकरणांमध्ये अधिक सहज आणि बुद्धिमान संवाद साधण्यावर केंद्रित आहे. यामुळे इंटरनेट आणखी शक्तिशाली होईल. मागील वेब आवृत्त्यांपेक्षा हे अधिक प्रगत असेल. वेब ४.० चे तंत्र समजून घेण्यासाठी आणि आत्मसाद करण्यासाठी काय करावे, हा एक महत्त्वाचा प्रश्न येथे उपस्थित होतो. कृत्रिम बुद्धिमत्ता आणि यंत्र शिक्षण येथे महत्त्वाचे ठरते. केवळ संगणकीय भाषा (कोडिंग) शिकण्याऐवजी, माहितीचे विश्लेषण करून निर्णय घेणारे अल्गोरिदम (गणिती सूत्रे) कसे तयार करायचे हे यासाठी शिकायला हवे. पायथॉनसारख्या संगणकीय भाषांचा सखोल अभ्यास करावा लागेल. त्याचबरोबर वेगवेगळ्या उपकरणांना (गॅझेट्सना) इंटरनेटने कसे जोडायचे आणि त्यांच्याकडून मिळालेल्या माहितीचा उपयोग कसा करायचा, यावर लक्ष केंद्रित करावे लागेल. विकेंद्रित साखळी (ब्लॉकचेन) अर्थात माहितीची सुरक्षा आणि पारदर्शकता राखणाऱ्या ब्लॉकचेन तंत्रज्ञानाचे मूलभूत सिद्धांत (तत्त्वे) समजून घ्यावे लागतील. त्यासाठी प्रात्यक्षिक आणि थेट औद्योगिक कामावर भर द्यावा लागेल. नुसते पुस्तकी ज्ञान न घेता स्वतःचे छोटे कृत्रिम बुद्धिमत्ता मॉडेल किंवा वस्तूंचे इंटरनेट आधारित ॲप तयार करावे लागेल. यामुळे तुमचा अनुभव वाढेल. कोणत्याही गुंतागुंतीच्या तांत्रिक अडचणीवर योग्य तोडगा काढण्याची क्षमता विकसित करावी लागेल, कारण या क्षमतेला जास्त मागणी असेल.

या अनुषंगाने ज्ञान सातत्याने वाढवणे महत्वाचे ठरावे. प्रमाणपत्र अभ्यासक्रमांचे (सर्टिफिकेशन) महत्त्व येथे ओळखता येईल. जागतिक स्तरावर मान्य असलेल्या क्लाऊड, सायबर सुरक्षा आणि यंत्र शिक्षण क्षेत्रातील प्रमाणपत्रे मिळवणे कामी येईल. शिकणाऱ्यांनी या अनुषंगाने भावनिक आणि संवाद कौशल्ये विकसित करावीत. तुम्ही तयार केलेले जटिल तंत्रज्ञान सहकाऱ्यांसमोर किंवा ग्राहकांसमोर सोप्या भाषेत स्पष्टपणे मांडता आले पाहिजे. मोठ्या आणि विविध विषयांवरील प्रकल्पांमध्ये (प्रोजेक्ट्समध्ये) टीमसोबत जुळवून घेण्याची कला आत्मसात करावी लागेल. वेब ४.० मध्ये एआय एजंट्स आपल्या वतीने काम करतील. खरेदीपासून प्रवासापर्यंत, आरोग्य तपासणीपासून गुंतवणुकीपर्यंत डिजिटल सहायक लगेच निर्णय घेईल आणि व्यवहार पूर्ण करेल. इंटरनेटचा अनुभव फक्त डिजिटल न राहता मानवी स्वरूपाचा होईल. हे इंटरनेटला 'मानवी भाव' देणारे युग असेल. यामुळे समाजात सर्व क्षेत्रांमध्ये मोठे सकारात्मक बदल घडतील. शिक्षण अधिक वैयक्तिक आणि आभासी होईल; विद्यार्थी जगभरातील वर्गखोल्यांमध्ये प्रत्यक्ष उपस्थित असल्यासारखे शिकू शकतील. आरोग्यक्षेत्रात एआय आधारित निदान, दूरस्थ शस्त्रक्रिया आणि वैयक्तिक हेल्थ मॉनिटरिंग सामान्य होईल. उद्योगांमध्ये स्मार्ट फॅक्टरी आणि डेटा-आधारित निर्णयप्रक्रिया वाढेल. शासनातील सेवा पूर्णपणे डिजिटल आणि तत्काळ उपलब्ध होतील. उद्याचे इंटरनेट हे अधिक वेगवान, सुरक्षित, बुद्धिमान आणि मानवी स्वरूपाचे असेल. वेब ४.० ही मानव आणि मशीन यांच्यातील बुद्धिमान भागीदारीची नवी क्रांती असेल. येऊ घातलेला बदल फक्त तंत्रज्ञानापुरता मर्यादित न राहता संपूर्ण समाजव्यवस्था, शिक्षण, उद्योग आणि मानवी जीवनपद्धती यावर खोलवर परिणाम करणार आहे.

(लेखक उद्योजक व संगणक साक्षरता प्रसारक आहेत.)

## वेध

**नंदकिशोर काथवटे**

# हरवलेले शिक्षण..!

आज शिक्षण हा विषय केवळ धोरणांचा किंवा अभ्यासक्रमाचा राहिलेला नाही, तर तो थेट समाजाच्या भवितव्याशी जोडलेला गंभीर प्रश्न बनला आहे. कधीकाळी गुरुकुल पद्धतीत राजा असो वा रंक, श्रीमंत असो वा गरीब, सर्व मुले एकाच आश्रमात, एकाच गुरुकुलात समान शिक्षण घेत होती. ज्ञानासोबत शिस्त, संयम, कष्ट, मूल्ये आणि माणूसपण घडवले जात होते. आज मात्र 'कॉन्व्हेंट संस्कृती'ने शिक्षणाचे मूळ उद्दिष्टच बदलून टाकले आहे. सरकारी शाळा म्हणजे गरिबांची आणि कॉन्व्हेंट म्हणजे प्रतिष्ठेचे, यशाचे प्रतीक, असा धोकादायक भ्रम समाजाच्या मनात पद्धतशीरपणे रुजवला गेला आहे.

सरकारी शाळांची अवस्था आज अत्यंत विदारक झाली आहे. इमारती आहेत, शिक्षक आहेत, पगार आहेत; मात्र विश्वास उरलेला नाही. या शाळांमध्ये शिकवणारे शिक्षक सरकारकडून नियमित पगार घेतात, पण त्यांची स्वतःची मुले त्याच शाळांमध्ये शिक्षण घेत नाहीत, ही वस्तुस्थिती कुणालाही अस्वस्थ करणारी आहे. लाखो रुपये फी भरून तीच मुले खाजगी कॉन्व्हेंटमध्ये शिकतात. मग एक मूलभूत प्रश्न उभा राहतो- जे शिक्षक आपल्या शाळेत आपल्या मुलांना घालायला तयार नाहीत, ते इतर पालकांना त्या शाळेवर विश्वास ठेवायला कसे सांगू शकतात? की सरकारला हे सगळे दिसत असूनही ते मुद्दाम डोळ्यांवर झापड बांधून बसले आहे? 'आम्ही सरकारकडून अनुदान घेत नाही, त्यामुळे आम्हाला नियम लागू होत नाहीत' या सबबीखाली गल्लीबोळात, वसाहतींमध्ये कॉन्व्हेंट उभे राहिले. फी ठरवताना कोणताही निकष नाही, कोणतीही मर्यादा नाही. रिक्षावाल्यापासून ते मध्यमवर्गीय नोकरदार पालकांपर्यंत सगळेच कर्ज काढून, गरजा बाजूला सारून आपल्या मुलांना कॉन्व्हेंटमध्ये घालू लागले. पालकांच्या मनात भीती निर्माण करण्यात आली- इथे नाही घातलं तर मूल मागे पडेल, स्पर्धेत टिकणार नाही, समाजात स्थान मिळणार नाही. पण या महागड्या शिक्षणातून मुलांच्या हाती नेमकं काय येतं? ना धड इंग्रजी येतं, ना नीट मराठी येतं. संस्कार, क्रीडा, कला, समाजभान या सगळ्या गोष्टी अभ्यासाच्या ओझ्याखाली गाडल्या जातात. मोबाईल आणि तथाकथित तंत्रज्ञानाच्या नावाखाली मुलांचे बालपण हिरावून घेतले जाते. खेळाच्या मैदानाऐवजी स्क्रीन, संवादाऐवजी रील्स आणि संवेदनशीलतेऐवजी स्पर्धा अशी पिढी घडवली जात आहे. या कॉन्व्हेंटमध्ये प्रवेश घेतला की त्याच शाळेतून पुस्तके घ्यायची, त्यांनी सांगितलेल्या दुकानातूनच गणवेश खरेदी करायचा, गॅदरिंग, इव्हेंट, फंक्शन यांच्या नावाखाली वर्षानुवर्षे पालकांकडून पैसे उकळायचे. हे सर्व माहिती असूनही त्या शाळेत प्रवेश मिळावा म्हणून पालकांची धडपड सुरूच असते. कारण पर्याय उरलेला नाही, अशी भावना त्यांच्यात रुजवली गेली आहे. शिक्षणाची पूर्णपणे वाट लागली आहे, हे स्पष्ट दिसत असतानाही सरकार याकडे पाहायला तयार नाही. भारतामध्ये सर्वाधिक काळा व्यवसाय शिक्षण क्षेत्रात चालतो, असे ठामपणे सांगितले जाते. तरीही या व्यवसायावर नियंत्रण ठेवण्याची ना राजकीय इच्छाशक्ती दिसते, ना प्रशासकीय गंभीरता. कधी काळी सरकारी शाळांतून शास्त्रज्ञ, डॉक्टर, वकील, अभियंते, लेखक, पत्रकार आणि उद्योजक घडत होते. आज त्या शाळा ओस पडत चालल्या आहेत आणि भविष्यातील पिढी फी भरणारी पण विचारशून्य होत चालली आहे. जो समाज शिक्षणाला व्यापार बनवतो, तो समाज आपल्या भविष्याशीच तडजोड करतो. माणूस घडवणाऱ्या शिक्षणाऐवजी ग्राहक तयार करणारी व्यवस्था निर्माण झाली आहे. या कॉन्व्हेंट संस्कृतीवर वेळीच लगाम घातला नाही, तर विचाराने सुदृढ, मूल्यनिष्ठ आणि समाजाशी नातं जपणारी पिढी घडवणं अशक्य होईल. शिक्षण म्हणजे इमारत, फी आणि इंग्रजी माध्यम नव्हे; शिक्षण म्हणजे माणूस घडवण्याची प्रक्रिया आहे, हे पुन्हा एकदा ठामपणे स्वीकारण्याची हीच योग्य वेळ आहे. आपलं मूल मागे राहू नये या भीतीचा फायदा घेत शिक्षणसंस्थांनी पालकांना मानसिक गुलाम बनवले आहे. मूल शिकतंय की नाही, समजतंय की नाही, आनंदी आहे की नाही, यापेक्षा रिपोर्ट कार्डवरचे ग्रेड, स्पर्धा परीक्षा, रँक यालाच महत्त्व दिलं जातं. परिणामी मुलं ताणतणावाखाली वाढत आहेत. आत्मविश्वासाऐवजी न्यूनगंड, जिज्ञासेपेक्षा यांत्रिक पाठांतर आणि आनंदाऐवजी सततची चढाओढ त्यांच्या आयुष्याचा भाग बनत आहे. शिक्षणाने मोकळं करणं अपेक्षित असताना तेच शिक्षण मुलांना गुदमरवू लागलं आहे. सरकारी शाळा वाचवायच्या असतील तर फक्त इमारती रंगवून उपयोग नाही. तिथे शिकणाऱ्या मुलांना आत्मसन्मान, दर्जेदार शिक्षक, आधुनिक साधने आणि समाजाचा विश्वास परत मिळवून द्यावा लागेल. सर्वांत महत्त्वाचं म्हणजे धोरणकर्त्यांनी स्वतः पुढाकार घेऊन सरकारी शाळांवर विश्वास दाखवला पाहिजे. अन्यथा शिक्षणाचा हा व्यापार असाच फोफावत राहील आणि समाज विचारहीन, संस्कारहीन पिढीच्या दिशेने वाटचाल करत राहील. आज नाही तर उद्या, या दुर्लक्षाची किंमत आपल्यालाच मोजावी लागणार आहे.

९९२२९९९५८८

## दिल्ली वार्तापत्र

**श्यामकांत जहागीरदार**

# भाजपाला लाभले तरुण अध्यक्ष

भाजपाच्या कार्यकारी राष्ट्रीय अध्यक्षपदी बिहारच्या नितीन नबीन यांची अखेर नियुक्ती झाली. त्यामुळे भाजपाचे नवे राष्ट्रीय अध्यक्ष तेच होणार, हे स्पष्ट झाले आहे. भाजपाच्या राष्ट्रीय अध्यक्षपदी कोण येणार, याबद्दल बरीच उत्सुकता होती. अध्यक्षपदासाठी अनेक नावांची चर्चाही होती. मात्र पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी नेहमीप्रमाणे आपल्या धक्कातंत्राच्या कार्यशैलीचा परिचय करून देत या पदावर नितीन नबीन यांची निवड केली. यामुळे अनेकांना धक्का बसला. कारण राष्ट्रीय अध्यक्षपदासाठी गेल्या काही दिवसांत ज्या नावांची चर्चा होती, त्यात नितीन नबीन यांचे नाव कुठेच नव्हते. या सर्व दिग्गज नेत्यांना मागे टाकत नितीन नबीन यांनी अध्यक्षपदावर बाजी मारली. कधीकाळी आपण भाजपाचे राष्ट्रीय अध्यक्ष होऊ, असा विचारही त्यांनी कधी केला नसेल.

बिहारच्या विधानसभा निवडणुकीनंतर भाजपाचा राष्ट्रीय अध्यक्ष निवडला जाईल, असे बोलले जात होते; पण तो अध्यक्ष बिहारचा असेल, अशी कल्पना स्वप्नातही कोणी केली नसेल. ४५ वर्षांच्या भाजपाचे कार्यकारी राष्ट्रीय अध्यक्षपद ४५ वर्षांच्याच नितीन नबीन यांच्या गळ्यात पडले, असे करत भाजपाच्या नेतृत्वाने तरुण रक्ताला आपण संधी देत असल्याचे दाखवून दिले. भाजपा हा कार्यकर्त्यांचा पक्ष आहे. या पक्षात काम करणाऱ्या प्रामाणिक आणि निष्ठावान कार्यकर्त्यांला संधी मिळते, हे पुन्हा एकदा सिद्ध झाले. काँग्रेसचे राष्ट्रीय अध्यक्ष मल्लिकार्जुन खडगे ८० वर्षांचे असताना देशातील सत्ताधारी पक्षाचा अध्यक्ष ४५ वर्षांचा आहे, हाच भाजपा आणि देशातील अन्य राजकीय पक्षातील फरक आहे. प्रसिद्ध चित्रपट अभिनेते अमिताभ बच्चन यांचा एक गाजलेला संवाद आहे, 'हम जहा खडे होते है, वही से लाईन शुरु होती है'. त्याच धर्तीवर देशातील सर्व राजकीय पक्षाच्या भल्याभल्या नेत्याची आणि पत्रकारांची विचार करण्याची क्षमता संपते, तेथून पंतप्रधान मोदी यांची विचार करण्याची क्षमता सुरू होते, असे म्हणायला हरकत नाही. नितीन नबीन बिहारमधील भाजपाचे ज्येष्ठ नेते नवीनकिशोर सिन्हा यांचे पुत्र. पाटण्याच्या बांकीपूर विधानसभा मतदारसंघातून ते सलग पाचवेळा विधानसभेवर निवडून आले. भाजपाचे कार्यकारी राष्ट्रीय अध्यक्ष म्हणून नियुक्ती झाली, तेव्हा ते बिहारच्या



नितीशकुमार मंत्रिमंडळात सार्वजनिक बांधकाम खात्याचे मंत्री होते. भाजयुमोचे राष्ट्रीय महसचिव तसेच नंतर बिहार प्रदेश भाजयुमोचे अध्यक्षपद त्यांनी भूषवले. बिहार भाजयुमोचे अध्यक्ष असताना नितीन नबीन यांनी भारतीय राष्ट्रीय काँग्रेसचे नेते अब्दुल जलील मस्तान यांच्याविरोधात देशद्रोहाचा गुन्हा नोंदवला होता, तसेच त्यांच्या नागरिकत्वावरही प्रश्नचिन्ह उपस्थित केले होते. एका मेळाव्यात मस्तान यांनी पंतप्रधान मोदी यांच्या छायाचित्राला चपलांनी मारण्याचे आवाहन केले होते.

भाजपाने छत्तीसगडचे प्रभारी म्हणून नितीन नबीन यांना जबाबदारी सोपवली होती. छत्तीसगडमधून काँग्रेसला सत्तेवरून पायउतार करण्यात आणि राज्यात भाजपाला सत्तेवर आणण्यात नितीन नबीन यांची महत्वपूर्ण भूमिका होती. तेव्हापासूनच ते भाजपाच्या राष्ट्रीय नेतृत्वाच्या नजरेत आले होते. मागील आठवड्यात गृहमंत्री अमित शाह छत्तीसगडची राजधानी रायपूरच्या दौऱ्यावर असताना तेथे त्यांनी नितीन नबीन यांची अचानक भेट घेतली. या गोपनीय भेटीत नितीन नबीन यांच्याकडे भाजपाची धुरा सोपवण्याची पटकथा लिहिण्यात आली असे समजते. विशेष म्हणजे याची कुणकुण पक्षात कोणालाच लागली नाही. शाह यांच्या भेटीच्या दुसऱ्या दिवशी नितीन नबीन दिल्लीत पोहोचले आणि त्यांनी भाजपाचे विद्यमान राष्ट्रीय अध्यक्ष जे. पी. नड्डा आणि संघटन मंत्री बी. एल. संतोष यांची भेट घेत त्यांच्याशी चर्चा केली. अशाप्रकारे देशातीलच नाही तर जगातील सर्वांत मोठ्या राजकीय पक्षाचे नेतृत्व नितीन नबीन यांच्याकडे आले.

पुढील वर्षी म्हणजे २०२६ च्या जानेवारी महिन्यात भाजपाच्या राष्ट्रीय परिषदेच्या अधिवेशनात पक्षाचे नवे राष्ट्रीय अध्यक्ष म्हणून नितीन नबीन यांच्या नावावर शिक्कामोर्तब केले जाईल आणि पक्षाची अधिकृत सूत्रे त्यांच्याकडे येतील. भारतीय जनसंघ हा भारतीय जनता पक्षाचा पूर्वाधिकारी म्हटला पाहिजे. तरुणांकडे पक्षाचे नेतृत्व सोपवण्याचा प्रकार जनसंघातही होता, त्याचीच पुनरावृत्ती भाजपात झाली. अटलबिहारी वाजपेयी पहिल्यांदा भारतीय जनसंघाचे अध्यक्ष झाले, तेव्हा ते ४४ वर्षांचे होते. लालकृष्ण अडवाणी यांनी ४६ व्या वर्षी जनसंघाचे अध्यक्षपद स्वीकारले. नितीन नबीन सध्या कार्यकारी अध्यक्ष झाले आहे. येत्या काही दिवसांत नियमित राष्ट्रीय अध्यक्ष म्हणून त्यांच्याकडे जबाबदारी येईल, तेव्हा ते ४५ वर्षांचे असतील. भाजपाच्या आतापर्यंतच्या इतिहासातील सर्वांत लहान आणि तरुण अध्यक्ष म्हणून नितीन नबीन यांच्या नावाची नोंद झाली आहे. अमित शाह भाजपाचे अध्यक्ष झाले, तेव्हा ४९ वर्षांचे होते, तर नितीन गडकरी यांनी भाजपाचे राष्ट्रीय अध्यक्षपद स्वीकारले तेव्हा ते ५२ वर्षांचे होते. नितीन नबीन भाजपाचे बारावे अध्यक्ष आहेत. आतापर्यंत अटलबिहारी वाजपेयी, लालकृष्ण अडवाणी, डॉ. मुरलीमनोहर जोशी, कुशाभाऊ ठाकरे, बंगारू लक्ष्मण, जन कृष्णमूर्ती, व्यंकय्या नायडू, राजनाथसिंह, नितीन गडकरी, अमित शाह आणि जे. पी. नड्डा यांनी भाजपाचे राष्ट्रीय अध्यक्षपद भूषवले. कुशाभाऊ ठाकरे भाजपाचे सर्वांत ज्येष्ठ अध्यक्ष म्हणावे लागतील, ७६ व्या वर्षी ते भाजपाचे राष्ट्रीय अध्यक्ष झाले. त्यानंतर जन कृष्णमूर्ती यांच्याकडे ७३ व्या वर्षी भाजपाचे अध्यक्षपद आले. बंगारू लक्ष्मण ६१ वर्षाचे असताना, तर नड्डा ६० वर्षांचे असताना भाजपाचे अध्यक्ष झाले.

लालकृष्ण अडवाणी ५९ व्या वर्षी पहिल्यांदा भाजपाचे राष्ट्रीय अध्यक्ष झाले, तर अटलबिहारी वाजपेयी यांनी ५६ वर्षाचे असताना भाजपाचे पहिले अध्यक्ष म्हणून सूत्रे स्वीकारली. डॉ. मुरलीमनोहर जोशी भाजपाचे अध्यक्ष झाले, तेव्हा ५५ वर्षांचे होते. राजनाथसिंह यांनी ५४ व्या तर व्यंकय्या नायडू यांनी ५३ व्या वर्षी भाजपाचे अध्यक्षपद स्वीकारले. अटलबिहारी वाजपेयी, लालकृष्ण अडवाणी, राजनाथसिंह, अमित शाह तसेच जे. पी. नड्डा एकापेक्षा जास्त कार्यकाळ भाजपाचे अध्यक्ष होते. भाजपाचे सर्वाधिक काळ अध्यक्षपद लालकृष्ण अडवाणी यांनी भूषवले, तीन कार्यकाळ मिळून अडवाणी जवळपास ११ वर्षे भाजपाचे अध्यक्ष होते, अटलबिहारी वाजपेयी, अमित शाह आणि जे. पी. नड्डा दोन कार्यकाळ मिळून सहा वर्ष भाजपाचे राष्ट्रीय अध्यक्ष होते. राजनाथसिंह यांनी पाच वर्षे भाजपाचे अध्यक्षपद सांभाळले. नितीन गडकरी यांनी चार वर्षे भाजपाचे राष्ट्रीय अध्यक्ष म्हणून पद भूषवले. बंगारू लक्ष्मण आणि जन कृष्णमूर्ती सर्वांत कमी काळ म्हणजे फक्त एक वर्ष भाजपाचे अध्यक्ष होते. २०२९ ची लोकसभा निवडणूक भाजपा नितीन नबीन यांच्या नेतृत्वात लढवेल, असे दिसते. नव्या दमाच्या नेत्याकडे पक्षाचे नेतृत्व आल्यामुळे आधीच उत्साहाने फसफसणाऱ्या भाजपात नवचैतन्य निर्माण होईल, यात शंका नाही.

९८८१७१७८१७

### थंडीत गोधडीची ऊब कालबाह्य

काही वर्षांपूर्वी ग्रामीण भागात थंडीचे दिवस सुरू झाले की घराघरांत एक वेगळीच लगबग दिसायची. आई, आजीने हाताने शिवलेल्या साडी-लुगड्यांच्या गोधड्या गाठोड्यातून किंवा माळ्यावरून खाली उतरवल्या जायच्या. त्या गोधडीसोबत आठवणी, माया आणि ऊबही पुन्हा जिवंत व्हायची. मात्र, बदलत्या काळात ही ऊब मागे पडत आहे. आता ब्लँकेट, रजई आणि जाड चादरींनी या गोधडीची जागा घेतल्याचे दिसून येते.

पूर्वी घरातील वापरात नसलेली जुनी नऊवारी, सहावारी, साडी किंवा कापड फेकून देण्याऐवजी त्यातून गोधडी शिवली जायची. लांब सुई, जाड दोरा आणि महिलांच्या कुशल हातांनी गोधडी तयार केली जात होती. रिकाम्या वेळेचा सदुपयोग म्हणून गोधडी शिवताना जुन्या आठवणी, गप्पागोष्टी रंगायच्या आणि नकळत गोधडी पूर्ण होत होती. आई, आजीच्या हातची बारीक शिलाई, वेगवेगळ्या रंगांची साडी, लुगड्यांचे वेगळी आणि खास असायची. या गोधडीच्या ऊबेमुळे कडाक्याची थंडीही जाणवत नसे. मात्र काळ बदलला, जीवनशैली बदलली आणि बाजारात सहजपणे जाड ब्लॅंकेट, रजई, रग उपलब्ध होऊ लागली. तसेच या वस्तूंचा वापरही वाढला. परिणामी मागणी कमी झाल्याने गोधडी शिवण्याचे कामही कमी झाले.

**नितीन दुर्बुडे**/९५०३६४८६३०

## वाचक पत्रे

### मेस्सी आणि व्यक्तिनिष्ठ समाज!

भारतीय समाजाला व्यक्तिनिष्ठेची लागण झालेली ही सर्वांत गंभीर समस्या आहे. क्रिकेटपटू, अभिनेते यांना डोक्यावर घेऊन नाचण्याची प्रवृत्ती आपल्या समाजात जितकी दिसते, तितकी कदाचित अन्यत्र कुठेही आढळत नसेल. कोलकाता येथे झालेल्या फुटबॉलपटू मेस्सीच्या कार्यक्रमातही हेच चित्र दिसून आले. सुमारे ४८ वर्षांपूर्वी महान फुटबॉलपटू पेले कोलकाता येथे आले होते. त्यानंतर २००८ साली फुटबॉलपटू मेरेडोनाही तेथे आले. या दोन्ही प्रसंगी कोलकात्यात मोठ्या प्रमाणावर गोंधळ उडालेला होता. भारतीय समाजाच्या दृष्टीने ही बाब खरोखरच आत्मपरीक्षण करायला लावणारी आहे. मागील वर्षी डिसेंबरमध्ये 'पुष्पा २' चित्रपट प्रदर्शित होत असताना अभिनेते अल्लू अर्जुन यांना पाहण्यासाठी चित्रपटगृहाबाहेर झालेल्या चेंगराचेंगरीत एका महिलेचा दुर्दैवी मृत्यू झाला. तसेच अभिनेते जेसन विजय यांच्या राजकीय सभेच्या ठिकाणी झालेल्या चेंगराचेंगरीत ४१ जणांना आपले प्राण गमवावे लागले. खेळाडू किंवा अभिनेते यांच्याभोवती एक वलय निर्माण होते, हे मान्य आहे; परंतु राष्ट्र आणि समाजासाठी त्यांचे प्रत्यक्ष योगदान नेमके काय असते, याचा विचार आपण करतो का? अशा व्यक्तींचे अंधानुकरण करून नेमके कुणाचे कल्याण होते? जे खरोखरच समाजासाठी आणि राष्ट्रासाठी स्वतःचे आयुष्य पणाला लावून कार्य करतात, त्यांच्याविषयी आपण किती संवेदनशील असतो? खेळाडू किंवा कलाकार आपल्या कामाकरिता कोट्यवधी रुपये मिळवतात; मात्र त्यातून समाजाला नेमका काय लाभ होतो, यावरही चिंतन आवश्यक आहे. व्यक्तिपूजेमुळे माणूस हळूहळू सारासार विवेकबुद्धी गमावतो आणि त्याचा वैचारिक व सामाजिक उत्कर्षही थांबतो. यातून वैयक्तिक नुकसान तर होतेच; पण समाजाची हानीही वेगळ्याच पातळीवर घडते.

व्यक्तिनिष्ठेमुळे समाजाला झालेली हानी पाहता, आणखी किती काळ जगाने आपल्याकडे 'जमाव' किंवा 'झुंड' म्हणून पाहावे? एक सुसंस्कृत, विचारशील आणि शिस्तप्रिय समाज म्हणून भारतीय समाज कधी जगासमोर आपला ठसा उमटवणार, हा प्रश्न गंभीरपणे विचारात घेण्याची वेळ आली आहे.

**संजय चौधरी**/९४२३३००४८५

वाचक पत्रे पाठविण्यासाठी ईमेल ॲड्रेस
tbedit2016@gmail.com
तसेच **कुठलाही लेख** पाठवायचा असल्यास ९८५०७५३२८१
या व्हॉट्स ॲप क्रमांकावर पाठवावा.

## आजचे संघगीत-७६

गुरुवार, १८ डिसेंबर २०२५

### मम ध्येय ध्वजा जा, वरी वरी

मम ध्येय ध्वजा जा, वरी वरी, डौलांत फडक तू नभांतरी ॥धृ.॥

रूप तुझे ते उदात्त उज्ज्वल, अक्षय ठसले हृत्पटलावर
ध्यास लागला तुझाच दृढतर, मी प्राणपणे तुज धरी करी ॥१॥

विश्व पाहिले मी तव ठायी, मोक्ष देखिला तुझ्याच ठायी
अन् रमलो मी तुझ्याच पायी, झालीत वादळे शांत उरी ॥२॥

सुप्त शक्ति तव ठायि दिव्यतर, मज झाला तत्साक्षात्कार
अन् ओळखिले मज मी सत्वर, त्वत्तेज उजळले हृदंतरी ॥३॥

कर्तृत्वाच्या विश्वासावर, अविचल श्रद्धाभक्तिबळावर
जीवन माझे निर्भय निर्भर, रे नेइन तुज वैभवशिखरी ॥४॥

कळिकाळाशी टक्कर देइन, सावरीन कोसळते गगन
सप्त समुद्रे तव पद न्हाणिन, परि असो एक तव कृपा शिरी ॥५॥

हे पत्र मुद्रक व प्रकाशक कुलभूषणराम रामकृष्ण तारे यांनी सोलापूर तरुण भारत मीडिया लिमिटेड करिता, सोलापूर तरुण भारत कार्यालय प्लॉट नं ए -३२,छत्रपती संभाजीनगर इंडस्ट्रियल को ऑफ सोसायटी रेल्वे स्टेशन रोड छत्रपती संभाजी नगर ४३१००५ (महाराष्ट्र) येथे छापून दैनिक सोलापूर तरुण भारत कार्यालय,छत्रपती संभाजीनगर येथे प्रकाशित करून छत्रपती संभाजीनगर, जालना,परभणी,नांदेड, हिंगोली ,बीड येथील सोलापूर तरुण भारतच्या विभागीय कार्यालयातून वितरीत केले.
प्रबंध संपादक :विवेक घळसासी. मुख्य समुह संपादक : दिलीप यशवंत पेठे. मुख्य संपादक: प्रशांत वसंतराव माने, दूरध्वनी -८८८८८४७२६८ RNI Reg.No 46878/87
stbaurangabad@gmail.com. www.dainiktarunbharat.com, epaper.dainiktarunbharat.com या अंकात प्रसिद्ध झालेल्या बातम्या व लेख यामधून व्यक्त झालेल्या मतांशी संपादक/संचालक सहमत असतीलच असे नाही. (पी. आर. बी. कायद्यानुसार जबाबदारी)

धाराशिव
दिनांक

सोलापूर तरुण भारत, सोलापूर, (महाराष्ट्र) येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, धाराशिव, लातूर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड (महाराष्ट्र), तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.



## शेतातील शेड फोडून शेळ्यांची चोरी

**तभा वृत्तसेवा**
**धाराशिव, दि.१६ डिसेंबर -**
फिर्यादी आलम साहेबलाल पटेल (वय ४८), रा. तामलवाडी, ता. तुळजापूर, जि. धाराशिव यांच्या तामलवाडी शिवारातील शेतातील शेडचे कुलूप अज्ञात व्यक्तीने फोडून आत प्रवेश करत मोठी चोरी केल्याची घटना उघडकीस आली आहे.

दि.१३ डिसेंबर रोजी रात्री ८.३० वाजल्यापासून ते दि.१४ डिसेंबर रोजी पहाटे ५ वाजेच्या सुमारास अज्ञात चोरट्याने शेडमधील २३ शेळ्या, १ बोकड व ५ शेळीची पिल्ले, असा एकूण अंदाजे १,४५,००० रुपये किमतीचा मुद्देमाल चोरून नेल्याचे फिर्यादीत नमूद आहे.



याबाबत फिर्यादी आलम पटेल यांनी दि.१५ डिसेंबर रोजी दिलेल्या प्रथम खबरेवरून तामलवाडी पोलीस ठाण्यात भा.न्या.सं. कलम ३३४ (१), ३०५ अन्वये गुन्हा नोंदवण्यात आला आहे. पुढील तपास तामलवाडी पोलीस करीत आहेत.

## ▶▶ शोक संदेश...



### मराठा संघर्षयोद्धा मनोज जरांगे-पाटील यांचे दिल्लीत स्वागत

**धाराशिव, दि.१६ डिसेंबर -**
मराठा समाजाच्या हक्कांसाठी अखंड संघर्ष करणारे मराठा संघर्षयोद्धा मनोज दादा जरांगे पाटील यांचे आज दिल्लीत आगमन झाले. त्यांच्या आगमनावेळी रूपामाता परिवाराचे संस्थापक ॲड. व्यंकट गुंड पाटील तसेच प्रभारी, भाजपा दिल्ली प्रदेश (मराठी प्रकोष्ठ) व श्री गणेश सेवा मंडळ, लक्ष्मीनगर (दिल्ली)चे संस्थापक अध्यक्ष महेंद्र लड्डा यांनी त्यांचे स्वागत केले. यावेळी हरियाणाहून आलेले शिष्टमंडळ पारंपरिक भगवे फेटे परिधान करून स्वागतासाठी उपस्थित होते. स्वागतानंतर मनोज जरांगे-पाटील यांच्या नेतृत्वाखाली शेकडो वाहनांचा ताफा न्यू महाराष्ट्र सदनच्या दिशेने रवाना झाला. याप्रसंगी मराठा समाजातील विविध पदाधिकारी, कार्यकर्ते व समाजबांधव मोठ्या संख्येने उपस्थित होते.



### पोदार इंटरनॅशनल स्कूलमध्ये विजय दिन साजरा

**धाराशिव, दि.१६ डिसेंबर -**
पोदार इंटरनॅशनल स्कूल, धाराशिव येथे प्राचार्य डॉ. वाल्मिक सोमासेसर यांच्या मार्गदर्शनाखाली विजय दिन मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला. बांगलादेश मुक्ती संग्रामात मुक्ती वाहिनीला मदत करत भारताने पाकिस्तानविरुद्ध १६ डिसेंबर १९७१ रोजी ऐतिहासिक विजय मिळवला होता. या स्मरणार्थ भारतात दरवर्षी १६ डिसेंबर हा दिवस विजय दिन म्हणून साजरा केला जातो. सदर युद्ध ३ डिसेंबर १९७१ रोजी सुरू होऊन १६ डिसेंबर १९७१ रोजी समाप्त झाले. या दिनाचे औचित्य साधून इयत्ता पहिली 'ड' वर्गाच्या वर्गशिक्षिका रेश्मा माळाळे मॅडम यांनी कार्यक्रमाचे नियोजन केले. विद्यार्थ्यांनी भारतीय जवानांच्या वेशभूषेत देशभक्तीपर गीतांवर देखण्या पद्धतीने सादरीकरण करून उपस्थितांची मने जिंकली. कार्यक्रमास प्रशासकीय अधिकारी जीवन कुलकर्णी, प्रदीप शिंदे, कार्यक्रमाधिकारी दीपक अंकुश, पालकवर्ग तसेच शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी उपस्थित होते.



### सुभाष वैरागकर यांच्या बालकथासंग्रहास प्रथम पुरस्कार

**उमरगा, दि.१६ डिसेंबर -**
येथील सहशिक्षक सुभाष वैरागकर यांच्या 'अभय साधक आणि इतर गोष्टी' या बालकथासंग्रहास मराठा मंदिर साहित्य शाखेच्या वतीने देण्यात येणारा साहित्य पुरस्कार २०२४ मधील बालवाङ्मय विभागातील प्रथम पुरस्कार जाहीर करण्यात आला आहे. या पुरस्काराचे वितरण मुंबई सेंट्रल (पूर्व) येथील मराठा मंदिरच्या श्री. जीवाजीराव शिंदे सभागृहात नुकतेच पार पडले. नामवंत शास्त्रज्ञ व साहित्यिक डॉ. गजानन पुरुषोत्तम फोंडके (बाळ फोंडके) यांच्या हस्ते सुभाष वैरागकर यांना हा पुरस्कार प्रदान करण्यात आला. यावेळी डॉ. बाळ फोंडके यांनी विज्ञान आणि मानवी जीवन या विषयावर प्रेरणादायी व्याख्यान दिले. कार्यक्रमास मराठा मंदिर साहित्य शाखेचे पदाधिकारी, मान्यवर साहित्यिक तसेच मोठ्या संख्येने साहित्यरसिक उपस्थित होते. बालसाहित्य क्षेत्रातील वैरागकर यांच्या उल्लेखनीय योगदानाबद्दल सर्व स्तरांतून त्यांचे अभिनंदन करण्यात येत आहे.

### गोठ्यातून म्हैस चोरी; ८० हजारांची म्हैस लंपास

**धाराशिव, दि.१६ डिसेंबर -**
लोहगाव शिवारातील शेतातील गोठ्यातून अज्ञात चोरट्याने म्हैस चोरून नेल्याची घटना उघडकीस आली असून, या प्रकरणी नळदुर्ग पोलीस ठाण्यात गुन्हा नोंदवण्यात आला आहे. फिर्यादी नामदेव मधुकर येडगे (वय २५), रा. लोहगाव, ता. तुळजापूर, जि. धाराशिव यांनी दिलेल्या फिर्यादीवरून ही कारवाई करण्यात आली आहे.



दि. २२ नोव्हेंबर २०२५ रोजी रात्री ८.०० वाजता ते दि. २३ नोव्हेंबर २०२५ रोजी सकाळी ६.०० वाजेच्या सुमारास, संजय शिवाजीराव मोरे यांच्या लोहगाव शिवारातील शेतातील गोठ्यातून अंदाजे ८०,००० रुपये किंमतीची एक म्हैस अज्ञात व्यक्तीने चोरून नेली.

# पूर्ववैमनस्यातून मित्रांनीच केला मित्राचा 'खून'! अपघाताचा बनाव उघड

▶▶ घटनेनंतर काही तासांतच दोन्ही आरोपींना अटक... ▶▶ पोलिसांनी तपास केला गतिमान... ▶▶ कंडारी परिसरात खळबळ...

**तभा वृत्तसेवा**
**परंडा, दि.१६ डिसेंबर -**
तालुक्यातील कंडारी ते सोनारी रस्त्यावर सोमवारी, दि.१५ डिसेंबर रोजी रात्री ९ ते १० वाजेच्या सुमारास झालेल्या एका संशयास्पद 'अपघाता'मागे खुनाचे गंभीर षडयंत्र असल्याचे उघड झाले आहे. जुन्या भांडणाच्या रागातून दोन मित्रांनी आपल्याच ३५ वर्षीय मित्राच्या डोक्यात जड वस्तूने वार करून क्रूरपणे खून केल्याचा आरोप मयताच्या पत्नीने केला आहे. आंबी पोलिसांनी या घटनेत तात्काळ सूत्रे फिरवत, खुनाचा गुन्हा नोंदवून दोन्ही संशयित आरोपींना रात्रीच ताब्यात घेतले असून, या घटनेमुळे कंडारी परिसरात मोठी खळबळ उडाली आहे.



कंडारी येथील रहिवासी सोनाली मोतीराम जाधव (वय ३५) यांनी आंबी पोलीस ठाण्यात याबाबत फिर्याद दिली आहे. सोनाली यांचे पती मोतीराम जाधव हे सोमवार रात्री ९ वाजेच्या सुमारास कुटुंबासह घरी जेवण करत होते. त्याच वेळी त्यांचे मित्र विष्णु कालीदास तिंबोळे आणि योगेश नागेश तिंबोळे (दोघे रा. कंडारी) हे मोटारसायकलवरून त्यांच्या घरी आले. त्यांनी मोतीराम यांना पप्पु रावखंडे यांच्या बंगल्यावर पार्टी केली आहे, तिकडे जेवण करायला चल, असे सांगून त्यांना चालू जेवणाच्या ताटावरून उठवले आणि मोटारसायकलवर बसवून सोबत घेऊन गेले. रात्री १० वाजेच्या सुमारास मोतीराम यांना घेऊन गेलेल्या दोन मित्रांपैकी विष्णु तिंबोळे हा एकटाच मोतीराम यांच्या घरी परतला आणि त्याने कंडारी ते सोनारी रोडवर पप्पु रावखंडे यांच्या बंगल्यासमोर अपघात झाल्याचे सांगितले.

मयताची पत्नी सोनाली जाधव आणि आई रतन यांनी तात्काळ घटनास्थळी धाव घेतली असता, मोतीराम जाधव हे रस्त्यावर पडलेले होते. त्यांच्या डोक्याला मोठी दुखापत झाली होती, चेहरा ठेचला गेलेला होता आणि रस्त्यावर मोठ्या प्रमाणात रक्त सांडलेले होते.

सर्वात धक्कादायक बाब म्हणजे, काही ठिकाणी सांडलेल्या रक्तावर पाणी आणि माती टाकलेली दिसून आली. 'अपघाता'त तिघांपैकी केवळ मोतीराम यांचाच अपघात कसा झाला, असा जाब पत्नीने विचारला असता, आरोपी मित्रांनी उडवाउडवीची उत्तरे दिली.

या परिस्थितीमुळे 'अपघाता'बाबतचा संशय बळावला. सोनाली जाधव यांनी दिलेल्या फिर्यादीनुसार, मोतीराम जाधव, विष्णु तिंबोळे आणि योगेश तिंबोळे यांच्यात जुन्या भांडणावरून वाद होता. सदरील भांडण तात्या रावखंडे व पप्पु रावखंडे यांनी सोडवण्याचा प्रयत्नही केला होता.

ज्यात तात्या रावखंडे हे जखमी झाले आहेत. जुन्या भांडणाच्या रागातून विष्णु तिंबोळे व योगेश तिंबोळे यांनी मोतीराम जाधव यांच्या डोक्यात जड वस्तूने वार करून त्यांचा खून केला आणि अपघाताचा बनाव करण्याचा प्रयत्न केला, असा गंभीर आरोप फिर्यादीने केला आहे.

### पंचनाम्यात रक्ताचे डाग धुण्याचा प्रयत्न उघड...

पोलीस आणि फॉरेन्सीक टीमकडून करण्यात आलेल्या पंचनाम्यात हा अपघात नसून घातपातच असल्याचे स्पष्ट झाले आहे. कंडारी - सोनारी रस्त्यावर घटनास्थळी तात्या रावखंडे यांच्या घराशेजारील पत्र्याच्या शेडमध्ये रक्ताचे डाग दिसून आले. या ठिकाणाहून रस्त्यापर्यंत रक्ताचे डाग दिसत होते. एवढेच नव्हे तर, काही ठिकाणी रक्ताचे डाग पाण्याने धुऊन काढले असून, काही ठिकाणी माती व वाळू टाकून रक्ताचे निशाण लपवण्याचा प्रयत्न झाल्याचे पंचनाम्यात स्पष्ट झाले आहे. यावरून आरोपींनी खुनानंतर पुरावा नष्ट करण्याचा प्रयत्न केल्याचे दिसते. पोलीस अधिक तपास करत आहेत.

### पोलिसांची तात्काळ कारवाई, आरोपींना रात्रीच अटक...

घटनेची माहिती मिळताच आंबी पोलीस ठाण्याचे सपोनि गोरक्ष खरड व पथकाने तात्काळ घटनास्थळी धाव घेतली. फिर्यादीतील गंभीर आरोप आणि घटनास्थळावरील परिस्थिती (रक्तावर माती टाकणे, अपघाताबाबतचा संशय) लक्षात घेऊन पोलिसांनी तपासाची चक्रे गतिमान केली. आंबी पोलिसांनी आरोपी विष्णु कालीदास तिंबोळे आणि योगेश नागेश तिंबोळे यांच्याविरुद्ध खुनाचा गुन्हा नोंदवला आहे. घटनेनंतर काही तासांतच दोन्ही संशयित आरोपींना पोलिसांनी ताब्यात घेतले असून, त्यांची कसून चौकशी सुरू आहे. हा अपघात नसून, पूर्ववैमनस्यातून केलेला खून आहे का, डोक्यात कोणत्या जड वस्तूने मारले गेले, तसेच तात्या रावखंडे यांना झालेल्या दुखापतीचा आणि खुनाचा काय संबंध आहे, याचा सखोल तपास पोलीस करीत आहेत.




### घटनास्थळी नातेवाईकांचा आक्रोश...

मंगळवार, दि. १६ रोजी अनाळा आरोग्य केंद्रात मयत मोतीराम जाधव यांचे शवविच्छेदन करण्यात आले. यावेळी कुटुंबातील नागरिक व नातेवाईक यांनी आक्रोश केला. नंतर घटनास्थळीही शेकडो नातेवाईक व नागरिकांनी जमा होऊन संताप व्यक्त केला. आरोपींना फाशीची शिक्षा होण्यासाठी पोलिसांनी तपास निष्पक्ष व अचूक करावा, अशी मागणी संतप्त नागरिकांनी पोलिसांकडे केली.

## गोवंशीय वासरांची कत्तलीसाठी वाहतूक; सात वासरे परंडा पोलिसांकडून जप्त

**तभा वृत्तसेवा**
**धाराशिव, दि.१६ डिसेंबर -**
परंडा पोलिसांनी गोवंशीय वासरांची कत्तलीसाठी वाहतूक करताना एका तरुणास ताब्यात घेतले असून, त्याच्याविरुद्ध गुन्हा नोंदवण्यात आला आहे.

आरोपीचे नाव अकीब महमद अली कुरेशी (वय २०), रा. कुरेशी गल्ली, परंडा, ता. परंडा, जि. धाराशिव असे आहे. दि.१५ डिसेंबर रोजी दुपारी सुमारे १.३० वाजेच्या सुमारास जामगाव-परंडा रोडलगत शेत गट क्रमांक २०६ च्या बांधावर, आरोपीने गोवंशीय जातीची ७ वासरे (एकूण किंमत अंदाजे ४९,००० रुपये) आकुंड दोरीने बांधून, चारा व पाण्याची कोणतीही व्यवस्था न करता निर्दयतेने ठेवले होते.

ही वासरे कत्तलीसाठी नेली जात असल्याची माहिती मिळाल्यानंतर परंडा पोलिसांनी घटनास्थळी धाव घेऊन आरोपीस ताब्यात घेतले व वासरे जप्त केली.

या प्रकरणी सरकारतर्फे आरोपीविरुद्ध गुन्हा नोंदवण्यात आला असून पुढील तपास परंडा पोलीस करीत आहेत.

## श्री बाळेश्वर विद्यालयात सीएसआरअंतर्गत स्वच्छतागृहाचे लोकार्पण




**तभा वृत्तसेवा**
**अणदूर, दि.१६ डिसेंबर -**
तुळजापूर तालुक्यातील बारूळ गावातील श्री बाळेश्वर विद्यालय येथे बालाजी अमाईन्स लिमिटेड कंपनीच्या वतीने सीएसआर (कॉर्पोरेट सामाजिक उत्तरदायित्व) अंतर्गत बांधण्यात आलेल्या स्वच्छतागृहाचे लोकार्पण आज बालाजी अमाईन्सचे सीएसआर विभागप्रमुख अनिल विपत यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी केंद्र प्रमुख ए.एस. पाटील तसेच विद्यालयाचे मुख्याध्यापक एम.एम. अणदूरकर उपस्थित होते.

बारूळ येथील श्री बाळेश्वर विद्यालयाच्या नवीन इमारतीचे नुकतेच बांधकाम पूर्ण झाले असून, नव्या शाळेमध्ये स्वच्छतागृहाची सुविधा उपलब्ध करून देण्याची मागणी शाळेतील शिक्षक, गावातील नागरिक व संस्थेच्या सभासदांनी बालाजी अमाईन्सच्या संचालक मंडळाकडे व व्यवस्थापकीय संचालक राम रेड्डी यांच्याकडे केली होती. या मागणीची दखल घेत बालाजी अमाईन्सच्या वतीने सीएसआर अंतर्गत मुलांसाठी व मुलींसाठी स्वतंत्र असे एक स्वच्छतागृह युनिट उभारण्यात आले आहे. सध्या या शाळेत इयत्ता आठवी ते दहावीचे तीन वर्ग असून सुमारे ११० विद्यार्थी-विद्यार्थिनी शिक्षण घेत आहेत. त्यांच्या सोयीसाठी ही सुविधा अत्यंत उपयुक्त ठरणार आहे. लोकार्पणप्रसंगी केंद्र प्रमुख ए. एस. पाटील यांनी बालाजी अमाईन्सच्या वतीने करण्यात आलेल्या या उपक्रमाचे कौतुक केले. तसेच मुख्याध्यापक एम. एम. अणदूरकर यांनी विद्यार्थ्यांसाठी आवश्यक असलेली स्वच्छतागृहाची सुविधा उपलब्ध करून दिल्याबद्दल बालाजी अमाईन्सच्या संचालक मंडळाचे व व्यवस्थापकीय संचालक राम रेड्डी यांचे आभार मानले.

या कार्यक्रमास शाळेतील शिक्षक हजारे, बलसुरकर, लाखाडे नाईक सर, वठारे, रणदिवे, बालाजी अमाईन्सचे दत्तप्रसाद सांजेकर, बसवराज अंटद, गणेश नकाते, शालेय व्यवस्थापन समितीचे सदस्य, पालक समितीचे सदस्य, गावातील नागरिक, पालकवर्ग तसेच विद्यार्थी उपस्थित होते.

## ३,२६,६५० रुपयांचा दंड वसूल; ३६२ वाहनांवर कारवाई

**तभा वृत्तसेवा**
**धाराशिव, दि.१६ डिसेंबर-**




दि.१५ डिसेंबर रोजी धाराशिव शहरातील महत्त्वाच्या रस्त्यांवर वाहन चालवताना मोटार वाहन कायदा व नियमांचे उल्लंघन केल्याबाबत एकूण ३६२ कारवाया केल्या गेल्या. याप्रकरणी, ३,२६,६५० रुपये तडजोड शुल्क वसूल करण्यात आले असून, वाहतुक नियमांचे पालन करण्याचे आवाहन पोलिसांनी केले आहे.

▶▶ प्रतिनिधी नेमणे आहेत...

सोलापूर तरुण भारत

**धाराशिव जिल्ह्यात खालील ठिकाणी वार्ताहर व एजंट त्वरीत नेमणे आहेत...**

**धाराशिव तालुका :** धाराशिव शहर प्रतिनिधी-१ (कमिशनवर) येडशी, तेर, ढोकी, कसबे तडवळे, बेंबळी, पाटोदा, पळसप, मुरुड.

**तुळजापूर तालुका :** तुळजापूर तालुका प्रतिनिधी, काटी, तामलवाडी, आरळी (बु.), मंगरूळ, काटगाव, किलज, सलगरा, वागदरी, नंदगाव.

**लोहारा तालुका :** लोहारा तालुका प्रतिनिधी, कानेगाव, भातागळी, सास्तुर, जेवळी, आष्टा, अचलेर, माकणी

**उमरगा तालुका :** नाईचाकुर, समुद्राळ, मुरूम ग्रामीण, बलसुर, येणेगुर, दाळींब, आलुर, बेळंब, कदेर, औराद, गुंजोटी, तलमोड, कुन्हाळी, तुरोरी, माडज, जेकेकुर.

**कळंब तालुका :** कळंब तालुका प्रतिनिधी, दहिफळ, सातेफळ, चोराखळी, रांजणी, शिराढोण, डिकसळ, इटकूर.

**वाशी तालुका :** पार्डी, सरमकुंडी, अजनसौंडा, गिरवली, पारगाव, हातोला, पारा, दसमेगाव, मांडवा, गोलेगाव.

**परंडा तालुका :** नालगाव, लोणी, कपीलपूरी, आवारप्रिंपी, आसू, कात्राबाद, सोनारी, डोंजा, अनाळा, रोहकल.

**भूम तालुका :** भूम शहर प्रतिनिधी, तालुका प्रतिनिधी, माणकेश्वर, वांगी ब्रु, वालवड, अंभी, पाथरूड, ईट.

**अनुभवास प्राधान्य :** पत्रकारितेची आवड असणाऱ्यांनी खालील पत्त्यावर दि.३० डिसेंबर २०२५ पर्यंत संपर्क साधावा.
**टीप-** इच्छुक वार्ताहरांनी कागद पत्रासह प्रत्यक्ष मुलाखतीस यावे. (अटी शर्ती लागू)

**: कार्यालय पत्ता :**
दैनिक सोलापूर तरूण भारत, धाराशिव जिल्हा आवृत्ती कार्यालय,रामदासी निवास, जिल्हा न्यायालयाच्या पाठीमागे, समर्थनगर, धाराशिव.
**- अनिल आगलावे**
(जिल्हा प्रतिनिधी), संपर्क मो.नं. ९७६७०९९७११

# खंडोबा यात्रेपूर्वी अर्धवट रस्त्यांची कामे अपूर्ण





### यात्रा विस्कळीत होण्याची शक्यता

**तभा वृत्तसेवा**
**नळदुर्ग, दि.१६ डिसेंबर -**
खंडोबा यात्रा सुरू होण्यापूर्वी श्रीक्षेत्र मैलारपूर येथे अर्धवट अवस्थेत राहिलेल्या रस्त्यांची कामे प्रशासनाने संबंधित ठेकेदाराकडून तात्काळ पूर्ण करून घेणे गरजेचे आहे. अन्यथा या अपूर्ण रस्त्यांमुळे यात्रा विस्कळीत होण्याची शक्यता असून भाविकांच्या सुरक्षिततेचा प्रश्न निर्माण होऊ शकतो. याबाबत तातडीने दखल घेऊन रस्त्यांची कामे पूर्ण करावीत, अशी मागणी भाविक व यात्रेकरूंनी केली आहे.

श्रीक्षेत्र मैलारपूर येथे भरणारी खंडोबा यात्रा संपूर्ण महाराष्ट्रात प्रसिद्ध असून यात्रेच्या काळात भाविकांचा अक्षरशः महापूर उसळतो. आमदार राणा जगजितसिंह पाटील यांच्या प्रयत्नांतून येथे अनेक रस्त्यांची कामे दर्जेदार पद्धतीने पूर्ण करण्यात आली आहेत. मात्र, श्री खंडोबा मंदिराकडे जाणाऱ्या दोन ते तीन प्रमुख रस्त्यांची कामे संबंधित ठेकेदाराने अर्धवट अवस्थेतच ठेवली आहेत.

रस्त्यांच्या दोन्ही बाजूंची कामे करण्यात आली असली, तरी मध्यभागी सुमारे ५० फुटांहून अधिक अंतराचे काम अपूर्ण आहे. या अपूर्ण भागामुळे यात्रेच्या काळात मोठ्या प्रमाणात गर्दी व वाहतुकीचा खोळंबा होण्याचा धोका आहे. मंदिराकडे जाणारे रस्ते रुंद व चांगले असताना, मध्ये राहिलेला हा अपूर्ण भाग यात्रेकरूंना धोकादायक ठरण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे.

नळदुर्ग शहराकडून श्रीक्षेत्र मैलारपूरकडे जाणारा रस्ता ऐन उतारावर व कालव्यालगत अर्धवट अवस्थेत आहे. हा रस्ता अत्यंत अरुंद असल्याने येथे मोठ्या प्रमाणात वाहतूक कोंडी होण्याची शक्यता आहे. तसेच वसंतनगरजवळील पाण्याच्या टाकीमार्गे येणारा रस्ताही उतारावर व कालव्यालगत अपूर्ण राहिल्याने तेथेही वाहतूक विस्कळीत होण्याचा धोका निर्माण झाला आहे.

श्रीक्षेत्र मैलारपूर येथील खंडोबा यात्रा यावर्षी दि.२, ३ व ४ जानेवारी २०२६ रोजी भरणार असून ३ जानेवारी हा मुख्य यात्रेचा दिवस आहे. या दिवशी महाराष्ट्रासह आंध्र प्रदेश, कर्नाटक व तेलंगणा राज्यांतून सुमारे ५ ते ६ लाख भाविक श्री खंडोबा देवाच्या दर्शनासाठी उपस्थित राहतात.

यात्रेदरम्यान हजारो वाहने याच रस्त्यांवरून मंदिराकडे ये-जा करतात. त्यामुळे रस्त्यांची कामे अपूर्ण राहिल्यास वाहतूक पूर्णपणे ठप्प होण्याची शक्यता आहे.

या यात्रेला शेकडो वर्षांचा इतिहास असून नळदुर्गच्या पावन भूमीत श्री खंडोबा व माता बानू यांचा विवाह झाल्याची श्रद्धा आहे. त्यामुळे या ठिकाणाला खंडोबा भक्तांसाठी अनन्यसाधारण धार्मिक महत्त्व आहे. यात्रेच्या काळात अनेक भाविक वाहनांतून तर अनेक भाविक पायी मंदिराकडे येतात. २, ३ व ४ जानेवारी रोजी सर्व मार्गांवर प्रचंड गर्दी असते व पाय ठेवायलाही जागा उरत नाही.

या पार्श्वभूमीवर मंदिराकडे जाणाऱ्या सर्व रस्त्यांची अर्धवट कामे यात्रेपूर्वी पूर्ण करून घ्यावीत, अशी जोरदार मागणी भाविक व यात्रेकरूंनी केली आहे.

तसेच आमदार राणा जगजितसिंह पाटील यांनीही या प्रकरणात लक्ष घालून संबंधित ठेकेदाराकडून कामे यात्रेपूर्वी पूर्ण करून घेण्यासाठी प्रयत्न करावेत, अशी अपेक्षा व्यक्त करण्यात आली आहे.

# जिल्हाधिकाऱ्यांच्या अध्यक्षतेखाली अल्पसंख्यांक दिन साजरा




**तभा वृत्तसेवा**
**बीड दि.१८ डिसेंबर**

जिल्हाधिकारी कार्यालयाच्या प्रगती सभागृहात जिल्हाधिकारी विवेक जॉन्सन यांच्या अध्यक्षतेखली अल्पसंख्यांक दिन संपन्न झाला.या बैठकीस अपर जिल्हाधिकारी हरिष धार्मिक,सामान्य प्रशासनचे अपर जिल्हाधिकारी शैलश सुर्यवंशी, निवासी उपजिल्हाधिकारी शिवकुमार स्वामी, जिल्हा नियोजनचे नियोजन अधिकारी सुधाकर चिंचाणे, अस्पसंख्यांक समितीचे सदस्य व संबधित विभागाचे अधिकारी कर्मचारी उपस्थित होते.

या बैठकीत अल्पसंख्यांक समाजासाठी राबविण्यात येणाऱ्या विविध शासकीय योजनांवर प्रकाश टाकण्यात आला. तसेच या योजनांची प्रभावी अंमलबजावणी करून जास्तीत जास्त लाभ लाभार्थ्यापर्यंत पोहोचवावा, अशा सूचना देण्यात आल्या.अल्पसंख्यांक समाजासाठी राबविण्यात येणाऱ्या विविध शासकीय योजनांची सविस्तर आढावा घेण्यात आला.

अचारसहिंता संपल्यानंतर या विविध योजनाचा लाभार्थ्यांना लाभ मिळतो की नाही याची खात्री करुन संबधित विभागास तशा सूचना देऊन शासनाच्या विविध योजना तळागाळातील अल्पसंख्याकापर्यंत पोहचण्यासाठी प्रयत्न केला जाईल असे श्री जॉन्सन म्हणाले.

अल्पसंख्याक समितीचे सदस्यांनी योजना संबधित विविध अडचणी जिल्हाधिकारी यांच्या निदर्शनास आणून दिल्या तसेच जिल्हाधिकारी यांनी सर्व संबधित विभागाच्या अधिका–याना उपस्थित राहण्याच्या सूचना दिल्यामूळे त्यांचे जिल्हयाधिका–याप्रती आभार व्यक्त केले.बैठकीपूर्वी जिल्हा नियोजन अधिकारी सुधाकर चिंचाणे यांनी योजना संबधित सविस्तर प्रस्तावना व आभार प्रदर्शन केले.

# बाळराजेंना भेटण्यासाठी बंगल्यावर कार्यकर्त्यांची रीघ पवारांच्या नेतृत्वावरील विश्वासाचे नाते आणखी घट्ट



**तभा वृत्तसेवा**
**गेवराई दि.१८ डिसेंबर**

गेवराई नगरपरिषद निवडणुकीच्या मतदानाच्या दिवशी घडलेल्या राड्यानंतर भाजप नेते बाळराजे पवार यांच्याविरोधात अटक वॉरंट निघाले. मात्र , कोणतीही पळवाट न काढता, कायद्यावर संपूर्ण विश्वास ठेवत बाळराजे पवार यांनी स्वतःहून गेवराई पोलीस ठाण्यात हजेरी लावली. त्यानंतर पोलिसांनी त्यांच्यावर अटकेची कारवाई केली.

अटकेनंतर त्यांना एक दिवसाची पोलीस कोठडी सुनावण्यात आली होती. दुसऱ्या दिवशी न्यायालयात सुनावणी झाल्यानंतर न्यायालयाने बाळराजे पवार यांना जामीन मंजूर केला. या निर्णयानंतर गेवराईतील कार्यकर्ते, समर्थक आणि नागरिकांमध्ये समाधान व दिलासा व्यक्त होताना दिसून आला.

दि.१६ रोजी बाळराजे पवार यांना अटक झाल्याची माहिती समजताच गेवराई शहरासह ग्रामीण भागातील कार्यकर्त्यांनी पोलीस ठाणे आणि न्यायालय परिसरात मोठ्या संख्येने गर्दी केली होती. आपल्या नेत्याच्या पाठीशी ठामपणे उभे राहण्याची भूमिका कार्यकर्त्यांनी घेतली होती. न्यायालयाने जामीन मंजूर केल्यानंतर कार्यकर्त्यांनी जल्लोष करत न्यायालयाचे आभार मानले आणि न्यायव्यवस्थेवरील विश्वास व्यक्त केला. काल जामीन मिळाल्यानंतर बाळराजे पवार यांच्या निवासस्थानी आज सकाळपासूनच कार्यकर्त्यांची मोठी गर्दी पाहायला मिळाली. शहरातील कार्यकर्त्यांसह तालुक्यातील व ग्रामीण भागातील अनेक कार्यकर्ते, पदाधिकारी आणि नागरिक बाळराजे पवार यांची भेट घेण्यासाठी बंगल्यावर दाखल झाले. नेत्यावर विश्वास आहे. आम्ही तुमच्यासोबत आहोत. अशा भावना व्यक्त करत कार्यकर्त्यांनी त्यांना धीर दिला.या संपूर्ण घटनाक्रमात बाळराजे पवार यांनी संयम, धैर्य आणि कायद्यावरील विश्वास दाखवला. त्यांच्या या भूमिकेमुळे कार्यकर्त्यांमध्ये अधिकच आत्मविश्वास निर्माण झाला असून, बाळराजे पवार यांच्यावरील जनसमर्थन आणि कार्यकर्त्यांची निष्ठा पुन्हा एकदा ठळकपणे समोर आली आहे.संकटाच्या काळातही कार्यकर्त्यांचा मिळालेला पाठिंबा आणि जनतेचा विश्वास हेच आपले खरे बळ असल्याची भावना त्यांनी यावेळी व्यक्त केली असून, उद्या होणाऱ्या जिल्हा परिषद, पंचायत समितीच्या निवडणुकीत सर्व सामान्य कार्यकर्त्याला न्याय देण्यासाठी काम करणार असल्याचे त्यांनी सांगितले. गेवराईच्या राजकारणात बाळराजे पवार यांचे नेतृत्व अधिक मजबूत होत असल्याचे चित्र या निमित्ताने दिसून आले आहे.

# श्री मंगलनाथ मल्टीस्टेटला ग्रीन को २०२५ पुरस्कार जाहीर

## सहकार मंत्री अतुल सावे यांच्या हस्ते होणार पुरस्काराचे वितरण

**तभा वृत्तसेवा**
**माजलगाव दि.१८ डिसेंबर**

जागतिक सहकार वर्षांनिमित्त सहकार क्षेत्रातील प्रगत अनुभव आव्हाने आणि भविष्यातील दिशा घडून आणण्यासाठी ग्रीन वर्ल्ड व कॉसमॉस को–ऑपरेटिव्ह बँक लिमिटेड यांच्या संयुक्त विद्यमाने सहकार मंथन २०२५ या कार्यक्रमाचे आयोजन सहकार सभागृह विद्यापीठ रोड शिवाजीनगर पुणे येथे आयोजित करण्यात आलेले आहे.कार्यक्रमांमध्ये महाराष्ट्र राज्याचे सहकार मंत्री बाबासाहेब पाटील यांच्या हस्ते ग्रीन को २०२५ या पुरस्काराने माजलगाव शहरातील श्री मंगलनाथ मल्टीस्टेट या संस्थेला सन्मानित करण्यात येणार आहे.

कार्यक्रमाचे उद्घाटक अपारंपारिक ऊर्जा व दिव्यांग कल्याण विकास मंत्री अतुल सावे,सहकार आयुक्त महाराष्ट्र राज्य डॉ. संजय कोलते, अध्यक्ष कॉसमॉस को–ऑपरेटिव बँक लिमिटेड ड.प्रल्हाद कोकरे, प्रजासक राज्य सहकारी बँक लिमिटेड मुंबई चे विद्याधर अनासकर हे उपस्थित राहणार आहेत.

सहकार क्षेत्रामध्ये मराठवाड्यातील साखर कारखाने जिनिंग्स व विविध सहकार क्षेत्रातील उल्लेखनीय कार्य करणाऱ्या सहकारी संस्थांना या पुरस्काराने सन्मानित करण्यात येणार आहे.श्रीमंगलनाथ मल्टीस्टेट चे संस्थापक अध्यक्ष श्री आर.जी कानडे व संस्थेचे व्यवस्थापकीय संचालक ड.रवींद्र कानडे यांनी बोलताना सांगितले की, संस्थेच्या पारदर्शक व्यवहार वेळेवर कर्जवाटप व वसुली ठेवीदारांचा विश्वास संपादन, स्वयंरोजगार निर्मिती,महिला व युवक सक्षमीकरण व त्याचबरोबर सामाजिक उपक्रम या सर्व बाबींची दखल घेत श्री मंगलनाथ मल्टीस्टेट ही संस्था या पुरस्काराची मानकरी ठरली आहे.

श्री मंगलनाथ मल्टीस्टेटच्या सातत्यपूर्ण व लोकाभिमुख कामगिरीची ही पोच पावती आहे. निश्चितच हा पुरस्कार माजलगाव चे नाव लौकिक करत असून संस्थेच्या कार्याला अधिक प्रेरणा व ऊर्जा देणार आहे सदरील पुरस्कार संस्थेचे हितचिंतक,सभासद सर्व कर्मचारी वृंद यांच्या सहकार्याचे व परिश्रमाचे फलित असून सदरील पुरस्कार त्यांना समर्पित करण्यात येत आहे.

# लिंबागणेश येथे शेतकरी पुत्रांचा एल्गार; भाववाढीसाठी 'शेतकरी हक्क मोर्चा'त सहभागी होण्याचे आवाहन–डॉ.गणेश ढवळे

**तभा वृत्तसेवा**
**बीड दि.१८ डिसेंबर**

बीड तालुक्यातील लिंबागणेश येथील छत्रपती शिवाजी महाराज चौकात आज( दि.१८ ) गुरूवार रोजी आयोजित करण्यात आलेल्या शेतकरी हक्क मोर्चाच्या पार्श्वभूमीवर शेतकरी पुत्रांची बैठक संपन्न झाली. कापूस, सोयाबीन, तूर आदी शेतमालाला वाढीव दर मिळावा, सीसीआय व जिनिंग केंद्रांवरील शेतकऱ्यांची अडवणूक थांबवावी, हमीभावापेक्षा कमी दराने खरेदी करणाऱ्या व्यापाऱ्यांवर कठोर कारवाई करावी तसेच कापूस व सोयाबीनची परदेशातून होणारी आयात तत्काळ बंद करावी, अशा प्रमुख



मागण्या यावेळी मांडण्यात आल्या.

दि.२५ डिसेंबर रोजी जिल्हाधिकारी कार्यालयावर काढण्यात येणाऱ्या भव्य शेतकरी हक्क मोर्चामध्ये शेतकरी, शेतकरी पुत्र, शेतकरी मित्र तसेच शेतकऱ्यांप्रति संवेदनशील सर्वसामान्य नागरिकांनी मोठ्या संख्येने सहभागी व्हावे, असे आवाहन यावेळी करण्यात आले.




जन शिक्षण संस्थान बीड द्वारा अंकुश नगर येथे असिस्टंट ज्यूट क्राफ्ट प्रॉडक्ट मेकर प्रशिक्षण प्रारंभ* भारत सरकारच्या कौशल्य विकास व उद्योजकता मंत्रालयांतर्गत दीनदयाल शोध संस्थान,जन शिक्षण संस्थान, बीड यांच्या वतीने अंकुश नगर येथे तीन महिन्यांच्या 'असिस्टंट ज्यूट क्राफ्ट प्रॉडक्ट मेकर' या व्यावसायिक प्रशिक्षणाचे नुकतेच उत्साहात उद्घाटन करण्यात आले.

# हॅन्डलींग ऑफ इलेक्ट्रॉनिक गॅझेटस् कार्यशाळा संपन्न

**तभा वृत्तसेवा**
**बीड दि.१८ डिसेंबर**

नवगण शिक्षण संस्था संचलित सौ. केशरबाई सोनाजीराव क्षीरसागर उर्फ काकू कला विज्ञान, व वाणिज्य महाविद्यालय, बीड भौतिकशास्त्र विभाग आयोजित एक दिवशीय हॅन्डलींग ऑफ इलेक्ट्रॉनिक गॅझेटस् कार्यशाळा गुरुवार दि. १८ डिसेंबर २०२५ रोजी महाविद्यालयाच्या आयसीटी हॉल मध्ये संपन्न झाली. या कार्यशाळेमध्ये इहाण टेक्नोलॉजीचे श्री. जावेद शेख हे मुख्य डेमॉस्ट्रेटर म्हणून उपस्थित होते. तर कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी भौतिकशास्त्र विभाग प्रमुख तथा महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. शिवानंद क्षीरसागर हे होते. महाविद्यालयात होत असलेल्या विविध उपक्रमांचा विद्यार्थ्यांनी लाभ घ्यावा. अशी अपेक्षा त्यांनी व्यक्त केली. या कार्यशाळेत श्री. जावेद शेख यांनी मास्टरी द सेफ ॲन्ड स्मार्ट हॅन्डलिंग ऑफ इलेक्ट्रोनिक गॅझेट या विषयावर प्रात्यक्षीक व पिपिटी च्या सहाय्याने सखोल मार्गदर्शन कैले. गॅझेट म्हणजे काय , त्याचे प्रकार कोणते, ते वापरत असताना घ्यावयाची काळजी, त्याचा वापर कसा करतात, त्याची निगा कशी राखयची, या कार्यशाळेचा हेतू काय, इलेक्ट्रोनिक गॅझेट आपल्या जिवनाशी कसे निगडीत आहेत. त्यामध्ये अपघात, कार्यक्षमता, पॉवर सिस्टम, इनपुट – आउटपुट, इंटरनल स्टोरेज, कनेक्टीव्हीटी, सेन्सर अशा अनेक संदर्भासहीत सबंधीत प्रात्यक्षीक व्हिडीओच्या माध्यमातून, विद्यार्थ्यांशी परस्पर संवाद साधुन फलदायी कार्यक्रम संपन्न केला. या कार्यशाळेत ६० विद्यार्थ्यांनी सहभाग नोंदवला. कार्यक्रमाचे प्रस्ताविक व आभार प्रा. अशोक डोंगरे यांनी केले. पाहुण्यांचा परीचय प्रा. काझी सर यांनी करुन दिला तर कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी भौतिकशास्त्र विभागातील प्रा. कोकाटे रुपेश, प्रा. राउत सर, प्रा. मुळे मॅडम, प्रा. साळुंके प्रदिप, प्रा. अनिल जाधव, प्रा. गोंडे सर, श्री. चौरे यांनी परिश्रम घेतले. महाविद्यालयाचे उपप्राचार्य डॉ. संजय पाटील देवळानकर, उपप्राचार्य डॉ. अनिता शिंदे, पदव्युत्तर संचालक डॉ. ए. एस. खान, कमवि उपप्राचार्य डॉ. नारायण काकडे, पर्यवेक्षक प्रा. जालिंदर कोळेकर उपस्थित होते.

# ईगलवुड इंग्लिश स्कूल येथे क्रीडा सप्ताह व हेमंत शिबिराचा उत्साहात शुभारंभ संपन्न

**तभा वृत्तसेवा**
**बीड दि.१८ डिसेंबर**

ईगलवुड इंग्लिश स्कूल माजलगाव या शाळेत क्रीडा सप्ताह तसेच हेमंत शिबिराचा उद्घाटन समारंभ उत्साहपूर्ण वातावरणात संपन्न झाला. या कार्यक्रमाच्या निमित्ताने पवार हॉस्पिटलपासून मशाल दौडीचे आयोजन करण्यात आले होते. या मशाल दौडीमुळे विद्यार्थ्यांमध्ये क्रीडाविषयी उत्साह व शिस्तीची भावना निर्माण झाली.




शालेय मंचावर विविध कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले होते. यामध्ये विद्यार्थ्यांनी आकर्षक मार्चपास्ट तसेच कवायतीचे विविध प्रकार सादर करून उपस्थितांची मने जिंकली. यावर्षीचा क्रीडा सप्ताह भारतीय महिला क्रिकेट संघाला समर्पित करण्यात आला असून, महिलांच्या क्रीडा क्षेत्रातील यशाचा गौरव करण्याचा उद्देश यामागे होता.या कार्यक्रमासाठी अध्यक्ष म्हणून ड.दीपक देशमुख तर प्रमुख पाहुणे म्हणून दै.कार्यारंभ वर्तमानपत्राचे पत्रकार श्री.वैजनाथ घायतिडक उपस्थित होते. तसेच संस्थेच्या अध्यक्षा डॉ.अर्चना पवार, संस्थेचे सचिव डॉ.शरद पवार, शाळेचे प्राचार्य सत्यजित कांजाळकर सर व उपप्राचार्या प्रणिता कांजाळकर मॅडम यांचीही प्रमुख उपस्थिती लाभली.

प्रमुख पाहुण्यांनी आपल्या भाषणातून शाळेच्या शैक्षणिक व क्रीडा क्षेत्रातील कार्याचे कौतुक केले आणि अध्यक्षांनी आपल्या अध्यक्षीय भाषणात विद्यार्थ्यांनी केवळ अभ्यासातच नव्हे तर क्रीडा व शिस्तीच्या बाबतीतही उत्कृष्ट कामगिरी करावी, असे मार्गदर्शन त्यांनी केले.तसेच या कार्यक्रमास अभूतपूर्व सोहळा असे संबोधले. डॉ.अर्चना पवार मॅडम यांनी या तीन दिवस चालणाऱ्या क्रीडा सप्ताह तथा हेमंत शिबिराची घोषणा केली. प्रमुख पाहुण्यांचा परिचय सत्यजित सरांनी केला. तसेच सूत्रसंचालन वरद काळे आणि शेख आहाद या विध्यार्थ्यांनी केले. हा सोहळा यशस्वी होण्यासाठी शिक्षक व विद्यार्थ्यांनी परिश्रम घेतले.





बीड शहरातील बशिरगंज भागातील अतिक्रमण बुधवारी शहर वाहतूक पोलीस,नगर परिषद कर्मचाऱ्यांनी संयुक्त कारवाई केली. (छाया कृष्णा शिंदे)

सोलापूर तरुण भारत
www.dainiktarunbharat.com, epaper.dainiktarunbharat.com

# काँग्रेसच्या आमदार प्रज्ञा सातव यांचा भारतीय जनता पक्षामध्ये प्रवेश

## राजीव सातव यांचे विकासाचे स्वप्न साकार करणार- डॉ. प्रज्ञा सातव

**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, १८ डिसेंबर**

काँग्रेसचे दिवंगत नेते राजीव सातव यांच्या पत्नी आ. डॉ प्रज्ञा सातव यांनी गुरूवारी विधान परिषद सदस्यत्वाचा राजीनामा देत भारतीय जनता पक्षामध्ये त्यांच्या समर्थकांसह प्रवेश केला. यावेळी बोलतांना त्यांनी स्व राजीव सातव यांचे विकासाचे स्वप्न पूर्ण करण्यासाठी आणि मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या नेतृत्वात राज्याचा होत असलेला विकासामध्ये हातभार लावण्यासाठी भाजपमध्ये प्रवेश केल्याचे सांगितले.

**विकासात साथ देण्यासाठी भाजपमध्ये प्रवेश- डॉ सातव**

दिवंगत नेते राजीव सातव यांचे विकासाचे अपूर्ण राहीलेले स्वप्न पूर्ण करण्यासाठी तसेच मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या नेतृत्वात राज्यात होत असलेल्या चौफेर विकासात साथ देण्यासाठी तसेच कार्यकर्त्यांच्या आग्रहास्तव मी भाजपमध्ये प्रवेश केला आहे. राजीव सातव यांचे आशिर्वाद, देवाभाऊंची साथ आणि सर्वजण मिळून करू सर्व संकटावरती मात असे म्हणत मी आणि सर्व कार्यकर्ते सबका साथ, सबका विकास, सबका प्रयास, सबका विश्वास याच धोरणावर आम्ही काम करू असे आश्वासनही यावेळी त्यांनी दिले. यापुढे आम्ही पक्षासाठी जोमाने कामाला लागू असा निर्वाळा त्यांनी दिला.

काँग्रेसच्या विधान परिषद सदस्या आ. डॉ प्रज्ञा सातव यांनी गुरूवार दि १८ डिसेंबर रोजी प्रदेशाध्यक्ष रवींद्र चव्हाण आणि महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांच्या प्रमुख उपस्थितीमध्ये मुंबई येथे समर्थकांसह भारतीय जनता पक्षामध्ये प्रवेश केला आहे. सातव यांच्या प्रवेशामुळे काँग्रेसला मोठा धक्का बसला आहे. जिल्ह्यात आता काँग्रेस पक्षाचे अस्तित्व धोक्यात आले आहे. माजी आ. भाऊराव पाटील गोरेगावकर यांनीही शिवसेना शिंदे गटात प्रवेश केला. त्यामुळे जिल्ह्यात काँग्रेस पक्षाला उतरती कळा लागली असल्याचे बोलले जात आहे. प्रज्ञा सातव गत काही महिन्यांपासून सातत्याने काँग्रेसवर नाराज होत्या. त्यामुळे काँग्रेसला सोडचिठ्ठी देऊन भाजपमध्ये प्रवेश करतील अशी चर्चा सुरू झाली होती. त्यानुसार त्यांनी गुरूवारी सकाळीच विधीमंडळ सचिवालयाकडे आपल्या विधान परिषद सदस्यत्वाचा राजीनाम सुपूर्द केला. प्रज्ञा सातव यांचे पती राजीव सातव हे राहुल गांधी यांचे निकटवर्तीय होते. त्यामुळे त्यांचा राजीनामा हा काँग्रेससाठी जबर झटका असल्याचे मानले जाते. काँग्रेसच्या विधान परिषद सदस्यत्वाचा राजीनामा दिल्यानंतर प्रज्ञा सातव यांनी भाजप प्रदेश कार्यालयात जाऊन भाजप प्रदेशाध्यक्ष रवींद्र चव्हाण, महसुल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांच्या उपस्थितीमध्ये भाजपमध्ये प्रवेश करीत कमळ हाती घेतले आहे. त्यांच्या पक्ष प्रवेशामुळे महिला ओबीसी चेहरा भाजपला मिळाला असून कळमनुरी मतदार संघात भाजपची ताकद आणखी वाढणार आहे.

राजीव सातव यांच्या निधनानंतर काँग्रेसमध्ये अंतर्गत वाद सुरू झाला होता. विधान परिषदेच्या आमदारकीसाठी डॉ प्रज्ञा सातव यांचे नाव चर्चेत असताना हिंगोलीच्या तत्कालीन पालकमंत्री वर्षा गायकवाड यांनी त्यांना डावलून इतर नावांना पसंती दिली होती. त्यावरून डॉ सातव व वर्षा गायकवाड यांच्यात कथीत वाद झाला होता. तसेच जिल्ह्यात काँग्रेसमध्ये अंतर्गत वाद व गट निर्माण झाले. पक्षश्रेष्ठींकडून पक्षात समन्वय साधण्यासाठी प्रयत्न झाले नसल्याने अखेर डॉ सातव यांच्यावर पक्ष सोडण्याची वेळ आली असा दावा केला जात आहे.

दुसरीकडे आ. प्रज्ञा सातव यांना पक्षात घेऊन भाजपने आपला मित्रपक्ष असणाऱ्या सत्ताधारी शिवसेनेची ताकद कमी करण्याचा प्रयत्न केला असल्याची चर्चा होत आहे. प्रज्ञा सातव यांनी मागील काळात कळमनुरी मतदारसंघात सुरू असलेल्या अवैध वाळू, अवैध दारू विक्री विरोधात जोरदार मोहीम उघडली होती. यासाठी त्यांनी गावोगावी जाऊन महिलांशी संवाद साधून जिल्हा प्रशासनाला धारेवर धरले होते. यावेळी त्यांच्यावर एका गावात हल्ला देखील झाला होता. कळमनुरी विधानसभा मतदारसंघात शिवसेनेला टक्कर देण्यासाठी डॉ प्रज्ञा सातव यांच्यासारखा चेहरा भाजपला मिळाल्याची चर्चाही राजकीय वर्तुळात होत आहे.

# प्रज्ञा सातव यांनी काँग्रेसच्या पाठीत खंजीर खुपसला- ॲड नाईक



**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, १८ डिसेंबर**

विधान परिषदेत काँग्रेसचे संख्याबळ कमी करण्यासाठी भाजपच्या षडयंत्रामध्ये डॉ प्रज्ञा सातव यांनी सहभाग घेत भाजपमध्ये आज प्रवेश केला आहे. काँग्रेसला विधान परिषदेत विरोधी पक्ष नेता मिळू नये यासाठी हा पक्ष प्रवेश करून काँग्रेसच्या पाठीत खंजीर खुपसण्याचे आणि लोकशाही पायदळी तुडविण्याचे काम डॉ. प्रज्ञा सातव यांनी केले असा आरोप काँग्रेसचे प्रदेश उपाध्यक्ष ॲड सचिन नाईक यांनी पत्रकार परिषदेत केला.

काँग्रेसच्या विधान परिषदेच्या आ. डॉ प्रज्ञा सातव यांनी गुरूवारी भाजपचे महसुल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे, प्रदेशाध्यक्ष रवींद्र चव्हाण यांच्या उपस्थितीमध्ये मुंबईत विधान परिषद सदस्यत्वाचा राजीनामा देत भाजपमध्ये प्रवेश केला.

यानंतर काँग्रेसच्या हिंगोलीतील पदाधिकाऱ्यांनी गुरूवार दि १८ डिसेंबर रोजी पत्रकार परिषद घेत डॉ. प्रज्ञा सातव यांच्यावर जोरदार टीका केली.

काँग्रेसचे दिवंगत नेते राजीव सातव यांच्या निधनानंतर काँग्रेसच्या पक्षश्रेष्ठीनी डॉ प्रज्ञा सातव यांना दोनवेळा विधान परिषद सदस्य दिले. काँग्रेसचे डॉ प्रज्ञा सातव यांना अत्यंत विपरीत परिस्थितीत संधी दिली. मानवीय, संदेवना आणि सहानुभूतीतून दिली. परंतु आज काँग्रेस पक्ष कठीण परिस्थितीत असतांना त्यांनी भाजपमध्ये प्रवेश केला. ही कृती काँग्रेस पक्ष आणि कार्यकर्त्यांसाठी वेदनादायी आहे. भविष्यात कार्यकर्ते त्यांना चोख प्रत्युतर देतील.

डॉ प्रज्ञा सातव यांनी पक्ष प्रवेशानंतर प्रतिक्रीया देतांना मी स्व राजीव सातव यांचे स्वप्न पूर्ण करण्यासाठी भाजपमध्ये प्रवेश केला असल्याचे सांगितले परंतु त्यांनी केलेला पक्षप्रवेश लोकशाही पायदळी तुडविण्यासाठी केला आहे. विधान परिषदेत काँग्रेसचे संख्याबळ कमी झाले तर काँग्रेसला विरोधी पक्ष नेता मिळणार नाही यासाठी भाजपच्या षडयंत्रात सामील होऊन ही कृती केली आहे.

दुसऱ्यांदा डॉ प्रज्ञा सातव यांना विधान परिषदेवर पाठवायचे होते तेव्हा अनेक प्रश्न काँग्रेस पक्षसमोर होते. विधानसभा निवडणुक, अल्पसंख्यांक आणि दलीत वर्गाची मागणी होती त्यांना सभागृहात संधी मिळाली पाहीजे परंतु काँग्रेसने संवेदनेने विचार केला आणि दुसऱ्यांदा विधान परिषदेवर संधी दिली, अशी टिका यावेळी ॲड सचिन नाईक यांनी केली.

यावेळी जिल्हाध्यक्ष सुरेशअप्पा सराफ, डॉ रमेश शिंदे, साहेबराव कांबळे, विनायक देशमुख आदींची उपस्थिती होती.

# लिंबाळा मक्ता भागातील कुंटणखान्यावर पोलिसांची धाड

**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, १८ डिसेंबर**



शहरा नजीक असलेल्या लिंबाळा मक्ता परिसरातील एका ढाब्याजवळ कुंटणखाना सुरू असल्याची माहिती हिंगोली ग्रामीण पोलिसांना मिळाल्यानंतर पोलिसांनी बुधवारी सायंकाळी धाड टाकून काही तरुणींना ताब्यात घेतले असून घटनास्थळावरून आक्षेपार्ह साहित्य जप्त केले आहे. याप्रकरणी हिंगोली ग्रामीण पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्याची प्रक्रिया सुरू होती.

याबाबत अधिक माहिती अशी की लिंबाळा मक्ता या परिसरातील एका ढाब्याजवळ कुंटणखाना सुरू असल्याची माहिती ग्रामीण पोलीस यांना मिळाली होती. या ठिकाणी बाहेरून काही तरुणी आणून त्यांच्याकडून वेश्याव्यवसाय करून घेतल्या जात होता. ग्रामीण पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक शामकुमार डोंगरे, महिला महिला पोलीस निरीक्षक श्रीदेवी बर्गे यांच्यासह महिला पोलीस, पोलीस कर्मचारी पोलीस कर्मचारी यांचे पथकाने संध्याकाळी छापा मारला. यावेळी घटनास्थळावर काही तरुणी तसेच काही आक्षपार्ह साहित्य पोलिसांना आढळून आले. महिला पोलिसांनी तरुणींना ताब्यात घेतले असून साहित्यही जप्त केले आहे.

दरम्यान हा कुंटणखाना कोण चालवत होते याबाबत अजूनही स्पष्ट माहिती मिळाली नाही. परंतु मागील काही महिन्यांपासून या भागामध्ये कुंटणखाना सुरू होता राजकीय मंडळी, अधिकारी तसेच काही आंबट शौकीन यांचा या भागामध्ये वावर वाढला होता. त्यामुळे परिसरातील नागरिक ही त्रस्त झाले होते. हिंगोली जिल्ह्यातील ही पहिलीच कार्यवाही असून हा कुंटणखाना कोण चालवत होते याचा शोधही घेणे आवश्यक आहे. पुढील तपास पोलीस निरीक्षक शामकुमार डोंगरे, महिला पोलीस निरीक्षक श्रीदेवी बर्गे करीत आहेत.



हिंगोली- विभागीय आयुक्त जितेंद्र पापळकर यांनी गुरूवारी येथील जिल्हाधिकारी कार्यालयाच्या नियोजन सभागृहात सर्व विभागांची आढावा बैठक घेतली. यावेळी जिल्हाधिकारी राहुल गुप्ता, मुख्य कार्यकारी अधिकारी विवेक गायकवाड, अतिरिक्त जिल्हाधिकारी महेंद्रकुमार कांबळे, निवासी उपजिल्हाधिकारी अभिमन्यू बोधवाड आदींची उपस्थिती होती. छाया- विजय गुंडेकर

## संक्षिप्त वृत्त

### डॉ. होमी भाभा बालवैज्ञानिक परीक्षेत शांताबाई दराडे विद्यालयाचे यश



हिंगोली- भारतीय विद्या मंदिर शिक्षण संस्था द्वारा संचलित श्रीमती शांताबाई मुंजाजी दराडे माध्यमिक विद्यालय हिंगोली येथील विद्यार्थ्यांनी घवघवीत यश संपादन केले आहे. ग्रेटर बॉम्बे सायन्स टीचर्स असोसिएशन व सायन्स टॅलेंट सर्च कॉम्पिटिशन मार्फत डॉक्टर होमी भाभा बाल वैज्ञानिक कॉम्पिटिशन २०२५-२६ ही स्पर्धा आयोजित केली होती. त्यामध्ये कु. कनिष्का अरुण चोंढेकर हिची सेकंड प्रॅक्टिकल राउंड करिता निवड झालेली आहे. तसेच लक्ष्मण कोंडय्या महाजन, श्रुती विजयलाल जयस्वाल, गौरव संतोष खिल्लारे, हनुमान गजानन जाधव, सृष्टी हरिदास वायचाळ, शुभम एकनाथ टोम्पे या विद्यार्थ्यांनी या स्पर्धेमध्ये भाग घेऊन यश संपादन केले आहे. या सर्व विद्यार्थ्यांना विज्ञान शिक्षक एस पी. गहेरवार यांचे मार्गदर्शन लाभले. या विद्यार्थ्यांचे व मार्गदर्शक शिक्षकाचे मुख्याध्यापक तथा हिंगोली जिल्हा मुख्याध्यापक संघाचे अध्यक्ष डॉ. प्रकाश अंभोरे, उपमुख्याध्यापक दत्तराज डोईफोडे, पर्यवेक्षक अनिल लोळेवार, भारत शिंदे , शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी यांनी सत्कार केला. तसेच संस्थेचे अध्यक्ष, सचिव व सर्व संचालक यांनी सर्व यशस्वी विद्यार्थ्यांचे व मार्गदर्शक अध्यापक संजयसिंह गहेरवार यांचे अभिनंदन केले.

### अवैध वाळू, गौण खनिजांच्या उत्खनन व वाहतुकीविरोधात कठोर कारवाईचे निर्देश

हिंगोली- वाळू व इतर गौण खनिजांचे अनधिकृत उत्खनन, वापर व अवैध वाहतूक यांना आळा घालण्यासाठी तसेच राज्यातील सर्व प्रादेशिक परिवहन प्राधिकरणांच्या कामकाजात समानता व धोरणात्मक एकसूत्रता राहावी, या दृष्टीने राज्य परिवहन प्राधिकरणाने महत्त्वाचे निर्देश दिले आहेत. दि. २६ नोव्हेंबर, २०२५ रोजी निर्गमित शासन परिपत्रकान्वये मोटार वाहन अधिनियम, १९८८ च्या कलम ८६ मधील तरतुदीनुसार विभागीय कारवाई करण्याचा निर्णय राज्यातील सर्व प्रादेशिक परिवहन प्राधिकरणांनी घ्यावा, असे निर्देश देण्यात आले आहेत. त्याअनुषंगाने वाळू व इतर गौण खनिजांचे अवैध, अनधिकृत उत्खनन, वापर, वाहतूक व तस्करी रोखण्यासाठी तसेच गुन्ह्याच्या स्वरूपानुसार कठोर कार्यवाही करण्याचे स्पष्ट निर्देश देण्यात आले आहेत. यामध्ये पहिल्या गुन्ह्यात संबंधित वाहनाचा परवाना ३० दिवसांसाठी निलंबित करून वाहन अटकावून ठेवण्यात येईल. दुसऱ्या गुन्ह्यात ६० दिवसांसाठी परवाना निलंबित करून वाहन अटकावून ठेवण्यात येईल.

# मतमोजणीच्या पार्श्वभूमीवर पोलिसांचा तगडा बंदोबस्त

**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, १८ डिसेंबर**

हिंगोली जिल्ह्यातील मतदान व मतमोजणी ही आचारसंहितेचे पालन करून तसेच कायदा व सुव्यवस्था अबाधित ठेवून शांततेत पार पाडण्यासाठी जिल्हा पोलीस अधीक्षक श्रीकृष्ण कोकाटे यांनी अत्यंत बारकाईने नियोजन करून तगडा पोलीस बंदोबस्त लावला असून सर्व नागरिकांनी कायद्याचे पालन करून पोलीस प्रशासनास सहकार्य करण्याचे आवाहन करण्यात आले आहे.

रविवार दि २१ डिसेंबर रोजी हिंगोली, कळमनुरी, वसमत या नगर पालिका निवडणुकीची मतमोजणी होणार आहे. २ पोलिस उपाधिक्षक, ५७ पोलिस अधिकारी, ४९० पोलिस कर्मचारी, ६०० गृहरक्षक दलाचे जवान, दोन दंगा काबू पथक, राज्य राखीव दलाची तुकडी तैनात केली जाणार आहे. जर कोणी कायदा हातात घेण्याचा प्रयत्न केल्यास त्यांच्यावर कठोर कार्यवाही करण्यात येणार आहे. मतदान व मतमोजणी संदर्भाने हिंगोली पोलिसांचे अनेक पोलीस पथके तैनात करण्यात आली असून २४ तास पेट्रोलिंग ठेवण्यात आली आहे.

वसमत नगर पालिकेचे दि २० डिसेंबरला मतदान होणार आहे. नागरिकांनी कोणत्याही दबावाशिवाय मोकळ्या वातावरणात मतदान प्रक्रिया पार पाडण्याचे सुद्धा आवाहन करण्यात आले आहे. तसेच कोणाचाही बेकायदेशीर दबाव आल्यास तात्काळ पोलीस प्रशासनाची संपर्क साधण्याबाबत कळविण्यात आले आहे.

# दिव्यांग अल्पवयीन मुलींवर अत्याचार करणाऱ्या आरोपीकडून जीवे मारण्याची धमकी

## विधवा महिला व अल्पवयीन मुलीचे जिल्हा कचेरीसमोर उपोषण

**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, १८ डिसेंबर**



कळमनुरी तालुक्यातील पार्डी येथे एका ४५ वर्षीय इसमाने एका अनुसूचीत जातीच्या अल्पवयीन दिव्यांग मुलीवर अत्याचार केल्याची घटना घडली. याप्रकरणी पोलिसांनी केवळ विनयभंगाची तक्रार दाखल केली. आरोपी जामीनावर बाहेर आल्यानंतर त्याने सदरील महिलेस गुन्हा मागे घे अन्यथा तुला आणि तीन मुलींना जीवंत ठेवणार नाही अशी धमकी दिली आहे. आरोपींचा बंदोबस्त करण्यासाठी तसेच त्याच्यावर अत्याचाराचे तसेच जातीवाचक शिवीगाळ केल्याची कलमे लावण्यात यावीत या मागणीसाठी महिला तिच्या पिडीत दिव्यांग मुलीसोबत जिल्हाधिकारी कार्यालयासमोर न्यायाच्या प्रतिक्षेत उपोषणाला बसली आहे.

कळमनुरी तालुक्यातील पार्डी येथे एका अनुसूचतीत जातीच्या दिव्यांग अल्पवयीन मुलीवर आरोपी शेख मोबीन अब्दुल रजाक या नराधमाने घरी कोणी नसल्याचा गैरफायदा घेत घरात येऊन तांदुळ घेण्याच्या बहाण्याने तिच्यावर अत्याचार केला. परंतु कळमनुरी पोलिसांनी आरोपीवर केवळ विनयभंगाचा गुन्हा दाखल केला आहे. सदरील मुलीला वडील नाहीत. ती मतीमंद आहे.

कळमनुरी पोलिसात गुन्हा दाखल झाल्यानंतर आरोपीला न्यायालयात जामीन मिळाला. त्यानंतर त्याने शेतात जाऊन मुलीची आई प्रकरण मिटवून घे अन्यथा तुला व तुझ्या मुलीला जीवंत ठेवणार नाही. तसेच दुसऱ्या दोन मुलीचेही असेच हाल करील अशी धमकी दिली. आरोपीसोबत अन्य दोघेही होते असे निवेदनात नमुद करण्यात आले आहे. त्यामुळे हे कुटुंब घाबरून गेले असून आरोपीचा तत्काळ बंदोबस्त करून महिला व तिच्या मुलींना संरक्षण द्यावे तसेच न्याय मिळावा या मागणीसाठी ही महिला जिल्हाधिकारी कार्यालयासमोर न्यायाच्या प्रतिक्षेत उपोषणाला बसली आहे.

# जिल्हाधिकारी राहुल गुप्ता यांच्या उपस्थितीत ई-केवायसी, ॲग्रीस्टॅक शिबीरांचे आयोजन

**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, १८ डिसेंबर**



जिल्हाधिकारी राहुल गुप्ता यांनी आज हिंगोली तालुक्यातील बळसोंड, भिरडा, कलगाव व भांडेगाव या गावांना भेट देऊन अतिवृष्टी अनुदान ई-केवायसी कॅम्प व ॲग्रीस्टॅक कॅम्प तसेच विविध विकास कामांची पाहणी केली. यावेळी त्यांनी संबंधित कामकाजाची माहिती घेऊन आवश्यक त्या सूचना दिल्या. तसेच अधिकारी, कर्मचारी व ग्रामस्थांशी संवाद साधून मार्गदर्शन केले.

या दौऱ्यात मुख्य कार्यकारी अधिकारी विवेक गायकवाड, अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी सुधीर ठोंबरे, जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणेचे प्रकल्प संचालक नामदेव केंद्रे, उप मुख्य कार्यकारी अधिकारी (पंचायत) केशव गड्डापोड, उप मुख्य कार्यकारी अधिकारी (पाणी पुरवठा व स्वच्छता) संजय कुलकर्णी, उप मुख्य कार्यकारी अधिकारी (महिला व बाल कल्याण) विजय बोराटे, जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. कैलाश शेळके यांच्यासह विविध विभागांचे अधिकारी उपस्थित होते.

बळसोंड येथे ग्रामपंचायतीत नागरिकांशी संवाद साधून स्थानिक समस्या जाणून घेण्यात आल्या. तसेच अतिवृष्टी अनुदान ई-केवायसी व ॲग्रीस्टॅक कॅम्पच्या कामकाजाचा आढावा घेण्यात आला. यावेळी नारी शक्ती महिला प्रभाग संघाच्या कार्यालयास तसेच बचत गटाच्या स्टॉललाही जिल्हाधिकाऱ्यांनी भेट दिली. भिरडा येथे स्मार्ट व्हिलेजअंतर्गत सुरू असलेल्या कामांची पाहणी करण्यात आली. अतिवृष्टी अनुदान ई-केवायसी व ॲग्रीस्टॅक कॅम्पला भेट देण्यात आली. तसेच जिल्हा परिषद शाळा व अंगणवाडीची पाहणी करून संबंधितांना आवश्यक सूचना देण्यात आल्या. कलगाव येथे स्मार्ट व्हिलेजअंतर्गत सुरू असलेल्या कामांची पाहणी करून अतिवृष्टी अनुदान ई-केवायसी कॅम्पला भेट देण्यात आली. यावेळी एक दिवस गावकऱ्यांसोबत आयोजित कार्यक्रमास उपस्थित राहून जिल्हाधिकारी श्री.गुप्ता यांनी मार्गदर्शन केले. भांडेगाव येथेही स्मार्ट व्हिलेजअंतर्गत सुरू असलेल्या कामांची पाहणी करून नागरिकांशी संवाद साधत त्यांच्या अपेक्षा व अडचणी जाणून घेतल्या तसेच ई-केवायसी कॅम्पच्या प्रगतीचा आढावा घेतला. या दौऱ्यादरम्यान विविध विभागांचे अधिकारी, कर्मचारी तसेच स्थानिक नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# विभागीय आयुक्तांची नगर परिषद कार्यालयास भेट



**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, १८ डिसेंबर**

विभागीय जितेंद्र पापळकर हे गुरूवार दि १८ डिसेंबर रोजी हिंगोली दौऱ्यावर आले असता हिंगोली नगरपरिषद कार्यालयास भेट दिली. यावेळी त्यांनी विविध विकास कामांची पाहणी करीत समाधान व्यक्त केले.

विभागीय आयुक्त जितेंद्र पापळकर हे दौऱ्यावर असतांना मुख्याधिकारी अरविंद मुंडे यांनी जलेश्वर तलावाच्या विकासाबाबत माहिती दिली तसेच नगरपरिषद कार्यालयातील नवीन सुसज्ज सभागृहाची पाहणी करून समाधान व्यक्त केले. यावेळी जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी विवेक गायकवाड उपस्थित होते. प्रकल्पाची संपूर्ण माहिती देताना नगरपरिषदेचे मुख्याधिकारी अरविंद मुंढे, नगर अभियंता प्रतिक नाईक, चंद्रकांत लव्हाळे यांची उपस्थिती होती.

सोलापूर तरुण भारत

www.dainiktarunbharat.com, epaper.dainiktarunbharat.com

# देवस्वारी, खंडोबाच्या पालखी पूजनाने माळेगाव यात्रेस सुरवात

**तभा वृतसेवा**
**नांदेड, दि. १८ डिसेंबर-**

उत्तम जागा पाहूनी मल्हारी देव नांदे गड जेरुरी अशा जयघोषात येळकोट येळकोट जय मल्हार म्हणत, बेलभंडा-याची उधळण करीत पारंपारीक पध्दतीने यंदाही माळेगावच्या श्रीखंडोबा रायाच्या यात्रेस शुभारंभ झाला आहे. यावेळी लाखो भाविकांनी पालखीचे दर्शन घेतले. खंडोबाच्या व मानक-यांच्या पालखीचे प्रतिवर्षाप्रमाणे शासकीय विश्रामगृहावर जिल्हा परिषदेच्या वतीने स्वागत करण्यात आले.

दुपारी पालखी पुजनानंतर देव स्वारी काढण्यात आली. यावेळी मानक-यांचा गौरव करण्यात आला. यावेळी सहकारमंत्री बाळासाहेब पाटील, राज्यमंत्री मेघना बोर्डीकर, आमदार प्रतापराव पाटील चिखलीकर, जि.प. माजी सभापती प्रविण पाटील चिखलीकर, जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी तथा प्रशासक मेघना कावली, सामाजिक कार्यकर्त्या प्रणिताताई देवरे-चिखलीकर, शिवानंद हेगळे यांची उपस्थिती होती.

**मानक-यांचा गौरव**

पालखीचे मानकरी गणपतराव मल्हारी नाईक (रिसनगाव), गोविंदराव नागेशराव महाराज (कुरुळा), व्यंकटराव मारोतीराव पांडागळे (शिराढोण), खुशाल भगवानराव भोसीकर (पानभोसी), गोविंदराव बाबाराव नाईकवाडे (पानभोसी), पांडुरंग नारायणराव पाटील (माळेगाव), मल्हारी रावसाहेब पाटील (माळेगाव), विजयकुमार शंकरराव कनकंदडे, आंबादास खंडेराव जहागीरदार या मानक-यांचा जिल्हा परिषदेच्या वतीने जोडआहेर, मानाचा फेटा बांधून गौरव करण्यात आला.

**खंडोबा यात्रेत वाघ्या-मुरळी**

उत्तम जागा पाहूनी मल्हारी देव नांदे गड जेजूरी उत्तराची जेजूरी गडाला नऊ लाख पायरी असा घोष करत वाघ्या मुरळी खंडोबाची सेवा करते. पारंपारीक पध्दतीने कवडयाच्या माळी, लांब हळदीचा मळभट, हातापायावर चाबकाचे फटके मारत वाघ्या मुरळी खंडोबाची सेवा करत असते. या वाघ्या मुरळीला पाहण्यासाठी हजारो भाविकांनी मोठी गर्दी केली आहे. यावेळी अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी संदीप माळोदे, जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणेचे प्रकल्प संचालक डॉ. संजय तुबाकले, सामान्य प्रशासन विभागाचे उप मुख्य कार्यकारी अधिकारी राजकुमार मुक्कावार, पंचायत विभागाचे उप मुख्य कार्यकारी अधिकारी जी.बी. गिरी, जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. संगीता देशमुख, उप मुख्य कार्यकारी अधिकारी अमित राठोड, प्रशांत थोरात, मयूरकुमार आंदेलवाड, शिक्षणाधिकारी प्राथमिक वंदना फुटाणे, माध्यमिकचे शिक्षणाधिकारी माधव सलगर, पशुसंवर्धन सहआयुक्त डॉ. प्रविणकुमार घुले, समाजकल्याण अधिकारी सत्येंद्र आऊलवार, जिल्हा कृषी विकास अधिकारी डॉ. निलकुमार ऐतवडे, आकाशवाणीचे कार्यक्रम अधिकारी विश्वास वाघमारे, गट विकास अधिकारी महेंद्र कुलकर्णी, जि.प. माजी सभापती संजय पाटील क-हाळे, माजी जिल्हा परिषद सदस्य चंद्रसेन पाटील, पंचायत समितीचे माजी सभापती रोहित पाटील आंडगेकर, डॉ. दत्तराव गवळी, बाळू पाटील बाबर, अनिल बाबर, यांच्यासह विविध विभागचे खाते प्रमुख, अधिकारी, जिल्हयातील सर्व गट विकास अधिकारी यांची उपस्थिती होती.

**प्लॅस्टिकमुक्त यात्रेचा संकल्प**

यात्रेत वाघ्या-मुरळी, पोतराज व डफवाल्यांच्या सहभागाने वातारवण भक्तीमय झाले होते. भाविकांसाठी जिल्हा परिषदेच्या वतीने प्लॅस्टिकमुक्त व स्वच्छ यात्रेचा संकल्प राबविला जात आहे. तसेच भाविकांच्या सुरक्षेसाठी सीसीटीव्ही कॅमे-यांची तगडी व्यवस्था करण्यात आली आहे.

# विश्वरत्न डॉ. आंबेडकर पुतळा स्मारकाच्या कामास अखेर सुरुवात

**तभा वृतसेवा**
**माहूर, दि. १८ डिसेंबर-**

: माहूर तालुक्यासह शहरातील संविधानावर प्रेम करणारे, त्याचा आदर करणारे आणि संविधानातील मूल्यांचे (न्याय, स्वातंत्र्य, समता, बंधुता) पालन करणाऱ्या सर्व नागरिकांसाठी अभिमानास्पद अशी ऐतिहासिकघडामोड बुधवार १७ रोजी घडली असून, माहूरकरांसाठी जो अतिशय संस्मरणीय असा क्षण ठरणार आहे.शहरातील बहुप्रतीक्षित असलेल्या भारतीय संविधानाचे शिल्पकार विश्वरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर पुतळा स्मारक निर्माण कामास अखेर सुरुवात झाली असून,या स्मारकाच्या कामाचे उद्घाटन नगराध्यक्ष फिरोज दोसानी यांच्या हस्ते मोठ्या उत्साहात पार पडले.



उद्घाटनप्रसंगी सामाजिक, राजकीय तसेच आंबेडकरी चळवळीतील पदाधिकारी व नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते. यावेळी समाजाच्या वतीने नगराध्यक्ष फिरोज दोसानी यांचा पुष्पहार व शाल देऊन यथोचित सत्कार करण्यात आला.

यावेळी डॉ. बाबासाहेब आंबेडकर पुतळा स्मारक उभारणीचे महत्व सांगताना नगराध्यक्ष दोसानी म्हणाले कि,डॉ. बाबासाहेब आंबेडकर पुतळा स्मारक हे डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या सन्मानार्थ उभारण्यात येत असून,जी त्यांच्या कार्याचा, विचारांचा आणि सामाजिक न्यायाच्या लढ्याचा गौरव करते. जे सामाजिक न्याय आणि समानतेचे प्रतिक असल्याचे गौरवोद्गार त्यांनी काढले.

पुढे बोलताना दोसानी म्हणाले कि,डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांना महामानव,भारतरत्न, भारतीय संविधानाचे शिल्पकार,बोधिसत्व,आधुनिक बुद्ध, समाजसुधारक, कायदेपंडित, अर्थतज्ञ, लोकनेते, दलित-शोषित-वंचित-स्त्रियांचे तारणहार अशा अनेक विशेषणांनी गौरवले जाते, जे त्यांच्या अष्टपैलू व्यक्तिमत्त्वाचे आणि दूरदृष्टीचे वर्णन करतात. त्यांनी शिक्षण, सामाजिक न्याय आणि राष्ट्राच्या उभारणीत दिलेल्या योगदानामुळे त्यांना ही विशेषणे प्राप्त झाली आहेत.

हे स्मारक केवळ पुतळा नसून सामाजिक समता, बंधुता व न्यायाच्या विचारांना अभिवादन करणारे प्रेरणास्थान ठरणार आहे. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या विचारांची ओळख नव्या पिढीला करून देणारे हे स्मारक माहूरच्या सामाजिक इतिहासात एक नवा अध्याय लिहिणार असल्याची भावना यावेळी नगराध्यक्ष फिरोज दोसानी यांनी बोलताना व्यक्त केली.

पुतळा स्मारकाचे काम सध्या जलद गतीने सुरू असून हे काम समाजाच्यावतीने प्रकाश गायकवाड यांच्याकडे सोपवण्यात आले आहे. दर्जेदार साहित्य वापरून भक्कम व देखणे स्मारक उभारण्यात येणार असून, काम वेळेत पूर्ण करण्यासाठी नियोजन करण्यात आले असल्याची माहिती प्रकाश गायकवाड यांनी यावेळी दिली.

आता प्रत्यक्षात या बहुप्रतिक्षित पुतळा स्मारकाच्या कामाला सुरुवात झाल्याने संपूर्ण तालुका व लगतच्या परिसरासह शहरातील नागरिक, आंबेडकरी अनुयायी व सामाजिक कार्यकर्त्यांमध्ये समाधान आणि उत्साहाचे वातावरण निर्माण झाले आहे.

या वेळी उपनगराध्यक्ष नाना लाड,नगरसेवक प्रतिनिधी आकाश कांबळे,अपसर आली,इरफान सय्यद,माजी नगरसेवक दीपक कांबळे,सिद्धार्थतामगागडगे,प्रा.विनोद कांबळे,रेणुकादास वानखेडे,सुभाष दवणे,डॉ. सत्यम गायकवाड यांच्यासह अनेकांची उपस्थिती होती.

## मुदखेड तालुक्यातील चिलपिंपरी परिसरात बिबट्याचा धुमाकूळ

**मुदखेड** -मुदखेड तालुक्यातील मौजे चिलपिंपरी, दरेगाव येथे पुंडलिक विठ्ठल पाटील गाढे यांची शेती दरेगाव मधून असून त्यांचा गट क्र.१५५ आहे या शेतीमध्ये त्यांचा आखाडा शेतात आहे. शेतात एक म्हैस आणि त्याचं वासरू शेतात होते. रोजच्याप्रमाणे शेतामध्ये म्हैसीला बांधून रात्री दूध घेऊन घरी आले. आणि सकाळी सहा वाजताच्या दरम्यान शेतकरी पुंडलिक गाढे यांनी दूध काढण्यासाठी शेताकडे गेले असता बिबट्याने म्हशीच्या वासरांना खाऊन मारून टाकले होते. त्यांनी हे दृश्य पाहून त्यांना धक्काच बसला. त्यांनी गावातल्या व्यक्तींना फोन करून बोलावून घेतले. ही बातमी वाऱ्यासारखी गावभर पसरली बिबट्याने हल्ला केला असं ऐकताच सर्व गावकऱ्यांनी त्यांच्या शेताकडे धाव घेतली. चिलपिंपरी, टाकळी, खुजडा, दरेगाव, या गावांमध्ये भीतीचे वातावरण पसरला आहे. महिला व लहान मुले महिला व लहान व पुरुष शेताकडे जाण्यासाठी भीत आहेत. या बिबट्याचा बंदोबस्त करण्यासाठी वन विभागाने काहीतरी ठोस पावले उचलावे अशी मागणी गावकऱ्यांकडून केली जात आहे.

## अधिवेशनात हिमायतनगर बसस्थानकाचा प्रश्न उपस्थित

**हिमायतनगर**-हिवाळी अधिवेशनात हिमायतनगर बसस्थानकाचा निर्माण करण्यासाठी प्रश्न आमदार बाबुराव कदम कोहळीकर यांनी सभागृहात तारांकित प्रश्न उपस्थित केल्यामुळे तालुक्यातील जनतेच्या आशा पल्लवित झाल्या आहेत. तालुक्याचा दर्जा मिळुन ही अनेक वर्षां पासुन तालुक्यातील जिव्हाळ्याचा विषय म्हणजे बसस्थानक निर्माण करण्यासाठी आजपर्यंत प्रश्न मार्गी लागलेला नाही. मात्र,प्रथमच आमदार बाबुराव कदम कोहळीकर यांनी नागपूरच्या हिवाळी अधिवेशनात ३० वर्षांपासुन प्रलंबित असलेल्या बसस्थानकाच्या प्रश्नाकडे सभागृहाचे लक्ष वेधले. आतापर्यंत केंद्रीय राज्यमंत्री,माजी खासदार,विद्यमान खासदार, माजी आमदार यांना हिमायतनगर तालुक्यातील तमाम जनतेने अनेक वेळा मतदारसंघाने संधी दिल्या होत्या.परंतु साधे नवीन बसस्थानक निर्माण करु शकले नाही.हा कटु पण वास्तव अनुभव जनतेला दिसत आहे. नागपुर मध्ये झालेल्या हिवाळी अधिवेशनात हदगाव-हिमायतनगर मतदारसंघाचे आमदार कोहळीकर यांनी हिमायतनगरला बसस्थानका साठी जागा नाही.हा युक्तिवाद आमदार कोहळीकरांनी फोल ठरवला. त्यांनी सांगितले, की शहर व परिसरात अनेक शासकीय कार्यालयांच्या जुन्या जागा तर वापरात नसलेल्या ईमारती पडुन आहेत. त्या जागा खुल्या केल्यास बसस्थानक उभारणे सहज शक्य आहे. मात्र याकडे आज पर्यंत कुणीच गांभीर्याने लक्ष दिले नाही.

**तालुक्याचा दर्जा, पण बसस्थानक नाही?**

तालुक्याचा दर्जा मिळुन ही आजपर्यंत बसस्थानक झाले नाही. यापूर्वी तत्कालीन मुख्यमंत्री व परिवहन मंत्री यांच्या कडे पत्रव्यवहार करुन बसस्थानकाचा प्रश्न मांडला होता. तसेच तत्कालीन खासदार हेमंत पाटील यांनीही हिमायतनगर लगत असलेल्या पाटबंधारे विभागाच्या जमिनीची पाहणी करुन बसस्थानकासाठी जागा हस्तांतरित करण्याचा प्रस्ताव राज्य शासनाकडे सादर केला होता. आता आमदार कोहळीकर यांनी नागपूर अधिवेशनात तारांकित प्रश्न उपस्थित करुन शासनाचे लक्ष वेधल्यामुळे हा प्रश्न प्रत्यक्ष मार्गी लागण्याची शक्यता बळावली आहे. आरोग्य सेवा व ईतर मुलभूत प्रश्नांवर सुद्धा लक्षवेधी सुचना मांडुन सभागृहाचे लक्ष वेधले.आजपर्यंत स्वतंत्र बसस्थानक नसल्यामुळे प्रवाशांना उन्हात आणि पावसात भिजत बसची वाट पाहावी लागते आहे. जनतेच्या जिव्हाळ्याचा प्रश्न तारांकित करुन सरकारचे लक्ष वेधले गेले. हा केवळ प्रश्न नाही.तर तालुक्यातील जनतेची फार जुनी मागणी आहे.असे आमदार कोहळीकर म्हणाले.

## हदगाव नगर परिषदेच्या मतमोजणी बाबत मार्गदर्शिका सूचना जाहीर

**हदगाव** -हदगाव नगर परिषदेच्या सार्वत्रिक निवडणूक २०२५ च्या मतमोजणी बाबतीत सर्व वैधरित्या नामनिर्देशित उमेदवारास मतमोजणीच्या दिवशी पाळव्याच्या सूचना सहाय्यक निवडणूक निर्णय अधिकारी गौरव वांडेकर यांनी जाहीर केले असून कायदा व सुव्यवस्था अबाधित राखण्यासाठी व मतमोजणी सुरळीत पार पडण्याकरिता प्रशासनास सर्वांनी सहकार्य करावे असे आव्हान करण्यात आले. हदगाव नगरपरिषद सार्वत्रिक २०२५ निवडणुकीच्या अनुषंगाने मतमोजणी ही दि.२१ डिसेंबर २०२५ रोजी सकाळी १० वाजता नगरपरिषद कार्यालय हदगाव येथे पार पडणार आहे. सदरील मतमोजणी एकूण ५ टेबलावर व ६ फेरीमध्ये पूर्ण होईल मतमोजणी उमेदवार स्वतः किंवा प्रतिनिधीस पाठवावे. उमेदवार अथवा प्रतिनिधी इलेक्ट्रॉनिक यंत्रे ज्यामध्ये मोबाईल, कॅमेरा हे नेता येणार नाही. ज्या प्रभागाची मतमोजणी चालू असेल त्याच प्रभागाचे उमेदवार अथवा प्रतिनिधी यांना प्रवेश देण्यात येणार आहे असून त्या प्रभागाची मतमोजणी झाल्यास त्यांनी तात्काळ मतमोजणी कक्ष सोडावे जेणेकरून दुसऱ्या प्रभागातील उमेदवारांना व प्रतिनिधींना पाठविण्यास सुकर होईल व मतमोजणी सुरळीत पार पडण्यात मदत होईल. याप्रकारे उपरोक्त सूचनांचे पालन करून प्रशासनास सहकार्य करण्याचे आव्हान सहाय्यक निवडणूक निर्णय अधिकारी गौरव वांडेकर यांनी प्रसिद्धी माध्यमाद्वारे केली आहे.

## दिगांबर कदम यांचे निधन

**नांदेड** -लगळूद ता. भोकर येथील रहिवाशी तथा नांदेड जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेचे सेवानिवृत्त शाखाधिकारी दिगांबर उर्फ चिमणाजी बापुराव कदम (वय ८२ वर्षे) यांचे दि. १७ डिसेंबर रोजी रात्रौ १ वाजता वृद्धापकाळाने निधन झाले. त्यांच्या पश्चात ४ मुले, ३ मुली, सुना, जावई, नातवंडे असा मोठा परिवार आहे.

## संगीता यन्नावार यांचे निधन

नांदेड : सिडको येथील रहिवासी संगीता मधुसूदन यन्नावार (४०) यांचे १८ डिसेंबर रोजी सकाळी ११ वाजता दीर्घ आजाराने रुग्णालयात उपचारादरम्यान निधन झाले. त्यांच्या पश्चात पती, सासू, दीर, जाऊ, दोन मुली असा परिवार आहे. त्यांच्या पार्थिव देहावर १८ डिसेंबर रोजी सायंकाळी ६.३० वाजता सिडको येथील वैकुंठधाम स्मशान भूमीत अंत्यसंस्कार करण्यात आले.

## श्रीरजा तामसेकरचे बाल वैज्ञानिक स्पर्धेत यश.

**तभा वृतसेवा**
**तामसा, दि. १८ डिसेंबर-**

तामसा येथील पीएमश्री जिल्हा परिषद हायस्कूलची ९ व्या वर्गातील विद्यार्थीनी क्षिरजा अमोल तामसेकर ही डॉ. होमीभाभा बाल वैज्ञानिक स्पर्धेसाठी पात्र ठरली आहे.

बृहन्मुंबई विज्ञान शिक्षक संघटनेकडून घेण्यात आलेल्या या स्पर्धेचा निकाल जाहीर झाला असून लातूर विभागात श्रीरजा पात्र ठरली आहे. या स्पर्धेत सहभागी झालेल्या शाळेतील नऊ विद्यार्थ्यांपैकी ती एकमेव पात्र ठरली आहे .या यशाबद्दल मंगळवारी (ता. १६) येथील आयुर्वेदिक दवाखान्यात वैद्यकीय अधिकारी डॉ. रामदास बोंदरवाड यांच्या हस्ते तिचा सत्कार करण्यात आला.यावेळी ग्रामीण भागातील विद्यार्थी विज्ञान स्पर्धा परीक्षेत यश मिळवण्याचे प्रमाण वाढणे समाधानकारक असल्याचे मत डॉ. बोंदरवाड यांनी व्यक्त केले. यावेळी औषध निर्माण अधिकारी संजीवनी पारधी,अमोल तामसेकर,प्रभांजली धानोरकर उपस्थित होते. प्रशालेचे मुख्याध्यापक देविदास अक्कमवाड, शिक्षक गिरीश सुरकुटवार यांनी तिचे अभिनंदन केले.

# शासकीय रुग्णालयात अत्याधुनिक सिटीस्कॅन मशीनचा शुभारंभ; जिल्हाधिकारी राहुल कर्डिले यांनी दिली भेट

**तभा वृतसेवा**
**नवीन नांदेड, दि. १८ डिसेंबर-**

डॉ. शंकरराव चव्हाण शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालय विष्णुपुरी नांदेड येथील क्ष-किरण विभागांमध्ये आधुनिक व उच्च क्षमतेच्या कंपनीची सिटीस्कॅन मशीनचा शुभारंभ दिनांक १५ डिसेंबर रोजी कार्यान्वित करण्यात आला. यावेळी जिल्हा अधिकारी राहुल कर्डिले यांनी या मशीनची पाहणी केली. या मशीन मुळे चार जिल्ह्यातील गोरगरीब रुग्णांना लाभ मिळणार आहे.



नांदेड येथील डॉ. शंकरराव चव्हाण शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालय विष्णुपुरी नांदेड येथे दिनांक १५ डिसेंबर २०२५ रोजी पासून अत्याधुनिक व उच्चक्षमतेची सिटीस्कॅन मशीन नव्याने चालू करण्यात आली आहे . या मशीन द्वारे अचूक उच्च रिझोल्युशन प्रतिमा देणारी असून कमीत कमी वेळात शरीराची तपासणी करता येते. सदरील मशीन द्वारे रुग्णांचे मेंदूचे आजार, स्टॉक, मेंदूतील रक्तस्त्राव, हृदय व रक्तवाहिन्यांचे विकार, छाती व पोटातील गंभीर गुंतागुंतीचे आजार, अन्ननलिकेतील आजार, फुफुसातील अंतर्गत गाठीचे आजार तसेच अपघातातील अंतर्गत दुखापतीचे निदान लावण्यास मोठी मदत या मशीनद्वारे होईल. नांदेड जिल्ह्यात अशा प्रकारची उच्चक्षमतेची मशीन एकमेव डॉ. शंकरराव चव्हाण शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालय विष्णुपुरी नांदेड येथे आज घडीला उपलब्ध आहे. तरी नांदेड जिल्ह्यात व परिसरातील लगतच्या जिल्ह्यातील हजारो रुग्णांच्या तपासण्या करण्यास मदत होणार असल्यामुळे या मशीनच्या लाभ रुग्णाला मोठ्या प्रमाणात होणार आहे. यावेळी डॉ. शंकरराव चव्हाण शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालयाचे अधिष्ठाता डॉ. सुधीर देशमुख, वैद्यकीय अधीक्षक डॉ. विजयकुमार कापसे, डॉ. अमित पंचमहालकर, डॉ. अनिल तापाडिया, प्रा. डॉ. एस. आर. मोरे, प्रा. डॉ. वैष्णवी कुलकर्णी प्रा. डॉ. किशोर राठोड, प्रा. डॉ.क्रांतीलाल चंडालिया, प्रा. डॉ. कपिल मोरे, डॉ. उबेद खान, उपवैद्यकीय अधीक्षक प्रा. डॉ. अजय वराडे यांच्यासह रुग्णालयातील खुशाल विश्वासराव संजय वाकडे प्रशासकीय अधिकारी निवासी वैद्यकीय अधिकारी डॉ. निखिल घुगे व डॉ. धनंजय मोरे व श्रीमती अलकंदा कुलकर्णी, सतीश इंगळे यांच्यासह महाविद्यालय व रुग्णालयातील विविध विभागांचे अधिकारी व कर्मचारी यांची उपस्थिती होते.

# कल्पना भागवत प्रकरणी खा.आष्टीकर यांची चौकशी करण्याची मागणी

**तभा वृतसेवा**
**हदगाव, दि. १८ डिसेंबर-**

मागच्या काही महिन्यापूर्वी घडलेली घटना म्हणजेच पाकिस्तान व अफगाणिस्तान या देशाशी संबंध असणारी एजंट म्हणून काम करणारी व स्वतःला तोतया आयपीएस अधिकारी भासवणारी कल्पना भागवत यांच्याशी आर्थिक पैशासंबंधीत संपर्कात आलेले हिंगोली चे उबाठा गटाचे खा. नागेश पाटील आष्टीकर यांची याप्रकरणी सखोल चौकशी होऊन जनतेस या प्रकरणी पूर्ण माहिती व्हावी याकरिता मी स्वतः देशाचे गृहमंत्री अमित शहा यांच्याकडे मागणी करणार असून या घटनेस आ.कोहळीकर यांनी सुद्धा सहमती दर्शवीत राज्याचे मुख्यमंत्री तथा गृहमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याकडे सुद्धा चौकशीची मागणी करणार असल्याचे पत्रकार परिषदेत सांगितले. याप्रसंगी शिवसेनेचे ज्येष्ठ नेते अनिल पा. बाभळीकर यांची उपस्थिती होती.



पुढे बोलताना माजी खा. वानखेडे म्हणाले की, देशद्रोही असणाऱ्याशी आर्थिक देवाण-घेवानातून प्रकाशझोतात आलेले खा. नागेश आष्टीकर यांच्या जागी जर एखादा मुस्लिम समाजाचा खासदार राहिला असता तर आतापर्यंत विविध संस्थांच्या चौकशीच्या माध्यमातून त्यास तुरुंगात पाठविले असते पण खा.नागेश पा. आष्टीकर यांची आतापर्यंत या गंभीर घटनेनंतर सुद्धा साधी चौकशी झाली नसल्याचे सांगितले. या देशात एकाला एक न्याय व दुसऱ्या पाठीराखाण न करता त्याची पूर्ण चौकशी होणे गरजेचे असल्याचे सुद्धा सांगितले.कर नाही त्याला डर कशाला त्याप्रमाणे चौकशी होणे फार गरजेचे असून शेवटी आपल्या देशाच्या सुरक्षितेचा प्रश्न आहे तर आ. कोहळीकर म्हणाले की, प्रथमता आपल्यास कागदोपत्री व पुराव्यानिशी एवढी रक्कम दिली हे उजागर झाले असून याच्या व्यतिरिक्त आणखीन काळा पैसा किती दिला असेल याची सुद्धा चौकशी होणे अत्यंत गरजेचे असल्याचे सांगितले म्हणून लवकरच मी आणि माजी खासदार सुभाषराव वानखेडे हे देशाचे गृहमंत्री अमित शहा व राज्याचे मुख्यमंत्री तथा गृहमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याकडे चौकशीची मागणी करणार असल्याचे सांगण्यात आले.

# हरिनामाच्या गजरात गोदावरी परिक्रमा यात्रा नरसीत दाखल

**तभा वृतसेवा**
**नायगाव, दि. १८ डिसेंबर-**

दक्षिणगंगा म्हणून ओळखल्या जाणाऱ्या पवित्र गोदावरी नदीच्या संरक्षण व आध्यात्मिक जागृतीचा संदेश देणारी गोदावरी परिक्रमा यात्रा मलूक पीठाधीश्वर राजेंद्र दास देवाचार्यजी महाराज यांच्या सान्निध्यात सुरू असून दि. १७ डिसेंबर रोजी ही यात्रा नायगाव तालुक्यातील नरसी नगरीत दाखल झाली.

महामंडलेश्वर लक्ष्मणदास महाराज (भीलवाडा), चिन्मय बापूसह देश भरातील विविध आखाड्यातील साधू-संत व महंतांच्या उपस्थितीत निघालेल्या या यात्रेचे स्वागत करण्यासाठी नरसी व परिसरातील हजारो भाविकांनी रस्त्याच्या दुतर्फा रांगा लावल्या होत्या. पुष्पवृष्टी, हरिनामाचा गजर,जय जय श्रीराम व भगवान श्रीकृष्णाच्या जयघोषात संपूर्ण परिसर भक्तिमय वातावरणाने भारावून गेला.

या यात्रेतील साधू-संतांचे दर्शन व आशीर्वादासाठी भगवान बालाजी मंदिरातील पद्मावती मंगल कार्यालयात विशेष कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी राज्याचे माजी मुख्यमंत्री तथा खासदार खा. अशोकराव चव्हाण यांनी राजेंद्र दास देवाचार्य जी महाराजांसह उपस्थित सर्व साधू-संत व महंतांचे नांदेड जिल्ह्यातील भाविकांच्या वतीने यथोचित स्वागत व सन्मान केला.



दरम्यान, नरसी येथील श्री तुळजा भवानीची जिनिंग फेडरेशनचे नूतन चेअरमन श्रावण भिलवंडे यांच्या 'नंदनवन' निवासस्थानी सदिच्छा भेटी प्रसंगी श्रावण भिलवंडे मित्र मंडळाच्या वतीने खा. अशोकराव चव्हाण यांचा सत्कार करण्यात आला.

या प्रसंगी रसीक संत किशोर दास महाराज(वृंदावन),गोवत्स बालयोगी व्यंकट स्वामी महाराज, महंत स्वामी शांतीब्रह्म यदुबन महाराज (कोलंबीकर) यांच्यासह अनेक संत-महंत उपस्थित होते. तसेच माजी आ. अमर राजूरकर, चेअरमन श्रावण भिलवंडे, शिवसेना (उबाठा) गटाचे तालुकाप्रमुख रविंद्र भिलवंडे, सरपंच गजानन भिलवंडे, नंदकिशोर टोकलवाड, राजू गंदीगुडे, राजेश भिलवंडे, मोहन भिलवंडे, वसंत मेडेवार आदी मान्यवरांची उपस्थिती होती.

भगव्या पताका,ढोल-ताशांचा निनाद आणि मालिकांच्या अपार श्रद्धेमुळे नरसी नगरीत दिवसभर अध्यात्मिक वातावरण निर्माण झाले. गोदावरी परिक्रमा यात्रेने नरसीच्या धार्मिक परंपरेत एक अविस्मरणीय अध्याय जोडल्याची भावना ग्रामस्थांनी व्यक्त केली.

# सकारात्मक शिस्त सर्व शाळांमध्ये राबवावी : गट शिक्षणाधिकारी महामुने

**तभा वृतसेवा**
**किनवट, दि. १८ डिसेंबर-**

विविध बातम्यांतून विद्यार्थ्यांवरील शारीरिक शिक्षेच्या घटना समोर येत असल्याने समाजात याविषयी चिंता व्यक्त होत आहे. तेव्हा विद्यार्थ्यांचे मानसिक आरोग्य , सुरक्षा आणि शिक्षक - विद्यार्थी नाते बळकट करण्यासाठी शालेय शिक्षण मंत्री महोदयांच्या संकल्पनेतील सकारात्मक शिस्त सर्व शाळांमध्ये राबविणे आवश्यक आहे. असे प्रतिवादन गट शिक्षणाधिकारी अनिलकुमार महामुने यांनी केले.

येथून जवळच असलेल्या कोठारी (चि) येथील मातोश्री कमलताई ठमके इंग्लिश स्कूल मध्ये आयोजित गोकुंदा व शनिवारपेठ केंद्राच्या केंद्रस्तरीय शिक्षण परिषदेत मार्गदर्शन करतांना बोलत होते.




यावेळी गोकुंदा केंद्राचे केंद्रप्रमुख उत्तम कानिंदे व केंद्रिय मुख्याध्यापक रवि नेम्माणीवार , शनिवारपेठ केंद्राचे केंद्र प्रमुख राम बुसमवार व केंद्रिय मुख्याध्यापक आर .आर. जोशी , मुख्याध्यापक संघटनेचे तालुका सचिव अरविंद राठोड , महात्मा ज्योतिबा फुले विद्यालय व कनिष्ठ महाविद्यालयाचे प्राचार्य प्रमोद मुनेश्वर , एमकेटीचे शेख शेहबाज यांची मंचावर प्रमुख उपस्थिती होती.

पुढे बोलतांना गट शिक्षणाधिकारी महामुने असे म्हणाले की, आपण प्रथम मुलांमध्ये राष्ट्रप्रेम जागविण्यासाठी संविधानातील मूलभूत कर्तव्ये दैनिक परिपाठात घ्यावी. संविधानातील मूल्यांची रूजवणूक करावी. रोजच्या वर्तमानपत्रातील बातम्या पाहता अशा घटना घडू नयेत यासाठी शाश्वत उपाययोजना गरजेच्या आहेत म्हणून शालेय शिक्षण मंत्री दादाजी भुसे यांच्या संकल्पनेतील सकारात्मक शिस्त प्रत्येक शिक्षकांनी शाळेत अनुसरणे अत्यावश्यक आहे . विद्यार्थ्यांना भीती , अपमान किंवा शिक्षा न देता योग्य वर्तन शिकविण्याची विज्ञानाधारित पद्धती म्हणजेच सकारात्मक शिस्त होय.

यावेळी सकारात्मक शिस्त या विषयावर मुक्ता आलेवार , डॉ. जयंत नारळीकर गणित विज्ञान अध्ययन समृद्धी कार्यक्रम आणि पुढील दिशा या विषयावर विनय वैरागडे , योगेश वैद्य , बाल सुरक्षा या विषयावर राजेश राठोड व माता पालक गट या विषयावर अविनाश पिसलवार या सुलभकांनी सविस्तर माहिती दिली. तथागत पाटील यांनी पीपीटी सादरणीकरणास संगणक सहाय्य केले.

केंद्र प्रमुख राम बुसमवार यांनी प्रास्ताविक केले. केंद्र प्रमुख उत्तम कानिंदे यांनी सूत्रसंचालन केले आणि सकारात्म शिस्त , याचा उद्देश , सकारात्मक शिस्तीचे तंत्र , उपाय , उपक्रम यावर चर्चा घडवून आणली. तसेच मेंदू तज्ज्ञ डॉ. पॉल मॅक्लिन यांचा शिअरी ऑफ डाऊन शिफ्टींग हा सिंद्धात समजावून शिक्षेचा मनावर व मेंदूवर होणार परिणाम सांगितला .